सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ७९ | पाने १२ | किंमत रु. ६/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



या भूमीची अखंड परंपरा आहे. आपल्या संस्कृतीच्या विशिष्ट प्रवाहाला अखंडित ठेवण्यासाठी ज्या महापुरुषांनी आपले बलिदान दिले, अशा सर्व बलिदानाच्या प्रतीकांच्या रूपात, आदर्शांच्या सगुण साकार रूपात, या भूमीचे आम्हाला दर्शन होते. त्यामुळेच या भूमीसाठी पुण्यभूमी, मंगलमयी आदि शब्दप्रयोग केला जातो.

**- बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

## विनम्र अभिवादन



राष्ट्र सेविका समितीच्या द्वितीय प्रमुख संचालिका वं. ताई आपटे यांचा आज तिथीनुसार स्मृतिदिन

## महत्त्वाचे

### भारतीयांना ५६ देशांध्ये व्हिसामुक्त प्रवेश

**नवी दिल्ली :** जागतिक स्तरावर भारतीय पासपोर्टची ताकद आणखी वाढली आहे. हेन्ले पासपोर्ट इंडेक्स २०२६ च्या अहवालानुसार, भारतीय पासपोर्टने जागतिक स्तरावर लक्षणीय झेप घेतली आहे. भारत आता १० स्थानांनी वर चढून ७५ व्या स्थानावर पोहोचला आहे. याचा अर्थ असा की भारतीयांना ५६ देशांध्ये व्हिसामुक्त प्रवास करता येणार आहे. नवीन पासपोर्ट रँकिंगमुळे भारतीय प्रवाशांना ५६ देशां ध्ये कोणत्याही अडचणीशिवाय प्रवास करता येईल. या देशांध्ये, व्हिसाची आवश्यकता राहणार नाही. यादीत सिंगापूर पुन्हा एकदा अव्वल स्थानावर आहे, या देशाचे नागरिक व्हिसाशिवाय १९२ देशांध्ये प्रवेश करू शकतील. जपान आणि दक्षिण कोरिया दुसऱ्या स्थानावर आहे, या देशांतील लोक १८७ देशां ध्ये व्हिसामुक्त प्रवास करू शकेल. स्वीडन आणि युएई तिसऱ्या स्थानावर आहेत, प्रवासी १८६ देशांध्ये कोणत्याही निर्बंधाशिवाय प्रवेश करू शकेल. चौथ्या स्थानावर युरोपीय देशांचा दबदबा आहे, ज्यामध्ये १२ देशांचा समावेश आहे. या सर्व देशांच्या नागरिकांना १८५ देशां ध्ये व्हिसाशिवाय प्रवेश मिळतो. त्यानंतर पाचव्या स्थानावर ऑस्ट्रिया, ग्रीस, माल्टा आणि पोर्तुगाल यांचा समावेश आहे.

# बांगलादेशात 'रहमान'राज

**• बीएनपीला स्पष्ट बहुमत • २१२ जागांवर विजय • जमातचा पराभव**

**◆ ढाका, १३ फेब्रुवारी**

**बांगलादेशात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी अर्थात् बीएनपी आणि त्यांच्या मित्र पक्षांचा २१२ जागांवर विजय झाला. जनतेने 'बीएनपी'च्या पारड्यात भरभरून मते टाकली. बहुमतापेक्षा अधिक जागा या पक्षाने जिंकल्या. या अभूतपूर्व विजयामुळे पक्षाचे अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान दिवंगत खालिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान यांचा पंतप्रधानपदावर आरुढ होण्याचा मार्ग मोकळा झाला.**

शेख हसीना वाजेद यांचे सरकार उलथून लावण्यात सक्रीय भूमिका निभावणारी कट्टरपंथीय संघटना जमात-ए-इस्लामीच्या नेतृत्वाखालील युतीला केवळ ७७ जागाच मिळू शकल्या. यात विद्यार्थी संघटनेचाही समावेश आहे. बांगलादेशात गुरुवारी २९९ जागांसाठी निवडणूक पार पडली आणि त्यानंतर मतमोजणीस सुरुवात झाली होती. निवडणुकीचे निकाल शुक्रवारी जाहीर करण्यात आले. यात बीएनपीच्या नेतृत्वातील मित्र पक्षांचा २१२ जागांवर विजय झाला. यात बीएनपीच्या १५१ उमेदवारांचा समावेश आहे. आकडेवारीनुसार, बीएनपीने दोन तृतीयांश बहुमत मिळवले आहे, तर जमात-ए-इस्लामीच्या नेतृत्वाखालील युतीचा सुपडासाफ झाला. त्यांना तीन अंकी आकडा गाठता आला नाही. बीएनपीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या ढाका-१७ आणि बोगरा-६ या दोन्ही जागा जिंकल्या. बीएनपीचे प्रमुख नेते मिर्झा फखरुल इस्लाम आलमगीर, मोहम्मद असदुज्झमन आणि रुमिन फरहाना यांचाही मताधिक्क्याने विजय झाला.



**पक्षनिहाय मिळालेल्या जागा**

| एकूण जागा | बीएनपी-मित्र पक्ष | जमात-विद्यार्थी संघटना | अपक्ष |
|---|---|---|---|
| २९९ | २१२ | ७७ | ०७ |

**निवडणुकीत महिलांचीही आघाडी**

बांगलादेशात एकूण ८३ महिला उमेदवारांनी निवडणूक लढवली. यापैकी सात महिलांनी विजय मिळवला. यातील सहा विजेत्या बीएनपीच्या आहेत. विजयी उमेदवारांमध्ये बीएनपीच्या सहा, तर ब्राह्मणबारिया-२ मधून विजयी झालेल्या एक महिला विजयी झाली, त्यांना यापूर्वी बीएनपीमधून निलंबित करण्यात आले.

**भारताविरोधात गरळ ओकणाऱ्या मौलानाचा पराभव**

भारताविरुद्ध सतत गरळ ओकणारा आणि कट्टरपंथी विचारसरणीचा पुरस्कार करणारा मौलाना आणि बांगलादेशी नेता मामूनुल हक याला जनतेने जोरदार चपराक दिली. बांगलादेश खिलाफत मजलीस पक्षाचा उमेदवार असलेल्या मामूनुल हकचा दारुण पराभव झाला. ◀(वृत्तसंस्था)

> बीएनपीचे अध्यक्ष तारिक रहमान यांचे आणि त्यांच्या पक्षाचे ऐतिहासिक विजयासाठी अभिनंदन करतो. भारत लोकशाही, प्रगतीशील आणि सर्वसमावेशक बांगलादेशला पाठिंबा देत राहील. द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी आणि सामायिक विकास उद्दिष्टे पुढे नेण्यासाठी नवीन सरकारसोबत काम करण्यास उत्सुक आहे.
>
> **- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

> लोकशाही देशाने जनतेच्या निकालाचा सन्मान करणे ही आनंदाची बाब आहे. पंतप्रधान मोदींनी रहमान यांचे केलेले अभिनंदन आणि या जनादेशाला दिलेली मान्यता कौतुकास्पद आहे. यामुळे येणाऱ्या काळात दोन्ही देशांमधील संबंध अधिक मजबूत होतील.
>
> **- नजरुल इस्लाम खान**
> उपाध्यक्ष, स्थायी समिती सदस्य, बीएनपी

# देशातील जुन्या इमारती गुलामगिरीचे प्रतीक

## सेवा तीर्थवरून पंतप्रधानांचे भाष्य



नव्यानेच बांधलेल्या सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवन इमारतीचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. याप्रसंगी उपस्थित केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह, मनोहरलाल आणि मान्यवर

**◆ नवी दिल्ली, १३ फेब्रुवारी**

स्वातंत्र्यानंतर साउथ ब्लॉक आणि नॉर्थ ब्लॉक सारख्या इमारती देशासाठी अनेक निर्णय आणि धोरणे ठरवण्यात महत्वाची भूमिका बजावत होत्या. मात्र, त्या इमारती ब्रिटिश साम्राज्याचे प्रतीक म्हणून बांधलेल्या होत्या. या इमारती बांधण्याचा उद्देश भारताला गुलामगिरीच्या बेड्यांमध्ये बांधणे हा होता, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवनच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते.

आज आपण एक नवीन इतिहास घडताना पाहत आहोत. आज विक्रम सवंत २०८२, फाल्गुन कृष्ण पक्ष, विजया एकादशीचा महत्वाचा शुभ दिवस आहे. १३ फेब्रुवारी हा दिवस भारताच्या विकास प्रवासात एक नवीन सुरुवात आहे. विजया एकादशीला आपल्या धर्मग्रंथांमध्ये खूप महत्व आहे. या दिवशी आपण ज्या संकल्पाने पुढे जातो तो निश्चितच विजयाकडे नेतो. आज आपण सर्वजण विकसित भारताच्या ध्येयाने सेवा तीर्थात प्रवेश करत आहोत, असेही ते म्हणले. २०१४ मध्ये देशाने ठरवले की, आता गुलामगिरीची मानसिकता चालणार नाही. ही मानसिकता बदलण्यासाठी आम्ही एक मोहीम सुरू केली आहे. आम्ही शूरांच्या नावाने राष्ट्रीय युद्ध स्मारक उभारले. पोलिसांच्या शौर्याचा सन्मान करण्यासाठी पोलिस स्मारक बांधले. रेसकोर्स रोडचे नाव लोककल्याण मार्ग, असे ठेवण्यात आले. हे केवळ नाव बदलणे नव्हते. सत्तेच्या वृत्तीचे सेवाभावात रूपांतर करण्याचा एक पवित्र प्रयत्न होता, असेही पंतप्रधान म्हणाले.

### १४० कोटी देशवासीयांची स्वप्ने साकार करू

पंतप्रधान पुढे म्हणाले, साउथ ब्लॉक आणि नॉर्थ ब्लॉक सारख्या इमारती ब्रिटीश सरकारच्या स्वप्नांची अंमलबजावणी करण्यासाठी बांधल्या होत्या. परंतु, आज मी अभिमानाने म्हणू शकतो की, सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवनसारख्या नवीन संकुलांची उभारणी भारतीयांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी करण्यात आली आहे येथे घेतलेले निर्णय कोणत्याही महाराजांच्या स्वप्नावर आधारित नसून १४० कोटी देशवासीयांच्या स्वप्नावर आधारित असतील.

**जुन्या इमारती होणार संग्रहालये**

पंतप्रधान पुढे म्हणाले, या घडामोडीदरम्यान जुन्या इमारतीत घालवलेल्या अनेक वर्षांच्या आठवणी निश्चितच आपल्यासोबत असतील. वेगवेगळ्या वेळी तिथे अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आणि तेथूनच देशाला नवीन दिशा मिळाली. ते संकुल, ती इमारत भारताच्या इतिहासाचा एक भाग आहे. त्यामुळे आम्ही ते राष्ट्राला समर्पित संग्रहालयात रूपांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे, असेही त्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

**मंत्रालयातील लिपिक लाच प्रकरण**

# संबंध आढळल्यास राजीनामा : झिरवळ

## राजकीय वातावरण तापले

**◆ मुंबई, १३ फेब्रुवारी**

मंत्रालयातील अन्न व औषध विभागातील लिपिकाच्या लाच प्रकरणाशी माझा काहीच संबंध नाही. या प्रकाराला मी कुणालाही पाठीशी घालणार नाही. मंत्री किंवा माझ्या पीएचा याच्याशी काहीही संबंध नाही. संबंधित अधिकाऱ्याने जी हिंमत केली आहे त्यासाठी त्याला जाब द्यावा लागेल. तसेच, चौकशीत माझा कोणताही संबंध आढळल्यास मी राजीनामा देण्यास तयार आहे, असे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी ठामपणे सांगितले.



राज्याच्या सत्तेचे केंद्र मानल्या जाणाऱ्या मंत्रालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) टाकलेल्या सापळ्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागातील लिपिक राजेंद्र ढेरंगे याला ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने रंगेहात पकडले. ही कारवाई थेट अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयात झाल्याने प्रकरणाला अधिकच राजकीय रंग चढला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका तक्रारदाराचा मेडिकल परवाना निलंबित करण्यात आला होता. तो पुन्हा पूर्ववत करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याने सुरुवातीला ५० हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. नंतर दोघांमध्ये तडजोड होऊन ३५ हजार रुपये देण्याचे ठरले. गुरुवारी सायंकाळी सुमारे ६.०६ वाजता ढेरंगे यांनी आपल्या कार्यालयात ही रक्कम स्वीकारताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. ◀(तभा वृत्तसेवा)

# हत्तींनी तुडविल्याने सहा जण ठार

**◆ रांची, १३ फेब्रुवारी**

झारखंडच्या हजारीबाग जिल्ह्यात शुक्रवारी जंगली हत्तींच्या कळपाने एकाच कुटुंबातील चार जणांसह किमान सहा जणांना पायदळी तुडवून ठार मारल्याची घटना घडली आहे.

गत काही दिवसांपासून अनेक लोकांवर हल्ला करणाऱ्या या कळपाने गुरुवारी रात्री चर्चू ब्लॉकमधील गोंडवार गावात प्रवेश केला व शुक्रवारी पहाटे सहा जणांना पायदळी तुडवून ठार मारले, असे हजारीबाग पूर्व विभागीय वन अधिकारी विकास कुमार उज्ज्वल यांनी सांगितले. मृत्यू झालेल्यांमध्ये एकाच कुटुंबातील चार सदस्यांचा समावेश आहे. एक मूलही गंभीर जखमी झाले आहे. त्या मुलाला रुग्णालयात दाखल केले. ◀(वृत्तसंस्था)

# 'एक देश, एक निवडणूक'मुळे अधिकारांवर परिणाम नाही

### दुरुस्ती संविधानाच्याच कक्षेत : भूषण गवई

**नवी दिल्ली, १३ फेब्रुवारी**

एक देश, एक निवडणुकीमुळे मतदारांच्या अधिकारावर आणि संघराज्यीय संरचनेवर कोणताही परिणाम होणार नाही, असे मत सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी व्यक्त केले आहे.

ते संयुक्त संसदीय समिती (जेपीसी)च्या बैठकीत बोलत होते. त्यांनी असा युक्तिवाद केली की, संविधानानुसार आवश्यक असल्याप्रमाणे निवडणुका एकाच वेळी घेण्याबाबत असा बदल (दुरूस्ती)



लागू करण्याची शक्ती संसदेला आहे. एक देश, एक निवडणूक संदर्भात जेपीसी अंतिम निष्कर्षांच्या जवळ आहे. हा अहवाल मार्चच्या अखेरीस येण्याची शक्यता अनेक माध्यमांकडून वर्तविण्यात येत आहे. सूत्रानुसार, बैठकीत हा मुद्दा उपस्थित झाला की, संविधान नागरिकांना पाच वर्षांच्या पूर्ण कार्यकाळासाठी सरकार निवडण्याचा अधिकार देतो. जर सरकार मध्येच कोसळले आणि उर्वरित कालावधीसाठी निवडणुका झाल्या नाहीत तर मतदारांच्या अधिकारांवर परिणाम होईल का? यावर संविधान (१२९ वी सुधारणा), विधेयक २०२४ पूर्णपणे संवैधानिक कक्षेत असल्याचे न्या. गवई यांनी सांगितले.

एका सदस्याने सरकारच्या जबाबदारीबाबत प्रश्न उपस्थित केला असता ते म्हणाले की, अविश्वास प्रस्तावासारखी संविधानिक साधने तशीच राहतील. जर कोणत्याही सरकारकडे बहुत नसेल तर त्यांना पद सोडावेच लागेल.






# मिनी मंत्रालयांना फेब्रुवारी अखेर मिळणार नवे कारभारी

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे मतदान ७ फेब्रुवारी रोजी पार पडले तर या निवडणुकांचे निकाल ९ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झाले आहेत. निकालानंतर अध्यक्ष आणि गटनेता निवडीसाठी साधारणपणे पुढील १५ ते २१ दिवसांचा कालावधी असतो. यामुळे जिल्हा प्रशासन स्तरावरून अध्यक्ष, सभापती निवड प्रक्रिया पार पाडण्यासाठी सध्या शासन आदेशाची सर्वजण वाट पाहत आहेत. पुढील आठवड्यात विभागीय स्तरावरून त्या-त्या जिल्ह्याला हे मित्र मिळेल आणि या महिनाखेरपर्यंत या निवडी पार पडण्याचा अंदाज उपजिल्हाधिकारी (महसूल) संतोषकुमार देशमुख यांनी व्यक्त केला. यामुळे या महिनाखेरपर्यंत राज्यातील १२ जिल्हा परिषदांना अध्यक्ष आणि १२५ पंचायत समित्यांना सभापती मिळणार आहेत.



**› जिल्हा प्रशासनाला विभागीय पत्राची प्रतिक्षा**
**› पक्ष पातळीवर गटनेता निवडीच्या नावांची चर्चा**

निवडून आलेल्या सदस्यांची नावे ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केली आहेत. या नूतन सदस्यांनी पहिली बैठक महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ नुसार, निकालानंतर त्या-त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारीही लवकरात लवकर घेणार आहेत. दरम्यान, सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना शासनाच्या पत्राची सध्या प्रतिक्षा असून, हे पत्र पुढील आठवड्यात मिळण्याची शक्यता आहे. हे पत्र जिल्हा प्रशासनाला मिळताच त्या आदेशाची प्रत राजकीय पक्षांना दिली जाते. सध्या १२ जिल्ह्यांमध्ये ही प्रक्रिया सुरू होत असून फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत बहुतांश ठिकाणी नवे अध्यक्ष मिळतील असा अंदाज व्यक्त होत आहे.

यामुळे त्या-त्या जिल्हाधिकाऱ्यांकडून राजकीय पक्षप्रमुखांना शासनाकडून आलेले अध्यक्ष निवडीचे पत्र मिळताच राजकीय पक्ष प्रमुख त्यांच्या निवडून आलेल्या सदस्यांची बैठक घेतात. या बैठकीत बहुमताने एका सदस्याची 'गटनेता' म्हणून निवड केली जाते. यानंतर या निवडीचे पत्र संबंधित पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांच्या स्वाक्षरीने जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावे लागते. या बैठकीत राज्य सरकारने ठरवल्याप्रमाणे अनुसूचित जाती, जमाती, मागास प्रवर्ग आणि महिलांसाठी अध्यक्षांचे पद राखीव असू शकते. पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्ह्यांमध्ये ही प्रक्रिया आता वेग घेत आहे. इतर २० जिल्ह्यांच्या निवडणुका अजून बाकी असल्याने, तेथील निवड प्रक्रिया दुसऱ्या टप्प्यात पार पडणार आहे.

**जिल्हा प्रशासनाच्या पत्राची आम्ही वाट पाहतोय**

जिल्हा परिषद प्रशासनाकडून आमच्या पक्षाकडे अजून काही पत्र आले नसून, याच पत्राची आम्ही सध्या वाट पाहत आहोत. हे पत्र मिळाल्यावर आम्ही गटनेता निवडीसाठी बैठक घेवून त्याचा अहवाल प्रदेश पातळीवर पाठविणार आहोत. अध्यक्ष निवडीसाठी व्हिप प्रक्रिया पार पडल्यावर तसे पत्रही प्रदेश पातळीवरून आम्ही जिल्हा प्रशासनाला देतो. ही पदाधिकारी निवड प्रक्रिया या महिनाखेरपर्यंत पार पडणार आहे, असे भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी सांगितले.

### 'त्या' पत्रात कोणत्या बाबी नमूद असतात

जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीसाठी ज्या-त्या जिल्ह्याच्या विभागीय आयुक्तांकडून जिल्हाधिकाऱ्यांना प्राप्त होणाऱ्या अधिकृत पत्रात प्रामुख्याने बैठकीचा दिनांक आणि वेळ असतो. निवडून आलेल्या सदस्यांच्या पहिल्या बैठकीची निश्चित तारीख आणि वेळ पत्रात स्पष्ट केलेली असते. याच पत्राचा मुख्य विषय जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवड असा असतो.याचबरोबर राज्य शासनाने राजपत्रित केल्यानुसार, संबंधित जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद कोणत्या प्रवर्गासाठी राखीव आहे, याचा स्पष्ट उल्लेख असतो. तर जिल्हाधिकाऱ्यांनी या निवडीच्या विशेष सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहावे, असे निर्देश पत्रात दिलेले असतात. नामनिर्देशन पत्र (अर्ज) भरण्याची वेळ, छाननी आणि आवश्यक असल्यास प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया कशी राबवायची, याचे वेळापत्रक किंवा मार्गदर्शक सूचना पत्रासोबत जोडलेल्या असतात. निवडीची प्रक्रिया ही महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील तरतुदींनुसार पार पाडावी, असा कायदेशीर संदर्भ पत्रात असतो.




CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्यात ३६५ कोटींची अतिरिक्त मागणी

- सोलापूरसाठी मुख्यमंत्री फडणवीस सकारात्मक
- पालकमंत्र्यांच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

जिल्हा वार्षिक योजनेच्या मूळ ६९३ कोटीच्या आराखड्यास सोलापूर जिल्ह्यासाठी अतिरिक ३०० कोटी आणि वारीतील कायमस्वरूपीच्या उपायोजनासाठी ६५ कोटी रुपये देण्याची मागणी जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा वित्त विभागाचे प्रमुख देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

सोलापूर जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नव्याने पदाधिकारी आले असून, विकासासाठी अतिरिक्त निधी देण्याची मागणी गोरे यांनी केली होती. त्याला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून सोलापूर जिल्ह्याला अतिरिक्त ३६५ कोटी रुपये मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सोलापूर जिल्हा वार्षिक योजनेची बैठक नुकतीच पार पडली होती यावेळी ६९३ कोटीच्या आराखड्याला जिल्हा नियोजन मंडळात मंजुरी देण्यात आली होती; हा आराखडा राज्य शासनाला सादर करण्यात आला. गुरुवारी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा वार्षिक योजनेच्या बैठकीत सोलापूर जिल्ह्याला ३०० कोटी रुपये अतिरिक विकास निधी द्यावा, अशी मागणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी आराखड्याची सविस्तर मांडणी केली.



**नूतन सदस्यांना मिळणार गिफ्ट :** नुकत्याच निवडून आलेल्या जिल्हा परिषद, महापालिका व पंचायत समितीच्या सदस्यांना आपल्या भागाच्या विकासासाठी अतिरिक्त निधी मिळावा, यासाठी पालकमंत्र्यांनी ३०० कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी केली असून, मुख्यमंत्र्यांनी त्यांना सकारात्मकता दर्शवली आहे. त्यामुळे सदस्यांना विकासासाठी पालकमंत्र्याकडून गिफ्ट मिळणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

काही दिवसापूर्वी सोलापूर जिल्ह्यात महापूर आला होता. यावेळी रस्ते, गटारी, शाळा, इलेक्ट्रिक पोल तसेच जमिनींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते त्या ठिकाणी मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करण्यासाठी ३०० कोटी रुपये तर पंढरपूर येथील वारीसाठी कायमस्वरूपी उपाय योजना करण्यासाठी अतिरिक्त ६५ कोटी रुपयांचा निधी द्यावा अशी मागणी गोरे यांनी केली. तसेच तसेच सोलापूर शहरातील रस्ते व इतर पायाभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी केली तर ग्रामीण भागात शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक डीपीची मोठी समस्या असून त्यासाठी विशेष तरतूद करण्याची मागणी आमदार समाधान आवताडे यांनी लावून धरली. सोलापूर जिल्ह्यात महापालिका जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका पार पडले आहेत. या ठिकाणी नव्याने पदाधिकारी आले आहेत.

त्यांनाही विकासासाठी निधी द्यावा लागणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक विचार करून अतिरिक्त ३६५ कोटी रुपये सोलापूर जिल्ह्याला द्यावेत अशी मागणी लावून धरण्यात आली या मागणीला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरच हा निधी मंजूर करण्यात येईल अशी माहिती पालकमंत्री गोरे यांनी दिली आहे. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, धैर्यशील मोहिते पाटील, आ. देवेंद्र कोठे, आमदार समाधान आवताडे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांच्यासह सोलापूरतील प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

---

## महत्वाचे...



### नागेश करजगी ऑर्किड स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

नागेश करजगी ऑर्किड स्कलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनपटाला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ख्रिस्तोफर रेनेहान, डॉ.माधवी रायते, चंद्रिका चौहान, नूतन नगरसेविका रंजिता चाकोते, संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा वर्षा विभुते, स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, शाळेचे सल्लागार डॉ. बंडोपंत पाटील, प्राचार्या रुपाली हजारे, ज्यू.कॉलेजच्या प्राचार्या स्मिता कुलकर्णी, स्कूलच्या मार्गदर्शिका मीना पारखे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्व. नागेश अण्णा करजगी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. दोन दिवस चाललेल्या या स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थ्यांनी लोकगीते, लोकनृत्य, शेतकरी गीते, लावणी, रिमिक्स गीते, देशभक्तीपर गीते, सोलापूरचे ग्राम दैवत सिद्धरामेश्वर यांचे नंदिध्वज दर्शन व छत्रपती संभाजी महाराज यांचा जीवनपट सादर करण्यात आला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शाळेतील वैष्णवी शिंदे, स्नेहल डोके, शौर्या मंठाळकर, दुर्वा आनंदकर, संज्ञा मोहिते, उत्कर्षा जाधव, संस्कृती बिडवे, श्रेया कुसेकर, सोनल कोकटनूर, नव्या गुप्ता, कनक गांधी,आर्या गिराम, ऋचा झरडे, श्रावणी जगताप व पार्श्व पाटील, श्रेयस सावंत, आशिष नरोणे, गणेश शिंदे, सुयश आवताडे, नैतिक दरगड, अमित डोके, अथर्व दोड्याळे या विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षिका प्रिसिला असादे यांनी केले.



### काँग्रेस पक्ष गाव तेथे शाखा उभारणार : सातलिंग शटगार

**दक्षिण सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. तरी काँग्रेस पक्षाचे उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खचून न जाता काँग्रेसची विचारधारा घेऊन खेडो-पाडी,वाडी, वस्ती पिंजून काढून गाव तेथे काँग्रेस पक्षाची शाखा स्थापना करून पुन्हा जिल्ह्यात काँग्रेस उभा करणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी दिली. दक्षिण सोलापूर तालुका काँग्रेसची चिंतन बैठक काँग्रेस भवन येथे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी प्रदेश सचिव सुरेश हावळे, तालुका अध्यक्ष भीमाशंकर जमादार, उपाध्यक्ष सिकंदरताज पाटील, ॲड. संजय गायकवाड, मोतीराम चव्हाण, सिद्राम पवार, ॲड. चिदानंद सुंटे, रावसाहेब व्हनमाने, संजय राठोड, प्रशांत कांबळे, किरण सुर्वे, अमीर शेख, असलम शेख, दत्ता पवार, युवराज कापसे, सलीम शेख, राजकुमार राठोड, लखन चव्हाण उपस्थित होते.



### छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच काम कौतुकास्पद : महापौर कोंडयाल

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

सर्व जातीधर्मियांना सोबत घेऊन, महापुरुषांना अभिप्रेत अस काम करत शहराची एकता शांतता प्रस्थापित करण्याच काम मुस्लिम ब्रिगेडकडून होत असून हे कौतुकास्पद आहे. याचा मला अभिमान वाटत आहे, असे मत महापौर विनायक कोंडयाल यानी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने नूतन महापौर, उपमहापौर आणि नगरसेवकांचा सत्कार केएमसी गार्डन येथे माजी महापौर अरिफ शेख यांच्या हस्ते आणि राजन जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर, मनोरमा सपाटे, अकिला भागानगरी, वाहेदा भंडाले, सोफीया चौधरी, श्रीदेवी फुलारी, अमोल शिंदे, अमर पुदाले, विनोद भोसले, अजहर हुंडेकरी, गौतम कसबे, युवराज सरवदे, अनिकेत पिसे, बाबा अडेवाले, शिवाजी वाघमोडे, सिध्दार्थ मंजेली, शिवजन्मोसत्व महामंडळचे अध्यक्ष जयवंत सलगर, राष्ट्रीय बॉडी बिल्डरपटू भागवत शिंदे, असिफ पठाण यादींचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुनाफ चौधरी, माजी प्राचार्य दलाल, इम्तियाज कमिशनर, अल्ताफ लिंबूवाले मुबीन सय्यद हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मुस्लिम ब्रिगेड शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान जिल्हाध्यक्ष शफीक रचभरे, राम गायकवाड, जावेद बद्दी, बशीर सय्यद, तन्वीर गुलजार, गफूर शेख, रिजवान शेख, हारिस शेख, रुस्तुम शेख, मुबीन शेख, शबिर फुलमामडी, अमजद पठाण, उजेर बागवान, फुरखान बॉम्बे, अफान बागवान आदी उपस्थित होते.



### प्रभाग २४ मध्ये दिनदयाळ उपाध्याय आत्मसमर्पण अभिवादन

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

सोलापूरमधील प्रभाग क्रमांक २४ येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या आत्मसमर्पण दिनानिमित्त विविध मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आला. याप्रसंगी नगरसेविका वनिता पाटील, नगरसेवक मधुसूदन जंगम, संतोष पाटील, विशाल गायकवाड ,छगन करडे, रोहित तळोळकर, राजेंद्र गुटर , अरविंद रावळ, बबनराव खंडागळे, तावसे चाबुकस्वार उपस्थित होते

---

## साई व्हिजन स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

साई व्हिजन इंग्लिश मिडीयम स्कूल, आहेरवाडी या शाळेचे स्नेहसंमेलन विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला.

याचे उद्घाटन पुण्यश्लोक आहित्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी नगरसेविका अश्विनी चव्हाण, शिक्षण विस्तार अधिकारी सैपन आळगी, संदीप पाटील, स्नेहा पाटील, सुशील काळे उपस्थित होते. सुरवातीला शाळेतील विविध खेळातील प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मेडल्स देऊन गौरविले. याशिवाय फौंडेशनच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारे साहित्य पुरस्कार ज्येष्ठ कवयित्र रेणुका बुधाराम यांना यंदाचा सह्याद्री साहित्य पुरस्कार क्रीडा क्षेत्रातील लगमण्णा माळी जे अंतरराष्ट्रीय मॅरेथानपटू ज्यांनी आफ्रिकेतील मॅरेथान स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व केले. त्यांना सह्याद्री क्रीडा पुरस्कार तर गजानन पाटील संस्थापक अध्यक्ष आरबीआय स्कूल, सिध्दापूर येथे ते कार्य करीत आहे. त्यांना यंदाचा सह्याद्री शैक्षणिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याशिवाय आदर्श विद्यार्थ यश कोणदे, आदर्श विद्यार्थीनी श्रावणी दिंडोरे तर आदर्श पालक म्हणून सिध्दाराम कुरे यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक तथा सचिव सुधाकर काळे, रेश्मा मशाळे, संगीता कुसगले, सलमा पिंजारी, मोहिनी देशमुख, राजश्री देशमुख, राणी बिराजदार यांनी परिश्रम घेतले.

---



## जिल्हा परिषद सेवाकर्मी कार्यक्रम गुणांकनात अव्वल

▸▸कर्मचाऱ्यांकडून अधिकाऱ्यांचा गौरव; सीईओ कुलदिप जंगम, स्मिता पाटील यांनी मानले आभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

सेवाकर्मी कार्यक्रमाच्या गुणांकनामध्ये सोलापूर जिल्हा परिषदेने प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे. सर्व संवर्गांची अद्ययावत व ज्येष्ठता सूची, पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती, सरळ सेवा नियुक्ती, रिक्त पदांची अद्ययावत माहिती, बिंदू नामावली प्रमाणीकरण, अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया, आय-गोट पोर्टलवर १००% नोंदणी तसेच सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तिकांचे अद्ययावत करणे आदी सर्व निकषांवर सोलापूर जिल्हा परिषदेने आपली प्रशासकीय गुणवत्ता सिद्ध केली आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचा सर्व महिला कर्मचारी वर्गाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांचा सर्व कर्मचारी पुरुष बांधवांच्या वतीने सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या गौरव सोहळ्यास कुलदीप जंगम (मुख्य कार्यकारी अधिकारी), चंद्रशेखर जगताप (प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), स्मिता पाटील (उपमुख्य कार्यकारी अधिकारी - प्रशासन), मीनाक्षी वाकडे (मुख्य लेखा व वित्त अधिकारी), संतोष कुलकर्णी (कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग) आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार सर्व कर्मचारी बांधवांच्या वतीने करण्यात आला.

महाराष्ट्रातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या कार्यालयांमध्ये सोलापूर जिल्हा परिषदेचे नाव प्रथम क्रमांकावर झळकल्याने संपूर्ण जिल्ह्यासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे. या यशामागे प्रशासनातील पारदर्शकता, काटेकोर नियोजन, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि अधिकारी-कर्मचारी वर्गाची एकजूट हे महत्त्वाचे घटक ठरले आहेत.या यशात मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा कुलदीप जंगम यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये अविनाश गोडसे, सचिन साळुंखे, हनुमंत गायकवाड, श्रीधर कलशेट्टी, वैशाली रामपुरे, ममता काशेट्टी, नरेंद्र अकेले, महेश केंद्रे, शिवाजी राठोड, अरविंदकुमार सोनवणे, प्रदीप सगट, रामचंद्र गुरव, अर्चना निराळी, अश्विनी मुळीक, विजय पाटील, प्रतीक्षा कांबळे, नरसिंह गायकवाड, मनोज वडगावे, बसवराज भेंडी, जनबसव्वा, कल्याण अक्षय सोनकांबळे, वैशाली शिंदे, शाहू गायकवाड, लक्ष्मी शिंदे, संजय गौडगाव, वीरपक्षया स्वामी, अंजली पेठकर,श्रीदेवी महामुरे, साहेबराव देशमुख, बसवराज स्वामी, विक्रम शहा, रवी करजगी, पद्माकर बनसोडे, लक्ष्मण झिपरे, महेंद्र माने, रेवणसिद्ध म्हेत्रे आदी कर्मचारी बांधवांचा सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, सचिन साळुंखे व सर्व कर्मचारी वर्गाने विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन महताब शेख यांनी केले.

---



## सिद्धेश्वर मॉन्टेसरी स्कूलचे राष्ट्रीय रंगोत्सव स्पर्धेमध्ये यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

श्री सिद्धेश्वर मॉन्टेसरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय रंगोत्सव स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये १०१ विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळवली त्यात इयत्ता चवथी मधील चैतन्य सूर्यकांत आलेगा याने राष्ट्रीय स्तरावर चौथा क्रमांक मिळवत कलरिंग कीटच्या स्वरुपात पारितोषिक मिळविले.

तसेच विद्यार्थ्यानी सुवर्ण पदके, २६ विद्यार्थ्यानी रौप्य पदके, विद्यार्थ्यानी कांस्यपदके मिळवली. तसेच या उत्तेजनार्थ पारितोषिके विद्यार्थ्यांनी मिळवली. या विद्यार्थ्यांना कलाशिक्षिका तेजस्विनी भुर्के यांचे मार्गदश लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे यांचे अभिनंदन सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, श्री. सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य विलास कारभारी भीमाशंकर पटणे, ॲड. रेवणसिद्ध पाटील, गुरुराज माळगे, राजशेखर येळीकर, प्रो. सी.बी. नाडगौडा, पशुपतिनाथ माशाळ, प्रभुराज मैंदर्गीकर, समन्वयक संतोष पाटील व मुख्याध्यापिका उमा बागलकोटी आणि शैक्षणिक प्रमुख गीतांजली अलमेलकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---

## ‘रोटरी’तर्फे व्होकेशनल पुरस्कारांचे वितरण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीच्यावतीने विविध व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय व समाजोपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तींना व्होकेशनल सर्विस अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. मोहन देशपांडे तसेच असिस्टंट गव्हर्नर अजय डोईजोडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष अकबरसाहेब नदाफ यांनी प्रमुख पाहुणे व असिस्टंट गव्हर्नर यांचे स्वागत केले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रोपाला पाणी घालून सुरुवात करण्यात आली.

यावेळी अवॉर्ड विजेते समृद्धी हर्षद क्षीरसागर (प्रोफेशनल मेकअप आर्टिस्ट), मनोज सोनवणे (पेंटर), रसूल एन. शेख (मेकॅनिक), मनोज महाले (आपे ऑटो रिक्षा - मेकॅनिक) आणि इर्शाद सय्यद (फॅब्रिकेशन) यांना त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत व्होकेशनल सर्विस अवॉर्ड प्रदान करण्यात आले. तसेच महेश साळुंके यांची असिस्टंट गव्हर्नर पदी , रोट. नागेश शेंडगे यांची डिस्ट्रिक्ट चेअर - व्होकेशनल सर्व्हिस डायरेक्टर तसेच रोट. सत्यम दूधनकर यांची डिस्ट्रिक्ट चेअर-डिझास्टर मॅनेजमेंट या पदासाठी निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला आणि रोटे. सलीम जमादार व रोटे विशाल कोतम यांचे रोटरीत नवीन सदस्य सामील झाले म्हणून म्हणून सत्कार करण्यात आला. पुरस्कार विजेत्यांचा परिचय व्होकेशनल सर्व्हिस डायरेक्टर रोट. समीर नदाफ यांनी करून देत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. शिवगंगा मैदर्गी, इकबाल बागबान, भारत कदम उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वाती मानसावाले तर आभार रोट. बसवराज बिराजदार यांनी मानले.

---

## आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्या नावे फेक फेसबुक अकाउंटच्या माध्यमातून पैशांची मागणी

- महापालिका आयुक्तांनी नागरिकांना केले आवाहन
- सायबर पोलिसांकडे दाखल केली तक्रार




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या नावाने आणि छायाचित्राचा वापर करून अज्ञात व्यक्तीने व्हाट्सप व फेसबुक या सोशल मीडिया ॲपवर बनावट फेसबुक अकाउंट तयार केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या फेक अकाउंटच्या माध्यमातून काही नागरिक, मित्रपरिवार आणि नातेवाईक यांच्याशी चॅट तसेच फोन करून पैशांची मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या प्रकाराबाबत आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या नावाचा आणि फोटोचा गैरवापर करून आर्थिक फसवणूक करण्याचा हा प्रयत्न असून नागरिकांनी अशा कोणत्याही संदेशांवर किंवा फोनवर विश्वास ठेवू नये. संबंधित बनावट खात्याशी कोणताही व्यवहार करू नये, तसेच त्वरित सायबर पोलिसांकडे कळवावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. दरम्यान, हा प्रकार सायबर गुन्ह्याच्या स्वरूपाचा असल्याने संबंधितांविरोधात कारवाईसाठी सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि सोशल मीडियावरून येणाऱ्या संशयास्पद मागण्यांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.

ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून संबंधित व्यक्ती नागरिकांची दिशाभूल करून आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न करत आहे. माझ्या नावाचा व छायाचित्राचा गैरवापर करून करण्यात येणारी ही कृत्ये माझ्या वैयक्तिक व प्रशासकीय प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणारी आहेत. सदर प्रकार हा सायबर गुन्ह्याच्या श्रेणीत मोडत असून याबाबत संबंधित सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया करण्यात आली आहे, असेही महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी स्पष्ट केले आहे.

---

## हरित सोलापूरचा केला संकल्प

### उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते वृक्षारोपणाने सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

शहरातील वाढते प्रदूषण, तापमानवाढ आणि पर्यावरणीय असमतोल लक्षात घेता सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने हरित सोलापूरच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या ‘हरित संकल्पना’ उपक्रमातून आज वृक्षारोपण करून मोहिमेची उत्साहात सुरुवात करण्यात आली. विविध देशी व पर्यावरणपूरक वृक्षांचे रोपण करत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.



याप्रसंगी महापौर विनायक कोंड्याल, नगरसेवक जीवन चाबुकस्वार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, नगर अभियंता सारिका आकुलवार, उद्यान अधीक्षक स्वप्निल सोलंनकर, पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर यांच्यासह अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी महापौर कै. जनार्दन कारमपुरी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक झाड लावून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपमहापौर देवकर म्हणाल्या की,वृक्षारोपण हे केवळ एकदिवसीय कार्यक्रम न राहता वृक्षसंवर्धन व संगोपनावर भर देणे आवश्यक आहे.आगामी काळात वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती मोहिमा व शाळा-महाविद्यालयांत सहभागात्मक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. महापौर कोंड्याल यांनी नागरिकांनी वृक्षांचे संरक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षा दल हाय अलर्टवर

**जम्मू** : काश्मीर खोऱ्यात संभाव्य दहशतवादी हल्ल्यांचा इशारा मिळाल्यानंतर सुरक्षा दलांना हाय अलर्ट करण्यात आले आहे. गुप्तचर संस्थांना मिळालेल्या माहितीनुसार, १४ फेब्रुवारी २०२६ ला दहशतवादी हल्ल्यांचा धोका असू शकतो. या दिवशी आयईडी, वाहनांवर बसवलेले आयईडी, ग्रेनेड किंवा लक्षित हल्ले होऊ शकतात, असा इशारा सुरक्षा दलांना दिला आहे. परिणामी, जम्मू व काश्मीरमध्ये राष्ट्रीय महामार्गांवर आणि गर्दीच्या बाजारपेठांमध्ये सुरक्षा अधिक कडक करण्यात आली आहे. पोलिस आणि सीआरपीएफ कर्मचाऱ्यांनी ड्रोन आणि सीसीटीव्हीच्या सहाय्याने प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवले आहे. सर्व सुरक्षा दल हाय अलर्टवर असून, लोकांना शांती आणि नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

### रेल्वेमध्ये आढळला गळफास लावलेला मृतदेह

**रक्सौल** : आनंद विहार टर्मिनलहून आलेल्या सत्याग्रह एक्सप्रेसमध्ये एकाने गळफास लावून आत्महत्या केली. रेल्वे वॉशिंग पिटवर आणल्यानंतर स्लीपर कोचमध्ये व्यक्तीचा मृतदेह लोखंडी साखळीला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. या घटनेमुळे स्टेशन परिसरात एकच खळबळ उडाली. हा प्रकार रेल्वे कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तातडीने आरपीएफ आणि रेल्वे पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पुढील तपास सुरू केला. मृताची ओळख अद्याप पटलेली नाही. बेतिया येथील रेल्वे डीएसपी राजेश कुमार यांनी न्यायवैद्यक पथकासह कोचची पाहणी केली. प्राथमिक तपासात शरीरावर कोणत्याही प्रकारच्या जखमा आढळल्या नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

### बेंगळुरूजवळील अपघातात सात जणांचा मृत्यू


**बेंगळुरू** : बेंगळुरूच्या बाहेरील होस्कोट परिसरात शुक्रवारी सकाळी झालेल्या भीषण रस्ता अपघातात सात जणांचा मृत्यू झाला. होस्कोट-दबासपेटे राष्ट्रीय महामार्गावरील एम. सत्यावरा गावाजवळ कार, दुचाकी आणि कॅन्टर वाहन यांच्यात धडक झाली. प्राथमिक माहितीनुसार, होस्कोटहून देवनहल्लीच्या दिशेने जाणाऱ्या कारने मागून एका दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेनंतर कारवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि समोरून येणाऱ्या कॅन्टरला जाऊन आदळले. यानंतर आणखी एका कारलाही धडक बसली. यात कारमधील सहा प्रवाशांचा आणि दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांच्या प्राथमिक तपासात अतिवेग हा अपघाताचे मुख्य कारण असल्याचे समोर आले आहे.

### वाराणसी न्यायालयाला बॉम्बने उडविण्याची धमकी

**वाराणसी** : उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील कचेरी परिसराला बॉम्बस्फोटाची धमकी देण्यात आल्याने शुक्रवारी सकाळी मोठी खळबळ उडाली. जिल्हा न्यायाधीशांच्या अधिकृत ई-मेल आयडीवर पाठवण्यात आलेल्या धमकीच्या संदेशानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत संपूर्ण कचेरी परिसर रिकामा केला. बॉम्ब निकामी पथक आणि दहशतवादविरोधी पथक (एटीएस) घटनास्थळी दाखल होऊन सखोल तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी सेंट्रल बार असोसिएशनकडून वकिलांना एक सूचना जारी करण्यात आली. या सूचनेत दुपारी एक वाजता कचेरी परिसर बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे मिळाल्याचे नमूद करण्यात आले होते तसेच सर्व वकिलांनी आणि नागरिकांनी तातडीने परिसर खाली करून पोलिसांच्या तपासात सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८२,६२६.७६ (-१,०४८.१६) |
| निफ्टी | २५,४७१.१० (-३३६.१०) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,५७,४०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. २,६४,३०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३४.३ | १९.० |
| अमरावती | ३५.६ | १६.१ |
| भंडारा | ३१.६ | १८.६ |
| बुलडाणा | ३३.६ | १८.७ |
| चंद्रपूर | ३३.२ | १८.४ |
| गडचिरोली | ३१.४ | १५.४ |
| गोंदिया | ३२.२ | १५.० |
| नागपूर | ३२.६ | १६.६ |
| वर्धा | ३३.२ | १७.४ |
| वाशीम | ३२.४ | १५.८ |
| यवतमाळ | ३३.२ | १५.२ |

# एपस्टीन नव्हे, 'पाटकर फाईल्स'वर बोला

### भारतीय जनता पार्टीचा उबाठावर पलटवार

◆ **मुंबई, १३ फेब्रुवारी**

एपस्टीन प्रकरणावरून भाजपाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न करणाऱ्या उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी आधी 'पाटकर फाईल्स'वर भूमिका स्पष्ट करावी, असा जोरदार पलटवार भाजपा माध्यम विभाग प्रमुख, नगरसेवक नवनाथ बन यांनी केला. महिलांवरील छळ आणि गैरव्यवहारांबाबत उबाठा गटाने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी करत त्यांनी राऊतांवर टीकास्त्र सोडले.

शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना बन म्हणाले की, एपस्टीन फाईल्सशी भाजपाच्या कोणत्याही नेत्याचा संबंध नाही, हे जनतेला ठाऊक आहे. मात्र, 'पाटकर फाईल्स'च्या माध्यमातून महिलांना कसा त्रास दिला गेला, हे संपूर्ण महाराष्ट्रासमोर आले आहे. त्यामुळे एपस्टीनचा मुद्दा पुढे करून दिशाभूल करण्याऐवजी पाटकर प्रकरणावर आधी बोलावे.

#### परभणीत 'बाणाऐवजी खान'

परभणीतील महापौर निवडीवरूनही बन यांनी उबाठा गटावर टीका केली. निष्ठावंत शिवसैनिकाला महापौर केल्याचा दावा करणाऱ्या राऊतांनी 'बाणाऐवजी खान'ची निवड का केली, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मुस्लिम महापौर होण्याबाबत भाजपाला आक्षेप नसल्याचे स्पष्ट करताना, औरंगजेब-अफजलखान अजेंडा पुढे नेण्यास विरोध असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

'चले जाव'चा आदेश मतदारांनीच दिला

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'चले जाव' म्हणणाऱ्या राऊतांना मतदारांनीच वारंवार नाकारून उबाठा गटाला 'चले जाव'चा आदेश दिला आहे, असा टोला बन यांनी लगावला. विधानसभेत ९० पैकी २० जागा आणि मुंबईसह २५ महापालिकांमध्ये समाधानकारक कामगिरी न होणे हा जनतेचा स्पष्ट कौल असल्याचा दावा त्यांनी केला. (तभा वृत्तसेवा)

### परभणी महापौरपदावरून उबाठाची भाजपावर टीका

◆ **छत्रपती संभाजीनगर, १३ फेब्रुवारी**

परभणीत उबाठा औरंगजेबाचा अजेंडा राबवित असल्याची टीका भारतीय जनता पार्टीने केल्यानंतर त्याला उबाठानेही प्रत्युत्तर दिले आहे. सत्तेसाठी एमआयएमची मदत घेताना कुठे गेले होते हिंदुत्व, अशी टीका उबाठाने केली आहे.

राज्यातीन दोन महानगरपालिका निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टीने एमआयएमची मदत घेतली आहे. त्यामुळे आम्हाला हिंदुत्व शिकवू नये, असे परभणीचे खासदार संजय जाधव यांनी म्हटले आहे. परभणीच्या महापौरपदी सय्यद इक्बाल यांची निवड झाल्यानंतर भाजपाकडून सातत्याने टीका केली जात आहे. गुरूवारी झालेल्या महापौरपदाच्या निवडणुकीत उबाठाचे उमेदवार इक्बाल यांनी भाजपाचे तिरूमाला खिल्लारे यांचा १३ मतांनी पराभव केला. ''अकोट आणि अचलपूर येथे भाजपाने ज्या प्रकारे एमआयएमचे सहकार्य घेतले, तसे आम्ही केले नाही. इक्बाल हे आमच्या पक्षाच्या तिकिटावर विजयी झाले आहेत. जेव्हा आवश्यकता पडली आहे तेव्हा शिवसैनिकच रस्त्यावर उतरला आहे. आम्हाला हिंदूत्व शिकवू नये,'' अशी टीका जाधव यांनी केली. (वृत्तसंस्था)

#### एमआयएम भाजपाची बी टीम

मतांचे ध्रुवीकरण करण्यासाठी भाजपा एमआयएमचा वापर करून घेत आहे. प्रत्येक निवडणुकीत या पक्षाचा भाजपाला फायदा होतो. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मुस्लिमांनी उबाठाला मदत केली, एमआयएमला नाही. दुसऱ्या वेळेस आम्ही हिंदू महापौर बसवू, असे जाधव यांनी सांगितले.




# बांगलादेश संविधानात सुधारणा करण्यास पाठिंबा

**जनमत चाचणीचा निकाल**
**राज्यसभा स्थापन होणार**
**पंतप्रधानांच्या अधिकाराला कात्री**

◆ **ढाका, १३ फेब्रुवारी**

बांगलादेश निवडणुकीत संविधानात सुधारण्यासाठी जनमत चाचणी घेण्यात आली, याला जनतेने पाठिंबा दिला आहे. निवडणुकीत मतदारांना दोन मते द्यायची होती, एक खासदार निवडीसाठी तर दुसरे मत संविधानात बदल करण्यासाठी होते. जनमत चाचणीत जनतेने संविधानात सुधारणा करण्याच्या बाजूने मतदान केले. त्यामुळे देशात वरिष्ठ सभागृह स्थापन केली जाईल आणि पंतप्रधानांचे अधिकार कमी करण्यासाठी हा निर्णय घेतला जाईल, तसेच राष्ट्रपतींच्या अधिकाराची व्याप्ती वाढणार आहे.

बांगलादेशातील मतदारांनी १२ फेब्रुवारी रोजी दोनदा मतदान केले. एक मत नवीन सरकार निवडण्यासाठी होते आणि दुसरे बांगलादेशच्या संविधानात सुधारणा करण्यासाठी होते. नागरिकांना संविधानात सुधारणा करायची आहे की नाही यावर मतदान करायचे होते. त्यांना हो किंवा नाही असे मत द्यावे लागले. सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी बांगलादेशात राज्यसभा स्थापन केली जाईल. बांगलादेशची सध्याची संसद एकसदनी आहे, म्हणजेच फक्त एकच सभागृह आहे. तथापि, जुलैच्या सनदेत संसद द्विसदनी करण्याचा निर्णय झाला होता. प्रस्तावित वरिष्ठ सभागृहात १०० सदस्य असतील. सार्वत्रिक निवडणुकीत प्रत्येक पक्षाला त्यांच्या जागांच्या प्रमाणात जागा वाटल्या जातील. यामुळे संसदेची शक्ती वाढेल.

#### महाभियोगासाठी दोन तृतीयांश समर्थन आवश्यक

घटनात्मक सुधारणांसाठी कनिष्ठ सभागृहात दोन तृतीयांश बहुमत आणि वरच्या सभागृहात बहुमताची आवश्यक असेल. राष्ट्रपतींवर महाभियोग चालवण्यासाठी दोन्ही सभागृहात दोन तृतीयांश समर्थन आवश्यक असेल. कनिष्ठ सभागृहाचा उपसभापती विरोधी पक्षाचा असेल. एखादी व्यक्ती त्यांच्या आयुष्यात जास्तीत जास्त १० वर्षे पंतप्रधान म्हणून काम करू शकणार आहे.

**महिलांसाठी आरक्षण**

निवडणूक आयोग स्वायत्त केला जाईल आणि काळजीवाहू सरकारची व्यवस्था पुनर्संचयित केली जाईल. महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी संसदेत अधिक आरक्षण असेल. हे बदल २०२४ च्या उठावाच्या मागण्यांमधून आले आहेत. (वृत्तसंस्था)

# सहायक प्राध्यापकांची पदे भरण्यास मिळाली मान्यता

### अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना दिलासा

◆ **मुंबई, १३ फेब्रुवारी**

राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी २०२०) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गातील ५ हजार १२ रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) निर्देशानुसार प्राध्यापकांची रिक्त पदे भरणे अनिवार्य होते. याच पृष्ठभूमीवर हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असल्याचेही ते यावेळी म्हणाले. विद्यार्थी संख्येवर आधारित पदे १ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येनुसार निश्चित झालेल्या कार्यभाराच्या आधारे ही ५,०१२ पदे भरली जातील. ही भरती प्रक्रिया विहित कालमर्यादेत आणि पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबवण्याची जबाबदारी उच्च शिक्षण संचालक (पुणे) आणि विभागीय सहसंचालकांची असणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदांचा सुधारित आराखडा (आकृतीबंध) निश्चित करण्यासाठी उच्च शिक्षण संचालकांच्या स्तरावर एक समिती नियुक्त केली जाणार आहे. (तभा वृत्तसेवा)

#### 'नॅक' मानांकन अनिवार्य

ज्या शैक्षणिक संस्थांकडे 'नॅक' मान्यता आहे, त्यांनाच नवीन पदनिर्मितीचा लाभ मिळेल. मात्र, ज्यांचे मूल्यांकन कमी आहे, त्यांना सुधारणेसाठी तीन वर्षांचा सवलतीचा कालावधी देण्याबाबत शासन स्वतंत्र धोरण आखणार आहे.



सध्या स्वयंपाक घरात स्टीलच्या भांड्यांची चलती असली तरी पारंपरिक तांबे आणि पितळ धातूंच्या भाड्यांचे आकर्षण कमी झालेले नाही. बस्तरमधील जगदलपूर येथील कारखान्यात पितळाच्या भांड्याला आकार देताना कामगार

### अमेरिकेची विमानवाहू नौका इराणकडे रवाना

**वॉशिंग्टन** : इराणसोबतच्या तणावाच्या पृष्ठभूमीवर, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी अमेरिकन वायुदलाला त्यांचे सर्वात मोठी विमानवाहू युद्धनौका मध्य आशियात पाठवण्याचे आदेश दिले. त्यानुसार गुरुवारी यूएसएस जेराल्ड आर. फोर्ट विमानवाहू नौका इराणच्या दिशेने रवाना झाली. अणुकरार आणि इतर अटी मान्य करण्यासाठी इराणवर दबाव वाढविण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेतला आहे. इराणशी चर्चा सुरू असताना, अमेरिकेचे ट्रम्प लष्करी कारवाईची धमकी देत आहेत. दोन्ही देशांमधील वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर, अमेरिका कॅरिबियनमध्ये त्यांचे सर्वात मोठे विमानवाहू नौका तैनात करणार आहे. यापूर्वी इराणच्या सागरी सीमेजवळ यूएसएस अब्राहम लिंकन कॅरियर स्ट्राइक ग्रुप आणि तीन गाईडेड मिसाइल डिस्ट्रॉयर तैनात आहे.

# भारताशी संबंध सुधारण्यावर भर

### विजयानंतर तारिक रहमान यांनी स्पष्ट केली भूमिका

**ढाका, १३ फेब्रुवारी-**

बांगलादेशात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी अर्थात् बीएनपीने अभूतपूर्व विजय मिळवत सत्तास्थापनेसाठी मजबूत बहुमत मिळवले. १७ वर्षांच्या निर्वासनानंतर मायदेशी परतणारे माजी पंतप्रधान दिवंगत खालिदा झिया यांचे पुत्र आणि बीएनपीचे अध्यक्ष तारिक रहमान त्यांच्या नेतृत्वात निवडणूक लढवणाऱ्या पक्षाने कट्टरवादी पक्ष जमात ए इस्लामीचा सुपडा साफ केला.

तारिक रहमान यांनी आपल्या बोगुरा मतदारसंघातून २.१६ लाख मतांनी विजय मिळवला. त्यांच्या प्रमुख प्रतिस्पर्ध्याला जवळपास ९७ हजार मते मिळाली. विजयानंतर त्यांनी भारताशी संबंध सुधारण्यावर भर राहणार असल्याचे स्पष्ट केले.

६०वर्षीय तारिक रहमान बांगलादेश निवडणुकीच्या निकालानंतर पंतप्रधानपदासाठी एक मजबूत उमेदवार म्हणून समोर आले आहेत. झिया यांच्या निधनानंतर, रहमान १७ वर्षांच्या निर्वासनानंतर २५ डिसेंबर रोजी बांगलादेशला परतले. त्यानंतर त्यांना बीएनपी अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले. ते २००८ पासून लंडनमध्ये राहत होते आणि त्यांनी आभासी माध्यमातून पक्षाचे नेतृत्व केले. २००२ मध्ये त्यांना बीएनपीचे वरिष्ठ संयुक्त महासचिव आणि २००९ मध्ये वरिष्ठ उपाध्यक्ष



म्हणून नियुक्त करण्यात आले. २०१८ मध्ये खालिदा झिया यांना तुरुंगात टाकण्यात आले तेव्हा रहमान यांना पक्षाचे कार्यवाहक अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले. १९८८ मध्ये ते पक्षाच्या गबतली उपजिल्हा युनिटचे सामान्य सदस्य म्हणून औपचारिकपणे बीएनपीमध्ये सामील झाले. १९९१ च्या राष्ट्रीय निवडणुकीपूर्वी, त्यांनी देशातील जवळजवळ प्रत्येक जिल्ह्यात खालिदा झिया यांच्यासोबत प्रचार केला.

**तारिक यांचा राजकीय प्रवास**

२० नोव्हेंबर १९६५ रोजी जन्मलेले तारिक रहमान यांनी ढाका विद्यापीठातून शिक्षण घेतले आणि राजकारणात सक्रिय भूमिका बजावण्यास सुरुवात केली. त्यांचे वडील झियाउर रहमान हे बांगलादेशचे अध्यक्ष आणि एक प्रमुख स्वातंत्र्यसैनिक होते, ज्यांची १९८१ मध्ये हत्या झाली. त्यांच्या आई खालिदा झिया यांनी १९९१ ते १९९६ आणि २००१ ते २००६ पर्यंत बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून आणि बीएनपीच्या मुख्य अध्यक्षा म्हणून काम केले.

**वयाच्या चौथ्या वर्षीच भोगला तुरुंगवास**

१९७१ च्या मुक्ती युद्धादरम्यान ते फक्त चार वर्षांचे होते आणि त्यांना काही काळासाठी तुरुंगात टाकण्यात आले होते. त्यांची आई खालिदा झिया बांगलादेशातील लष्करी राजवटीविरुद्ध एक प्रमुख आवाज म्हणून उदयास आला. लष्करी राजवटीविरुद्ध लोकांना एकत्र करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. रहमान यांचे वडील झियाउर रहमान हे लष्करी अधिकारी होते. त्यांचा जन्म १९ जानेवारी १९३६ रोजी बोगरा जिल्ह्यात झाला आणि १९८१ मध्ये त्यांची हत्या झाली. झियाउर रहमान यांनी बांगलादेशच्या १९७१ च्या स्वातंत्र्ययुद्धात महत्त्वाची भूमिका बजावली. तारिक रहमान यांच्या धोरणात्मक आणि करिष्माई भूमिकेने निवडणुकीत बीएनपीने ऐतिहासिक विजय नोंदवला. दीर्घ निर्वासन आणि राजकीय आव्हानांना न जुमानता, त्यांनी पक्षाला एकत्र केले, तरुण मतदारांना आकर्षित केले.



बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांचे शुक्रवारी हिमाचल प्रदेशातील कांगडा येथील विमानतळावर आगमन झाले. त्यांच्या स्वागतासाठी जमलेले त्यांचे अनुयायी

# लोहारडोंगरी खाणीला सर्वांचा विरोध

**महाराष्ट्राच्या पुनर्विचार समितीकडे विषय वर्ग** | **आ. सुधीर मुनगंटीवार यांची माहिती**

◆ **चंद्रपूर, १३ फेब्रुवारी**

जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनजवळ ब्रह्मपुरी तालुक्यातील लोह खनिजाची खाण प्रस्तावित आहे. या लोहारडोंगरी खाणीला आमचा सर्वांचा विरोध आहे. महाराष्ट्राच्या पुनर्विचार समितीकडे हा विषय विचाराधीन आहे. जरी या समितीने सहमती दर्शवली, तरी त्याचा अंतिम निर्णय केंद्रात होईल. दरम्यान, न्यायालयाने सुमोटोसंदर्भात रिट स्वीकारली आहे. त्यामुळे न्यायालय ही खाण मान्य करेल असे व्यक्तिशः मला वाटत नाही, असे मत राज्याचे माजी मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी गुरुवारी येथे पत्रकार परिषदेत व्यक्त केले.



ब्रह्मपुरी तालुक्यातील या खाणीला पर्यावरणवाद्यांनी तीव्र विरोध केला आहे. इको-प्रोचे बंडू धोतरे हे येत्या ३ मार्चपासून या खाणीच्या विरोधात अन्नत्याग सत्याग्रह सुरू करीत आहेत. आमचाही या खाणीस विरोध आहे. शिवाय, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या प्रकरणाची दखल घेतली असून आवश्यक ते निर्देश दिले जातील, असे मुनगंटीवार यांनी सांगितले. राज्य



वन्यजीव मंडळाने ब्रह्मपुरी विभागातील लोहारडोंगरी या लोहखनिज प्रकल्पाला मान्यता दिली आहे. मात्र, त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही. (तभा वृत्तसेवा)

# संमेलनांसाठी पाच कोटी जाहीर

### मराठी भाषा संवर्धनासाठी योजना राबविण्यास प्रारंभ

◆ **मुंबई, १३ फेब्रुवारी**

मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्यानंतर राज्य सरकारने मराठी भाषा संवर्धसाठी योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. याचाच भाग म्हणून, राज्यात दरवर्षी विभाग निहाय बाल, युवा, आणि महिलांसाठी चक्राकार पध्दतीने स्वतंत्र संमेलने आयोजित केली जाणार आहेत. त्यासाठी प्रत्येक संमेलनाला पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने या सर्व संमेलनांचे आयोजन करण्यात येणार आहे. सरकारने मराठी भाषा धोरणानुसार ३६ जिल्ह्यात साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या वतीने पाच लाख रुपये अर्थसहाय्य देण्याचे जाहीर केले. बाल, महिला, आणि तरुणांमध्ये मराठी भाषेची रुची व जिज्ञासा निर्माण करण्यासाठी आता स्वतंत्र संमेलने आयोजित केली जाणार आहेत. बारा वर्षाखालील मुलांसाठी बाल संमेलन आयोजित केले जाणार आहे.

संमेलनातील मुलांच्या सहभागातून मराठी भाषेविषयी सहज शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मराठीतील गंमतीदार म्हणी, वाक्यप्रचारांची ओळख, शब्दकोडे, अशा प्रकारचे कल्पक खेळांचे आयोजन या संमेलनात केले जाईल. संमेलनात बालमानसशास्त्रज्ञ तसेच बाल साहित्यिक यांना आमंत्रित केले जाणार आहे. (वृत्तसंस्था)

#### सर्वांगीण विकासावर भर

१५ ते ३० वयोगटातील तरुणांसाठी आयोजित युवा संमेलनात मराठी भाषेच्या माध्यमातून रोजगाराची माहिती दिली जाईल. तरुणांना योग्य दिशा देण्याचे काम या संमेलनातून व्हावे असे अभिप्रेत आहे. महिलांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या संमेलनात महिलांच्या सर्वांगिण विकासाठी विविध क्षेत्रातील संधी उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. राज्यातील अर्धी लोकसंख्या ही महिलांची आहे. मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी या महिला शक्तीचा उपयोग करुन घेतला जावा हा या संमेलन आयोजनामागील उद्देश आहे.

# लोह गोळ्यांच्या सेवनाने १९ विद्यार्थ्यांना विषबाधा

### ताडोबा बफर क्षेत्रातील भामडेळी जि. प. शाळेतील घटना

◆ **चंद्रपूर, १३ फेब्रुवारी**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील भामडेळी येथील जिल्हा परिषद शाळेत १९ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली. लोह गोळ्यांचे सेवन केल्याने या विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले, असे सांगितले जात आहे.

शाळेत दर आठवड्याला व्हिटॅमिनच्या गोळ्या दिल्या जातात. मात्र, काही आठवडे हा पुरवठा झाला नव्हता. बुधवारी एका विद्यार्थिनीने गोळ्यांची मागणी केली असता संबंधित शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याला सहा-सहा गोळ्या घेण्याचे सांगितले. या शिक्षकाच्या सांगण्यावरून विद्यार्थ्यांनी गोळ्यांचे सेवन केले. काही वेळातच विद्यार्थ्यांना उलट्या, चक्कर येणे आणि तीव्र अस्वस्थता जाणवू लागली. शाळा प्रशासनाने तत्काळ रुग्णवाहिका बोलावली. सर्व १९ विद्यार्थ्यांना चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात भरती करण्यात आले आहे.

डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, यापैकी चौघांच्या प्रकृतीचे निरीक्षण केले जात आहे, तर इतरांची प्रकृती स्थीर आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. (तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# संसदीय आणि असंसदीय

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यातील अधिवेशनाची शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) सांगता झाली. दुसऱ्या टप्प्यातील अधिवेशन ९ मार्चपासून सुरू होणार आहे. संसदेची दरवर्षी तीन अधिवेशने होत असतात. त्यातील पावसाळी आणि हिवाळी अधिवेशने सलग होतात, फक्त अर्थसंकल्पीय अधिवेशन दोन टप्प्यांत होत असते. अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने होते. पावसाळी आणि हिवाळी अधिवेशनात राष्ट्रपतींचे असे अभिभाषण होत नाही. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर संसदेच्या दोन्ही सभागृहांत चर्चा होत असते आणि तिला पंतप्रधान उत्तर देत असतात. यावेळी ज्येष्ठांचे सभागृह असलेल्या राज्यसभेत धन्यवाद प्रस्तावावर सुरळीत चर्चा झाली आणि तिला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तरही दिले. कनिष्ठ सभागृह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकसभेत मात्र धन्यवाद प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही. त्यामुळे त्या सभागृहात पंतप्रधानांचे चर्चेच्या उत्तराचे भाषणही होऊ शकले नाही. चर्चा आणि पंतप्रधानांच्या उत्तराशिवायच धन्यवाद प्रस्ताव लोकसभेत पारित करावा लागला. त्यामुळे एक संसदीय परंपरा खंडित झाली. ज्येष्ठांचे सभागृह असलेली राज्यसभा जो संयम आणि सभ्यपणा दाखवू शकली, तसा संयम आणि सभ्यपणा लोकसभेला दाखवता आला नाही, याची सर्वांना खंत वाटत असणार. त्यामागील घटनाक्रम लक्षात घेतला तर काही खटकणाऱ्या बाबी लक्षात येतात.

लोकसभेत या काळात जो घटनाक्रम उद्‌भवला, तो संसदीय लोकशाहीला काळिमा फासणारा होता. लोकसभेतील विरोधी पक्षांच्या विशेषतः काँग्रेसच्या सदस्यांनी जो गोंधळ घातला, तो कुणालाही न पटणारा होता. संसदेच्या दोन्ही सभागृहांत अतिशय संयमाने आणि काळजीपूर्वक शब्द वापरावे लागतात. एखादा शब्द असंसदीय असेल तर तो वापरता येत नाही आणि कुणी अनवधानाने वा जाणीवपूर्वक वापरला तर तो कामकाजातून वगळला जातो. या प्रथेची जराही तमा काँग्रेसने बाळगली नाही. काँग्रेसच्या सदस्यांचे सर्वांत धक्कादायक कृत्य म्हणजे ते पंतप्रधानांच्या आसनाच्या दिशेने धावत गेले. सभागृहात काहीतरी अप्रिय घडवण्याचा त्यांचा प्रयत्न होता, याची कुणकुण लागल्यामुळे आपणच पंतप्रधानांना सभागृहात येण्यापासून रोखले, असा जो गौप्यस्फोट लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी केला, तो ऐकून तर देशवासीयांना जबरदस्त धक्का बसला. बिर्ला यांनी अप्रिय प्रसंग टळला, असे म्हटले असले तरी तो अप्रिय प्रसंग कोणता असू शकतो, याचा अंदाज देशवासीयांना नक्कीच आला आहे. त्यादिवशी लोकसभेत जे घडले, ते पाहून आपण लोकसभेत बसलो आहे, यावर विश्वास बसत नव्हता. जगातील अनेक देशांच्या संसदेत हाणामारी झाल्याचे दृश्य वृत्तवाहिन्यांवर आपण अनेकदा पाहिले आहे. तसाच प्रसंग आपल्याही लोकसभेत घडण्याची स्थिती उद्‌भवली होती, हे पाहून संसदीय लोकशाहीवर प्रेम करणाऱ्यांची मान शरमेने खाली झुकली. ज्या महिलांना संसदेत ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी घटनादुरुस्ती करण्यात आली, त्यातील काही महिला भर सभागृहात असे वागत असतील आणि पंतप्रधानांच्या आसनाच्या दिशेने धावून जात बॅनर फडकवत घोषणाबाजी करत असतील, तर या देशातील संसदीय लोकशाहीचे भवितव्य त्यांच्याच हातून पणाला लावले जात आहे, असे म्हटले जाऊ शकते. सभागृहात विरोधी पक्षांच्या महिला सदस्यांनी पंतप्रधानांवर हल्ला केला असता तर भारतातील लोकप्रतिनिधींना जगात तोंड दाखवायला जागा राहिली नसती. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याबद्दल बोलायला तर शब्दच नाहीत. विरोधी पक्षनेता कसा नसावा, हे राहुल गांधी आपल्या बेजबाबदार वागणुकीने वारंवार दाखवून देत आहेत. देशात आजपर्यंत अनेक विरोधी पक्षनेते झालेत, यातील प्रत्येकाने आपल्या कृतीने आणि भाषणाने त्या पदाची मान उंचावली. पण राहुल गांधी यांच्या कृतीने या पदाचा गौरव कमी झाला. त्यामुळे भाजपाचे निशिकांत दुबे यांनी राहुल गांधी यांच्यासाठी जो विशेष प्रस्ताव आणला, तो योग्यच म्हटला पाहिजे. दुबे यांनी राहुल गांधी यांचे सदस्यत्व रद्द करण्याची तसेच त्यांच्यावर आजीवन निवडणूक लढवण्यावर बंदी घालण्याची मागणी केली आहे, जी योग्य म्हटली पाहिजे. संसदेतील गोंधळाबद्दल विरोधी पक्षांच्या ८ सदस्यांना निलंबित करीत सभापती ओम बिर्ला यांनी सौम्यपणा दाखविला आणि चूक केली, असे म्हणावेसे वाटते. त्यांनी विरोधी पक्षांच्या सर्व सदस्यांना अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीपर्यंतच नव्हे तर लोकसभेच्या उर्वरित कालावधीपर्यंत निलंबित करायला हवे होते. ओम बिर्ला यांनी तसे केले नाही, हा त्यांच्या मनाचा मोठेपणाच. त्यानंतर विरोधकांनीच त्यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल करत आपल्या निर्ढावलेल्या मानसिकतेचे प्रदर्शन केले. सभागृहात सत्तारूढ रालोआचे बहुमत असल्यामुळे हा अविश्वास प्रस्ताव पारित होऊ शकणार नाही, ही गोष्ट वेगळी. पण सभागृहातील चांगुलपणाच्या वागणुकीची शिक्षा विरोधकांनी ओम बिर्ला यांना दिली, हे आक्षेपार्ह म्हटले पाहिजे.

सभागृहातील नवीन विशेषतः विरोधी पक्षांतील जास्तीत जास्त सदस्यांना बोलण्याची संधी ओम बिर्ला देत असतात. पण विरोधी पक्षाच्या या सदस्यांनी कृतघ्नपणाचे प्रदर्शन करत त्यांना पदावरून हटवण्याचे कारस्थान रचले असावे, असे दिसते. सामान्यपणे सभागृहात गोंधळ घालणारे सदस्य सभापतींनी सभागृहाचे कामकाज स्थगित केल्यावर शांत होतात, सभागृहातील तणावाच्या परिस्थितीवर सर्व गटनेते सभापतींच्या दालनात बसून चर्चा करतात आणि तोडगा काढण्याचा प्रयत्न करतात. पण यावेळी नवा धक्कादायक प्रकार समोर आला. सभागृहाचे कामकाज स्थगित झाल्यावर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभापतींच्या दालनात धाव घेत तेथे बिर्ला यांच्याविरुद्धही घोषणाबाजी केली, त्यांना शिवीगाळ केली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी या घटनेचा व्हिडीओ जारी करीत विरोधी पक्ष सदस्यांच्या अनियंत्रित वर्तणुकीचा पर्दाफाश केला, असे म्हणायला पाहिजे. विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभागृहात आक्रमक राहिले पाहिजे, सरकारला धारेवर धरले पाहिजे, हे अपेक्षितच आहे. पण आक्रमकता आणि आक्रस्ताळेपणा यातील फरक विरोधी पक्षांनी लक्षात घेतला पाहिजे. विरोधी सदस्यांचे सभागृहात जे वर्तन आहे, ते आक्रस्ताळेपणाचे आहे. देशातील जनता आपल्याला सातत्याने नाकारत आहे, या निराशेतून आलेले आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष ही संसदीय लोकशाहीच्या रथाची दोन चाके आहेत. ही चाके व्यवस्थित चालत असतील तर संसदीय लोकशाहीचा रथ व्यवस्थित चालू शकेल. अन्यथा हा रथ कोलमडून पडेल. सभागृहाचे कामकाज सुरळीत चालवणे ही सभापतींसोबत सत्तारूढ पक्षाचीही जबाबदारी आहे, असे विरोधी पक्षात असताना भाजपाचे ज्येष्ठ नेते अरुण जेटली नेहमी म्हणत असत. त्यामुळे सत्तारूढ भाजपानेही यादृष्टीने कोणताही पूर्वग्रह न ठेवता चांगली परंपरा निर्माण केली पाहिजे, जेणेकरून विरोधकांना बोट दाखविण्यास जागा उरणार नाही. विरोधी पक्षांना समजून घेण्यात आणि समजावून सांगण्यात आपण कमी पडतो आहे काय, याचा सत्ताधीशांनी विचार केला पाहिजे. लोकसभेचे सभागृह हे चर्चेचे व्यासपीठ आहे. या ठिकाणी जनतेच्या भल्याच्या मुद्यांवर चर्चा होणे अपेक्षित आहे, गुद्यांवर नव्हे. परंतु, विरोधकांनी प्रत्येक वेळी गोष्टी हमरी-तुमरीवर नेल्या. विरोधकांचे वर्तन चांगल्या वातावरणात चर्चा होण्याकरिता पोषक नव्हते. सत्ताधाऱ्यांएवढीच जबाबदारी विरोधकांचीही आहे. त्यांनाही लोकांनी निवडून दिले आहे. लोक सत्ताधाऱ्यांचे वर्तन पाहतात, तसे विरोधकांचेही पाहतात. सत्ताधीशांना जोखत असतात, तसे विरोधकांचेही पाणी आजमावत असतात. शेवटी लोकसभा हे सार्वभौम सभागृह असेल तर त्यातील प्रतिनिधींना निवडून देणारे भारतीय नागरिकही सार्वभौम आहेत. लोकसभेत त्यांच्या हिताच्या मुद्यांवर चर्चा व्हावी आणि त्यासाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्ष अशा दोन्ही बाजूंनी सकारात्मक सहकार्याची भूमिका घेतली जावी, संसदीय वर्तन केले जावे अशी लोकांना अपेक्षा आहे. संसदीय लोकशाहीला अपेक्षित असलेली परिपक्वता दोन्हीकडून दाखविली जाणे अपेक्षित आहे. लोकप्रतिनिधींच्या सभागृहात गोंधळ ही नवी बाब नसली तरी तो सतत होणे हे लोकांनाही आवडलेले नाही, याची नोंद साऱ्यांनी घेतलेली बरी.

## विशेष

# १ १ ४ राफेल विमान खरेदीचा अन्वयार्थ

अभय बाळकृष्ण पटवर्धन



ॲस्ट्रा क्षेपणास्त्र प्रणालीतील १६० किलोमीटरपेक्षा जास्त हवेतून हवेत मारा करणाऱ्या ॲस्ट्रा एमके२ क्षेपणास्त्र आणि ॲस्ट्रा एमके३,३५० किलोमीटर पल्ला, सॉलिड फ्युएल डक्टेड रॅमजेट (एसएफडीआर) क्षेपणास्त्र; २) रुद्रएम स्ट्राईक प्रणालीमधील रुद्रएम-२, एक हायपरसोनिक एरो बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि ५५० किलोमीटरच्या पल्ल्यातील लक्ष्यांवर मारा करण्यास सक्षम रुद्रएम-३ क्षेपणास्त्र व रुद्रएम-४ चे भविष्यातील एकत्रीकरण. एक शक्तिशाली, स्वदेशी रेडिएशन-विरोधी ढाल बनेल. ३) अचूक स्ट्राईक क्षमता या एकत्रीकरण यादीमध्ये तारा प्रिसिजन गाईडेड म्युनिशन; एक हाय स्पीड, रेंज एक्सटेंशन किट सुसज्ज, लो ड्रॅग ग्लाईड स्टँड ऑफ अंतरावर अचूक प्रहार करणारा बॉम्ब ही शस्त्र सामील आहेत.

वाढीव संपर्कामुळे (कनेक्टिव्हिटी) हे विमान मोठ्या लढाऊ नेटवर्कमध्ये डेटा नोडचे काम करेल. ही एक गेम चेंजर आणि संभाव्य संरक्षण गरजांसाठी दीर्घकालीन रणनीतिक गुंतवणूक असेल. राफेल एफ ५ भविष्यातील हवाई लढाऊ वातावरणासाठी डिझाईन केली आहे. त्यांची प्रगत यंत्रणा मानव/मानवरहित निष्ठावंत विंगमन लढाऊ ड्रोन नियंत्रित करेल. यात डेटा फ्यूजन आणि डीप स्ट्राईक क्षमता आहेत. सूत्रांनुसार नवीन जेट्स आवश्यकतेनुसार स्वदेशी शस्त्र एकत्रित करण्यास सक्षम असतील आणि परदेशी मूळच्या इतर विमानांशी अखंड संवाद राखतील. असे असले तरी या कारणास्तव आगामी करारात सोर्स कोड हस्तांतरण अनिवार्य (नॉन निगोशिएबल ट्रान्सफर) असेल.

या करारात मेक इन इंडिया फ्रेमवर्क अंतर्गत भारतीय कंपन्यांना उत्पादन, देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हरहॉल सुविधा, संयुक्त उपक्रम आणि पायाभूत सुविधा विकास यांच्या भागीदारीचा समावेश असणे अनिवार्य असेल. भारतीय वायुसेनेसाठी एकत्रित दृष्टिकोन राष्ट्रीय सुरक्षा धोरणाचा एक महत्त्वाचा घटक आहे. २०६० च्या दशकात ११४ राफेल्स भारतीय वायुसेनेचा कणा असतील. त्यामुळे त्यांच्याभोवती एक सार्वभौम शस्त्रास्त्र परिसंस्था स्थापित करणे आवश्यक आहे. कोणतही लढाऊ विमान, स्वदेशी प्रणालींशी सुसंगत असले तरपरदेशी मूळ उपकरण उत्पादकांवर अवलंबून राहत नाही. ही लवचीकता, बाह्य भू राजकीय घटक/पुरवठा साखळीच्या संभाव्य व्यत्ययांचा धोका टाळेल.

२०० राफेल विमानांच्या खरेदीमुळे चिनी वायुसेना, एरोस्पेस आणि क्षेपणास्त्र परिसंस्था तसेच पाकिस्तानची वृद्धिंगत होत असलेली सामरिक एकात्मता यामुळे निर्माण झालेल्या दोन आघाड्यांवरील वाढत्या लष्करी दबावांना एक कॅलिब्रेटेड धोरणात्मक प्रतिसाद मिळेल. सतत उच्च टेम्पो ऑपरेशन्स सक्षम करता येतील आणि भारतीय लष्कर/वायुसेनेच्या गणितात मूलभूत बदल होईल. ही नेटवर्क केंद्रित इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या लवचीक आणि बहुभूमिका लढाऊ विमान संघर्षाच्या सुरुवातीला हवाई युद्ध क्षेत्राला सक्षम आकार देईल आणि ५० स्क्वॉड्रन फोर्स आर्किटेक्चरमुळे संरचनात्मक परिवर्तन निर्माण होईल. आजमितीला भारतीय वायुसेनेत २९ लढाऊ स्क्वॉड्रन आहेत जे अधिकृत ४२ च्या संख्येपेक्षा खूपच कमी आहे. २०३० च्या दशकाच्या अखेरीस मिग-२१, मिग-२७, जग्वार, मिग-२९ आणि मिराज २००० विमानांच्या निवृत्तीमुळे ही तफावत वाढतच गेली असती.

आज चीनकडे २३०० हून अधिक लढाऊ विमान असून पाकिस्तानकडे जेएफ प्रणालींची २४-२५ स्क्वॉड्रन आहेत. २०३५ च्या सुमारास १२६ भारतीय तेजस एमके २ विमान वायुसेनेत दाखल होतील. २०४० पर्यंत आयएएफ अंदाजे २०० राफेल, १८० तेजस एमके१ए, १२० तेजस एमके२, २०० अपग्रेडेड एसयू ३० एमकेआय आणि प्रारंभिक एएमसीए स्क्वॉड्रन यांचा समावेश असलेला फोर्स मिक्स असेल. या संदर्भात २०० हून अधिक राफेल विमानांमुळे भारताच्या हवाई शक्तीतील धोरणात्मक सक्षम परिवर्तन होऊन ती आगामी काळात भारताच्या हवाई लढाऊ भूमिकेला आकार देईल. वर उल्लेखित सर्व माहिती विविध सूत्र/स्वानुमानांनुसार उद्‌धृत केली आहे. कदाचित हे आकडे अतिशयोक्त आणि इच्छाशक्ती दर्शवणारेही वाटू शकतात. पण अंतिम करारावर स्वाक्षरी होईपर्यंत कुठल्याही प्रकारची अचूक आकडेवारी मिळू शकणार नाही.

या भेटीदरम्यानच हा करार पूर्वीच्या सरकार-ते-सरकार (जीटूजी) मॉडेलच अनुसरण करेल का हे स्पष्ट होईल. अशा मोठ्या करारांचे विविध पैलू, घटक आणि अडचणी सोडविण्यासाठी किमान १२-१८ महिने लागतात. त्यामुळे १८-२० फेब्रुवारी २६ दरम्यान हस्ताक्षर झालेल्या या करारानंतर १८ उड्डाणासाठी तयार राफेल विमानांची पोचवणी (फ्लायअवे एयरक्राफ्ट डिलिव्हरी) २०२८-२९ मध्ये होईल, देशांतर्गत असेंब्ली २०३०-३१ मध्ये सुरू होईल आणि वायुसेनेत भारतातील युनिट्ससह सर्व ११४ विमान यायला किमान २०३५-३६ उजाडण्याची शक्यता आहे. अर्थात ही टाईम फ्रेम; तंत्रज्ञान हस्तांतरण, स्थानिक उत्पादन स्केल क्षमता, संभाव्य एसपी/ऑफसेट्स आणि विमानामधील पार्ट्सची स्थानिक उत्पादन क्षमता किती जलद व कार्यक्षम आहे/असेल यावर अवलंबून असेल. ३६ अब्ज डॉलर्सची राफेल खरेदी मोठी वाटत असली, तरी संरक्षण खरेदीची पूर्ण रक्कम आगाऊ दिली जात नाही. आर्थिक वर्ष आणि त्या पुढे, वायुसेनेच वार्षिक आवंटन ९/१० अब्ज डॉलर्स होईल जे हेलिकॉप्टर, क्षेपणास्त्र, रडार आणि या विमान खरेदीसाठी पर्याप्त असेल. हा करार १० वर्षांचा असेल तर वार्षिक देयक सरासरी ३.६ अब्ज होतील. हा खर्च वायुसेना आवंटनाच्या ३५-४० टक्के असेल आणि इतर गरजांसाठी अंदाजे ५.५-६ अब्ज डॉलर्स उरतील. १५ वर्ष करारात हीच रक्कम २.४ अब्ज आणि ६.५-७.५ अब्ज डॉलर्स असेल. पश्चिमेकडे पाकिस्तान सीमा, उत्तरेकडे चीन सीमा आणि पूर्वेकडे बांगलादेशच्या सीमेवर एकाच वेळी ऑपरेशनसाठी तयारीला भारत प्राधान्य देतो या आव्हानाला तोंड देण्यासाठी, भारतीय वायुसेना आपली अधिकृत संख्या ५० स्क्वॉड्रनपर्यंत वाढविणार आहे. प्रत्येक स्क्वॉड्रनमध्ये साधारणपणे १८ विमाने असतात. त्यामुळे या नवीन संरचनेसाठी प्रशिक्षण आणि राखीव युनिट्स वगळता सुमारे ९०० लढाऊ विमानांची आवश्यकता असणार आहे.

आयात केलेल्या विमानांवरच भारताचे अवलंबित्व; संपूर्ण गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक निर्णय आत्मनिर्भरतेला पूरक ठरेल तरच राफेलची ही आयात परिपूर्ण ठरेल. यामुळे देशांतर्गत आराखडा, उत्पादन आणि इंजिन तंत्रज्ञानावर आधारित एक सार्वभौम लढाऊ विमान परिसंस्था निर्माण होऊन ती भारतासाठी खरी आयात अध्याय असेल/बनेल. २०४०-६० मधील युद्ध हवाई प्लॅटफॉर्मची योजना; मानव/मानवरहित संघटन, एआय चाळीत मिशन व्यवस्थापन, सेन्सर संतृप्ती युद्ध, निर्देशित ऊर्जा शास्त्र, लांब पल्ल्याचा स्टॅन्ड ऑफ वर्चस्व आणि गुप्त/चोर हल्ला या संकल्पनांवर आधारित असल्यामुळे भारतीय वायुसेनेसाठी पाचव्या/सहाव्या जनरेशन विमानांची बांधणी व उत्पादन त्या दिशेने होणे आवश्यक आहे. विमानांची आयात भारताला शस्त्र, सॉफ्टवेअर, स्पेयर पार्टस आणि जीवनचक्र कराराच्या चक्रव्यूहात अडकवत असल्यामुळे भांडवलाचा निचरा होऊन औद्योगिक सार्वभौमत्व कमकुवत होईल आणि आत्मनिर्भयतेला सुरुंग लागेल. राफेल जागतिक दर्जाचे फिफ्थ जनरेशनचे विमान असले तरी ते वायुसेनेच्या विकासाचा पूल (ब्रिज) आहे. गंतव्य स्थान (एंड स्टॉप) नाही. **(समाप्त)**

(लेखक निवृत्त कर्नल आहेत.)
९४२२१४९८७६

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# रडून मदत घेणारे धन्यवाद विसरले!

जगातील सर्वांत स्वस्त वस्तू म्हणजे सल्ला आहे. एकाकडे मागा हजार जण देतील. मात्र जगातील सर्वांत महाग गोष्ट म्हणजे मदत होय. हजार जणांना मदत मागा, त्यापैकी एखादाच करेल. ही वस्तुस्थिती असतानाही वेळ आल्यावर रडून मदत घेणारे आज धन्यवाद देणे विसरले आहेत. तसा विचार करता सापाच्या दातात, विंचवाच्या नांगीत आणि दुर्जन व्यक्तीच्या मनात किती विष भरलेलं आहे, हे कोणालाच माहीत नसतं. म्हणूनच या तिघांपासून सावध राहा असा सल्ला अनुभवी आपल्याला वारंवार देत असतात. तरीही समाजभान जपणारे लोक सढळ हाताने पीडितांना, गरजवंतांना मदतीचा हात देत धन्यता मानतात. मात्र जी मंडळी रडून मदत मिळविते, ती नंतर त्यांच्याप्रति कृतज्ञताही व्यक्त करीत नाही. याचे कारण काय याचाही शोध घेण्याची गरज आता निर्माण झाली आहे. तसे पाहता पूर्वीचे लोक सांगून गेले की, ‘ज्याचे करावे भले, तो म्हणतो माझेच खरे’ याचाही प्रत्यय लोकांना वारंवार येत आहे. आपल्या संस्कृतीचा विचार केला असता, सर्वांनाच कृतज्ञता व्यक्त करण्याची गोष्ट पुन्हा एकदा शिकवावी लागणार आहे. वस्तुतः शाळेत लघुकोन, काटकोन, त्रिकोण, चौकोन शिकविले जातात. पण आपले कोण हे मात्र परिस्थिती शिकवते. याच परिस्थितीचे भान ठेवत शाळांनी, पालकांनी आणि समाजानेही पुढाकार घेत सर्वांनाच मदत करणाऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला शिकवायला हवे. धन्यवाद दिल्याने माणूस लहान होत नाही. उलट मदत करणारा सुखावून पुन्हा तिसऱ्याला सहकार्य करण्यासाठी तत्पर राहतो. यालाच तर चांगले कार्य म्हटले जाते ना?

तसे पाहता वर्तमानात कृतज्ञता आणि कृतघ्नपणा यातील भेदही मुला-मुलींना सांगायला हवा. आज मानवी मन स्वार्थी झाले आहे. ‘गरज सरो अन् वैद्य मरो’ ही संस्कृती आता वाढली आहे. ही संस्कृती मानवतेसाठी घातक ठरू शकते. आता नाही का एका मुलाने आपल्या नातेवाईकाचा मृतदेह स्वतःच झोळी बांधून गावात नेला. त्याला शववाहिकाही मिळाली नाही. हे कशाचे द्योतक आहे, याचाही विचार करायला हवा. १४० कोटी लोकसंख्येच्या देशात कोट्यवधी गाड्या असताना एकही वाहन त्याला मिळत नाही, ही बाब नक्कीच विचार करायला लावणारी आहे. सरसकट सर्वच लोक एवढे निष्ठुर का झाले असावेत, ही बाब नक्कीच चिंतनीय ठरली आहे. चांगले काम केल्यावर ते विसरून जा अशीच शिकवण आपल्याला मिळाली. फक्त कर्म करीत राहा, फळाची अपेक्षा करू नको असेही सांगितले गेले. कृती कुठलीही असो, ती झाल्यावर काही ना काही परिणाम होणारच आहे, हेच विज्ञानाने सांगितले. ‘प्रत्येक क्रियेला समान आणि विरुद्ध प्रतिक्रिया असते’ हा नियम पाहता तुम्ही केलेल्या चांगल्या किंवा वाईट कृतींचे परिणाम आपल्याला भोगावे लागतात. ही बाब विज्ञानाने पटवून दिली आहे. मग विज्ञान विसरून कसे चालणार? तसे पाहता समाजात कर्णाची फौज निर्माण करायची झाल्यास चांगले काम करणाऱ्यांची प्रशंसा व्हायला हवी. येथे तर मदत करणारा कर्ण कुठे अडतो अन् केव्हा त्याला संपवितो असाच कृतघ्न समाज आपण निर्माण करीत आहोत. मग तुम्हाला मदत करणारा नेमका कसा उपलब्ध होईल? अपघातग्रस्तांना मदत करा, तुम्हाला शासनाकडून २५ हजार रुपये पारितोषिक मिळेल, अशी घोषणा सरकारला करावी लागते, ही बाब भूषणावह नसून, लाजिरवाणी आहे. जी व्यक्ती जन्माला आली, तिच्याकडून मदतीचा भाव अभिप्रेत आहे. पण केवळ मदत घेणारे वाढले. मात्र मदत करायची झाल्यास मला काय त्याचे असे म्हणत पळ काढणाऱ्यांचीच फौज समाजाने तयार केली आहे. याच कारणाने आज समाजात दुर्योधन वाढले अन् कर्ण नामशेष झाले आहेत. पूर्वी आपल्याकडे अनेक दानशूर मदत करायचे. पण त्यांचे कौतुक करायचे सोडून केवळ समाजाने त्यांना बदनाम करण्यावरच भर दिला. परिणामी ‘नेकी कर जूते खा’ हा प्रकार समाजभान जपणाऱ्यांसाठी कर्दनकाळ ठरला. फार पूर्वी एखाद्या सद्‌गृहस्थाने मदत केली तर त्याच्याविषयी संबंधित व्यक्ती चारचौघात कृतज्ञता व्यक्त करून धन्यवाद द्यायचा. परिणामी तो मदत करणारा सद्‌गृहस्थ मनातल्या मनात सुखावून जायचा आणि पुन्हा अनेकांना मदतीसाठी सदैव हात जोडून तत्पर राहायचा. आता मात्र संकटात असलेला प्रथमतः मगरीप्रमाणे अश्रू ढाळतो अन् मदत मिळवतो. पण त्यानंतर तो मदत करणाऱ्यांना धन्यवादही द्यायला विसरतो. आपण मुलांकडून असाच कृतघ्नपणा अपेक्षित ठेवला आहे का? याचे उत्तर नाहीच असे राहील. मग आजपासून मदत करणाऱ्यांबद्दल जाहीर कृतज्ञता व्यक्त करण्याची मोहीमच हाती घ्यावी लागेल. तेव्हाच मदत करणारे सुखावतील अन् समाजात दुर्योधन कमी होऊन कर्ण वाढतील.

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

# उद्धवराव, असे वागू नका!

नागेश दाचेवार

महाराष्ट्राच्या राजकारणात हिंदुत्वाचा झेंडा खांद्यावर घेऊन उभं राहिलेलं एक मोठं नाव म्हणजे बाळासाहेब ठाकरे होय. बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुहृदयसम्राट म्हणून मिळवलेली ओळख ही केवळ उपाधी नव्हती, ती एक विचारसरणी होती. पण आज प्रश्न उपस्थित होतोय, त्या विचारांचा वारसा नेमका कुठे हरवला? परभणीत मुस्लिम महापौर बसविल्यानं उद्धव ठाकरेंच्या ढोंगी हिंदुत्वाचा बुखरा फाटला. उद्धव ठाकरेंचा निर्लज्ज राजकीय व्यवहार या घटनेने उघडा पडला आहे.

२०१९ मध्ये सत्तेसाठी झालेला राजकीय बदल, हा फक्त आघाडी बदल नव्हता, तर वैचारिक धर्मांतरणाचा एक प्रकार होता. भाजपाशी दशकानुदशके चाललेली युती तोडून काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत सत्ता स्थापन करण्याचा निर्णय, ही केवळ सत्ता आणि खुर्चीसाठी तडजोड नव्हती, तर विचारांची तिलांजली होती. हे नंतरच्या काळात वारंवार अधोरेखित झाले.

भाजपाचा विश्वासघात करून हिंदुत्व सोडलेल्या उद्धव ठाकरेंनी २०१९ सालापासूनच दाढ्या कुरवाळण्याचं काम सुरू केलं आहे. यांनी अजान स्पर्धा भरविली, हिंदुहृदयसम्राटांना जनाब संबोधायला लागले, हिंदुहृदयसम्राट शब्द वापरातून बाद करत, वंदनीय म्हणायला लागले, दिनदर्शिका उर्दूत छापल्या आणि नुकत्याच झालेल्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत हिरवे झेंडे फडकवले, मुंबई ब्लास्टमधला आरोपी यांच्या उमेदवारांच्या प्रचार रॅलीमध्ये घोषणा देताना दिसला होता. सातत्यानं हिंदुत्वविरोधी भूमिका घेतल्यानं मुंबईतल्या जनतेने विधानसभा किंवा आता महापालिकेत देखील यांना हद्दपार केलं आहे. राज्याचा विचार केला तर, महानगर पालिका, नगर पालिका, नगर पंचायत, नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये या राज्यातील जनतेने केलेले यांच्या पक्षाचे दयनीय हाल बघता बघवेना झाले आहेत.




हिंदुत्वाचा राजकीय आधार घेऊन वाढलेल्या पक्षाने आता समावेशक राजकारणाच्या नावाखाली आपली जुनी भूमिका सोडली का? याचं उत्तर आता परभणीने दिले आहे. राजकारणात शब्दांना किंमत असते. भाषणात एक भूमिका आणि कृतीत दुसरी, हीच गोष्ट जनतेला खटकते. शेवटी जनतेला एकच गोष्ट महत्त्वाची वाटते विश्वासार्हता. शब्द आणि कृती यामध्ये दरी निर्माण झाली की राजकीय विश्वास कमी होतो. हिंदुत्वाच्या नावावर उभं राहून वेगळ्या दिशेने जाणं किंवा वेगळ्या विचारसरणीचा उदोउदो करूनही हिंदुत्वाचा दावा करणं, अशी दुटप्पी भूमिका आता चालणार नाही. असा इशारा महाराष्ट्रातील जनतेने जनाबांना दिला आहे.

अजान स्पर्धा, उर्दू दिनदर्शिका, विशिष्ट मतदारवर्गाला साधण्याचे प्रयत्न हे सर्व तुमच्या बदलत्या राजकीय समीकरणाचा भाग असतील, पण यामुळे मूळ समर्थक दुखावला आहे. हिंदुत्वावर उभा राहिलेला पक्ष अचानक वेगळ्या भाषेत बोलू लागला, तर कार्यकर्तेच नव्हे, मतदारदेखील दुखावतात, संभ्रमात पडतात आणि मग वेगळे मार्ग शोधतात. काळ बदलतो, राजकारण बदलतं. पण विचार बदलतात का? हिंदुत्व किंवा मग मराठी अस्मिता हा फक्त निवडणुकीपुरता मुद्दा होता का?, आज उद्धव ठाकरे यांच्यासमोर सर्वांत मोठं आव्हान म्हणजे स्वतःची स्पष्ट ओळख प्रस्थापित करणं. ते ठाम हिंदुत्ववादी आहेत का? की त्यांनी धर्मनिरपेक्ष राजकारणाची वाट स्वीकारली आहे? दोन्ही एकाच वेळी शक्य नाही. कारण राजकारणात द्वंद्व फार काळ चालत नाही. परभणीचा निर्णय हा केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेपुरता विषय नाही. राजकीय वास्तव हे आहे की, महाराष्ट्रात सध्या बहुकोनी लढाई सुरू आहे. भाजप, शिवसेना, ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार गट या सगळ्यात उद्धव ठाकरेंच्या वाट्याला आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी आता संघर्ष करावा लागत आहे. भावनिक भाषणं आणि टोमणे, या गोष्टी आतातरी यांना तारू शकणार नाही. भाजपा मराठीविरोधी आहे. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव आहे. गुजरात्यांना विकण्याची खेळी आहे. वगैरे वगैरे आरोप उद्धव ठाकरे आणि त्यांच्या चेल्याचपाट्यांनी केले होते. त्याला भाजपाने हिंदू मराठी महापौर बसेल असे प्रत्युत्तर दिले होते. त्यावर उद्धव ठाकरे यांनी हिंदू आणि मराठी वेगळं आहे का? मराठी हिंदू नाही असे भाजपाला म्हणायचं आहे का? असे प्रश्न उपस्थित केले. त्याचवेळी राज ठाकरे यांनी संपूर्ण महाराष्ट्रात मराठी महापौर बसेल असे छातीठोक सांगितले होते आणि आता परभणीत काय केलं? जनाब उद्धव साहेबांनी तर चक्क मुस्लिम महापौर बसविला. आता कुठे गेला यांचा हिंदू आणि मराठीचा स्वाभिमान? त्यामुळे आता आपली वैचारिक सुंता झाली आहे हे मान्य करून, स्वतःला उगाच हिंदुत्ववादी वगैरे म्हणू नये. आणि बाळासाहेबांच्या आत्म्याला वेदना होतील असं काही वागू नये.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### ‘पवारांचा नवा जावईशोध’, यथोचित राजकीय विश्लेषण



तरुण भारतच्या ७ फेब्रुवारी २०२६ च्या अंकात ‘पवारांचा नवा जावईशोध’ मथळ्याखाली नागेश दाचेवारांचा लेख वाचनात आला. हा लेख अत्यंत यथोचित राजकीय विश्लेषण म्हणावे लागेल. मी खरे तर कोणत्याही राजकीय पक्षाची पुरस्कर्ती नाही, पण लेखकानं केलेलं विश्लेषण अगदी योग्य वाटलं. मुख्यमंत्र्यांची जर प्रतिक्रिया ऐकाल तर त्यांनी असं कुठेही म्हटलेलं नाही की विलीनीकरण होऊ नये. उलटपक्षी त्यांनी हेच समजावण्याचा प्रयत्न केला की, राष्ट्रवादी पक्ष सत्तेत असल्यामुळे त्यांनी विलीनीकरणाचा मुद्दा चर्चेत आणला असता एवढेच. त्यांच्या वक्तव्याचा हेतुपुरस्सर विपर्यास केला जातो आहे. हे स्पष्ट करताना लेखकाने संजय राऊतांबद्दल जे म्हटलं, ते अगदी सूर्यप्रकाशाइतकं लख्ख आहे. राऊत सकाळी येऊन बरळतात. त्या घटनांचे खरोखरीच ते प्रत्यक्ष साक्षीदार असतात का हो? कदाचित त्यांना ही मुभा दिली असावी. मला एवढंच सुचवावंसं वाटतं की, विरोधाला विरोध करू नका. उगाच वाद उकरून शब्दरूपी बाण फेकून एकमेकांना घायाळ करण्यापेक्षा महाराष्ट्र राज्यातील ज्वलंत समस्या उदा. आत्महत्या, बेरोजगारी कशा सोडविल्या जाऊ शकतील, यावर गांभीर्याने विचार करा.

**कीर्ती गाडगे**/९९२११९९९२२

### राजकारण द्वेषभावनांचे की एकोप्याचे?

लोकशाही व्यवस्थेत राजकारण हे समाजघटनाचं महत्त्वाचं साधन मानलं जातं. राजकारण म्हणजे केवळ सत्ता मिळवण्याचा मार्ग नसून, समाजाला दिशा देण्याची जबाबदारी आहे. परंतु आजचा प्रश्न असा उभा राहतो आहे की, राजकारण हे एकोप्याचं माध्यम राहिलं आहे का, की ते द्वेषभावनांचं व्यासपीठ बनत चाललं आहे? अलिकडच्या काळात राजकीय भाष्यांमध्ये तीव्रता, आरोप-प्रत्यारोप, वैयक्तिक टीका आणि समाजघटकांमध्ये फूट पाडण्याचा कल वाढताना दिसतो. मतभेद असणं हे लोकशाहीचं सौंदर्य आहे; पण मतभेदांमधून मनभेद निर्माण होऊ लागले, तर ती धोक्याची घंटा ठरते. राजकारण जर समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याऐवजी त्यांना वेगळं करण्याचं साधन बनलं, तर लोकशाहीचा आत्माच कमकुवत होतो. द्वेषभावनांवर आधारित राजकारण तात्पुरता फायदा देऊ शकतं, कारण भावना चटकन पेट घेतात. पण अशा राजकारणाचा परिणाम दीर्घकाळ समाजात अविश्वास, असुरक्षितता आणि तणावाच्या रूपात दिसून येतो. एकोप्याचं राजकारण विकासाला चालना देतं. विविध विचार, धर्म, भाषा आणि संस्कृती यांचा सन्मान ठेवून सर्वसमावेशक धोरणं राबवणं ही खरी नेतृत्वाची कसोटी आहे. राजकारण हे स्वार्थाचं रणांगण नसून, जनहिताचं व्यासपीठ असलं पाहिजे. मतं वेगळी असली तरी मनं वेगळी होऊ नयेत, हीच खरी लोकशाही. आज गरज आहे ती द्वेषाच्या ज्वाला भडकवणाऱ्या भाषणांपेक्षा विश्वासाची वात पेटवणाऱ्या नेतृत्वाची. शेवटी प्रश्न राजकारण्यांपुरता मर्यादित राहत नाही. राजकारण द्वेषाचं की एकोप्याचं हा निवडीचा प्रश्न आहे. आणि ती निवड केवळ नेत्यांची नाही, तर संपूर्ण समाजाची आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

### राहुलबाबांची शिकवणी!



११ फेब्रुवारी रोजी लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी सरकारने अमेरिकेच्या दबावाखाली येऊन कृषी इ. उद्योगक्षेत्र, संवेदनशील डेटा, आपली सैन्यदले व देशहित आणि भारतमाता हे विकले... हे विकताना पंतप्रधान महोदय, तुम्हांला थोडीशीही लाज वाटली नाही का? असा फुरोगामी भाषेत घणाघाती हल्ला चढविला! त्याबद्दल संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू आणि खासदार निशिकांत दुबे काही कारवाई करीत आहेतच. मात्र स्वतः जामिनावर बाहेर असणारे राहुल गांधी यांचे नीतिधैर्य खरोखरच वाखाणण्यासारखे आहे! यासंदर्भात, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा एक जुना व्हिडीओ फिरत असतो, त्याची आठवण होते. त्यात ते म्हणतात, ...ही इटालियन बाई आमच्या वाजपेयींना देशभक्ती शिकवते...!. तरीदेखील केंद्र सरकारने आत्मपरीक्षण करावे आणि बालादपि सुभाषितं ग्राह्यम हे ध्यानात घेऊन देशभक्ती शिकण्यासाठी राहुलबाबा यांच्याकडे शिकवणी लावावी, असे नम्रपणे सुचवावेसे वाटते!

**अविनाश वाघ**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# घरफोडीतील आरोपी जेरबंद; १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-** विजापूर नाका पोलीस स्टेशन हद्दीतील दाखल घरफोडीतील आरोपीस जेरबंद केले असून त्याच्याकडून १४ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

घटनास्थळावरील प्राप्त सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिस कॉन्स्टेबल अमृत सुरवसे यांनी पारशी विहीर येथे सापळा रचुन आरोपी अंकित ऊर्फ अंकुश लक्ष्मण वाल्मिकी (वय ३४ वर्षे, व्यवसाय चालक, रा. ८५ जुना बाजार डकी, पुणे, सध्या रा. प्लॉट नं. ५२ अंबिका नगर, पारशी विहीर) यास अटक करुन त्याच्यासोबत असलेला त्याचा साथीदार विधीसंघर्षग्रस्त बालक असे दोघांवर विजापूर नाका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करून त्याच्याकडून १३ लाख ९४ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उप-आयुक्त विजय कबाडे, सहा. पोलीस आयुक्त दिलीप पवार, वरिष्ठ पोलीस निरिक्षक दादा गायकवाड, पोलिस निरीक्षक सुशांत वराळे, गुन्हे प्रकटीकरण पथक प्रमुख सपोनि गायकवाड, सफौ आप्पा पवार, पोहे सचिन हार, अजय परदेशी, गणेश शिर्के, लक्ष्मीकांत फुटाणे, पोकॉ समाधान मारकड, अमृत सुरवसे, संतोष माने, शाबोद्दीन आबादीराजे, संतोष चानकोटी, रमेश कोर्सेगांव, स्वप्नील जाधव, अयाज बागलकोटे, अर्जुन गायकवाड यांनी पार पाडली.

Classifieds

**नोकरीविषयक**

**नोकरीची संधी!**
**सिक्युरिटी गार्ड, हॉस्पिटल सिक्युरिटी इंचार्ज, मामा-मावशी, बाईक वॉशिंगसाठी मुले तसेच प्रसिद्ध हॉटेलमध्ये वेटर व हाऊस किपिंगसाठी मुले पाहिजेत.**
**संपर्क: ९१५८१५८९७२, ७६६६५६०१४१, ९८५०६८०५२२**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडल**

**SUR-CATG-26-01, दिनांक: 12.02.2026**

**निविदा सूचना क्रमांक:** SUR-CATG-26-01, सोलापूर विभागातील दुधनी स्टेशनवरील केटरिंग स्टॉल (टी स्टॉल) GMU श्रेणीच्या वाटपासाठी ई-लिलावासाठी सिंगल स्टेजच्या 11/02/2026 च्या निविदा सूचना कृपया संलग्न करा. लिलाव कॅटलॉग क्रमांक: SUR-CATG-26-01, लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ: प्रारंभ - दुपारी 12.00, 27/02/2026 बंद - दुपारी 12.30, 27/02/2026, स्थानकांचे नाव: दुधनी स्टेशनवरील चहाच्या स्टॉलचा ई-लिलाव, पद्धत: आयरेप्स ई-लिलाव (लीज मॉड्यूल) द्वारे ई-लिलाव, निविदा कालावधी: वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी 10% वाढीसह 5 वर्षे, वेबसाइट पत्ता: सर्व ई-लिलाव तपशील, संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टल www.ireps.gov.in/ वर उपलब्ध आहेत. अर्ज करण्यापूर्वी सहभागींनी वेबसाइटला भेट देण्याची विनंती केली आहे. हीच सूचना 14/02/2026 रोजी किंवा त्यापूर्वी एकाच इंग्रजी, हिंदी, कन्नड आणि मराठी वर्तमानपत्रात एकदाच भरण्यासाठी प्रकाशित करावी. कराराच्या मानक अटी आणि विशेष अटी IREPS ई-लिलाव (भाडेपट्टा) वेबसाइटवर अपलोड केले आहेत.

सुरक्षित प्रवास करा, फुटबोर्डवरून प्रवास करणे टाळा 51

Shri Shivparvati Sarvajanik Vikas Trust,
**GREENFINGERS AYURVEDIC MEDICAL COLLEGE AND RESEARCH CENTRE, SHANKARNAGAR-AKLUJ**
At/Pt. Shankarnagar-Akluj, Tal. Malshiras, Dist. Solapur, PIN: 413118
Contact No.9850543003/9975705208 Mail ID:2025ayu0913@gmail.com

**WANTED**

A)Applications are invited for filling up the following posts in the above said College/ Institute.

| Sr.No. | Type of Post | Vacant Posts |
|---|---|---|
| 1 | Principal | 01 (OPEN) |

| Sr. No. | Dept./Subject | Vacant Post: Professor | Associate Professor (Reader) | Assistant Professor (Lecturer) |
|---|---|---|---|---|
| 1 | Samhita and Siddhanta | 1 | 01 ( OPEN ) | ( 01 SC , 01 OPEN) |
| | Sanskrit | - | - | 01 ( OPEN ) |
| 2 | Rachana Sharir | 1 | 01 ( OPEN ) | 01 ( OPEN ) |
| 3 | Kriya Sharir | 1 | 01 ( OPEN ) | 01 ( OPEN ) |
| 4 | Rasashastra and Bhaishajya kalpana | 1 | - | - |

B) NOTES: (If applicable)
1) All Posts: The candidate should be registered under the M.M.P. Act. 1961 or I.M.M.C. Act. 1970 before joining the post unless they have already so registered.
2) The post(s) marked # is/are additional post(s) other than staffing pattern.
3) "मा. उच्च न्यायालय (औरंगाबाद खंडपीठ) येथे दाखल केलेल्या याचिका क. १२०५१/२०१५ महाराष्ट्र ऑल बहुजन शिक्षक मंडळ विरुध्द महाराष्ट्र राज्य आणि इतर मधील मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाम अधिन राहून बिंदुनामावलीची तपासणी करुन देण्यात आलेली आहे.

President,
Shri Shivparvati Sarvajanik Vikas Trust

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कळवण्यात येते की तुकडी जिल्हा सोलापूर, पोट तुकडी तालुका करमाळा, गाव - कविटगांव येथील गट नंबर १५९/१/अ यांसी एकूण क्षेत्र २ हेक्टर ८७ आर पैकी क्षेत्र ४० आर इथून पुढे 'सदर मिळकत' असे संबोधलेले आहे. सदर मिळकत ही सौ. सुनीता संतोष चौधरी यांचे मालकीची असून, त्यांनी ती श्री. रोहित रवींद्र बोबडे यांना दिनांक २०/०९/२०२३ रोजीच्या भाडेपट्ट्याने भाड्याने दिलेली आहे.

सदर मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या आमच्या अशील कंपनीच्या म्हणजेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या पेट्रोल पंपासंदर्भात ही नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकत ही संपूर्णपणे निर्दोष, निर्जोखमी व बोजारहीत असल्याची, तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नसून त्यावर जप्ती अथवा मनाईचा हुकूम नाही अशी खात्री व भरवसा आमच्या अशिलांना म्हणजेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना दिला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीज, लोन, बक्षीस, ताबा, पोटगी, दावा, कुळ, खंड, साठेखत, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत आमच्याकडे समक्ष येऊन, मूळ कागदपत्रांनिशी त्याबाबत आमची खात्री पटवून द्यावी.

येणेप्रमाणे मुदतीत मूळ कागदपत्रांनिशी आक्षेप न आल्यास, सदर मिळकतीवर, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे समजण्यात येईल व व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. सबब जाहीर नोटीस दिली असे.

सोलापूर, दिनांक ११/०२/२०२६.

**सही/-**
**ॲड. श्री. आनंद रामचंद्र देशपांडे,**
**बी.ए., एल.एल.बी., एम.ए. (इतिहास).**
**पत्ता : ९१/अ, मुरारजी पेठ, सोलापूर ४१३००१.**
**मोबाईल : ९८२३२९१६४३**



## सोलापुरात उद्या शालेय शहर खो-खो स्पर्धा

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-** राष्ट्रीय खो-खोपटू किरण पवार स्मृती करंडक शालेय शहर १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या खो-खो स्पर्धा रविवारी १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता डाळिंबी आड मैदान शिंदे चौक येथे सुरू होतील. येथील श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने आणि सोलापूर ॲम्युचर खो खो असोसिएशनच्या मान्यतेने व उत्कर्ष क्रीडा मंडळाच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित केली आहे. विजेत्या, उपविजेत्या व तृतीय संघास अनुक्रम ७, ५ व ३ हजार रुपयांचे पारितोषिक व करंडक देण्यात येणार आहे. ५ फेब्रुवारी २०१२ अथवा त्यानंतर जन्मलेली मुले या स्पर्धेसाठी पात्र आहेत. शहरातील इच्छुक संघानी शिवशंकर राठोड ( मोबाईल नं ७०२०८६९७२९) अथवा शितलकुमार शिंदे (९७६३८९१४०१) यांच्याशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त शालेय संघांनी भाग घ्यावा, असे आवाहन श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे अध्यक्ष जयवंत सलगर यांनी केले आहे.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
**SRM E-Tender(1st call) Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000038861 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 13/2025-2026, Particulars:** Work of supply, erection, testing and commissioning by replacement of 1X25 MVA 220/33kV Power Transformer by 1X50 MVA 220/33kV TF at 220kV Baramati Substation under EHV O&M Circle, Solapur. **Estimated cost:** Rs. 1,08,92,490/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 1,08,925/- **Tender cost in Rs.** 5000.00+ GST, **Sale period:** 11.02.2026 to 01.03.2026 **Last Date of Submission:** 01.03.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 02.03.2026 at 12:30 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608 For further details

**Pre-Bid Meeting:** 16.02.2026 @ 12:45 PM at EHV O&M Circle, Solapur

**Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**

**1) https://srmetender.mahatransco.in. 2) https://mahatransco.in**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
**SRM E-Tender(1st call) Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000038880 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 14/2025-2026, Particulars:** Work of augmentation by replacement of 2X (50-25) MVA 220/33kV Power Transformer at 220kV South Solapur S/S under EHV O&M Circle, Solapur. **Estimated cost:** Rs. 41,63,484/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 41,634/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 12.02.2026 to 01.03.2026 **Last Date of Submission:** 01.03.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 02.03.2026 at 12:30 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608 For further details

**Pre-Bid Meeting:** 16.02.2026 @ 12:45 PM at EHV O&M Circle, Solapur

**Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**

**1) https://srmetender.mahatransco.in. 2) https://mahatransco.in**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur**

**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
**भाडेतत्वावर वाहन मिळणेबाबत**

अउदा पॅक विभाग-३, सोलापूर अंतर्गत चाचणी कक्ष बारामती येथे भाडेतत्वावर टाटा सुमो / महिंद्रा बोलेरो प्लस / मराझो / मारुती इरटिगा / किआ कारेन्स किंवा तत्सम वाहनाची आवश्यकता असून आमची कार्यालयीन चौकशी क्र. १०१ दि. १३.०२.२०२६ असून इच्छुकांनी त्यांचे कोटेशन सिलबंद लिफाफ्यात दि. २०.०२.२०२६ संध्याकाळी ०५.३० वाजेपर्यंत सादर करावे. वरील निविदेबाबतची संपूर्ण माहिती **www.mahatransco.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दूरध्वनी क्र. ८८०५९३९९४७

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**पॅक विभाग-३, सोलापूर**

**सावधानतेची जाहीर नोटीस**

डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे कांदलगाव व तालुका बार्शी व आसपासचे परिसरातील तमाम सर्व लोकांना या जाहीर नोटीसद्वारे आमचे अशिल नंदुसिंग विठ्ठलसिंग परदेशी, रा. बार्शी यांचेतर्फे या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे कांदलगाव, येथील जमिन गट नं. ३५ क्षेत्र हे. ०२-२२ आर, पो.ख. हे. ००-०५ आर, असे एकूण क्षेत्र हे. ०२-२७ आर, आकार रु. ०६-४९ पैसे, येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत आतील सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह. सदर जमिन आमचे अशिल नंदुसिंग विठ्ठलसिंग परदेशी, बालाजी विठ्ठलसिंग परदेशी, भारत विठ्ठलसिंग परदेशी, रणजितसिंग विठ्ठलसिंग परदेशी, आमचे वडिलार्जित सामाईक अविभक्त हिस्से असलेली होती व आहे. यातील सदर जमिनीस वरीलप्रमाणे ७/१२ मालकी हक्कपत्रकी नोंदी होत्या व आहेत.

सदर मिळकतीपैकी, यातील बालाजी विठ्ठलसिंग परदेशी हे आमचे अशिलाचे परस्पर सरसनिरस मानाने वाटप न झालेल्या हिश्याची विक्री करण्याचे प्रयत्नात आहेत. सदर जमिनीचे सरसनिरस मानाने वाटप हिस्से झालेले नव्हते व नाही. तसेच आमचे अशिलांना कायद्याने व अग्रहक्काने बालाजी विठ्ठलसिंग परदेशी यांचे सामाईक हिश्यातील जमिन खरेदी करण्याचा अग्रहक्क व कायदेशीर अधिकार होता व आहे. आमचे अशिल नमूद जमिनीतील बालाजी विठ्ठलसिंग परदेशी यांचा अविभक्त हिस्सा योग्य त्या बाजारभावाने वाजवी किंमतीस खरेदी करण्यास तयार होते व आहेत,

सबब वर वर्णन केलेल्या मिळकत गट नं. ३५ क्षेत्र हे. ०२-२७ आर, (पो.ख. सह) संदर्भाने कोणीही आमचे अशिलाचे भाऊ बालाजी विठ्ठलसिंग परदेशी यांच्या सोबत कसल्याही स्वरूपाचा साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, पोटगी, चोळीबांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही स्वरूपाचे कायदेशीर हक्क अधिकार हस्तांतरण होईल अशा स्वरूपाचा दस्त अथवा करार करू नये, याउपरही कोणी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेनंतर अशा स्वरूपाचा दस्त अथवा व्यवहार केलेस तो आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. व पुढील कायदेशीर कारवाईस व होणारे खर्चास व परिणामास जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

ही सावधानतेची जाहिर नोटीस दिली असे दि. १३/०२/२०२६

**सही/-**
**नंदूसिंग विठ्ठलसिंग परेदशी,**
**रा. आझाद चौक बार्शी, ता. बार्शी**
**(अशिल)**

**सही/-**
**ॲड. विलास चंद्रकांत लुंडे**
**बी.कॉम. (ऑ.) एलएल.बी.**
**अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**
**मो.नं. ९२८४९५३९१०**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर**
मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

ज्या अर्थी खाली सही करणार श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (१२) आणि नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार व जामीनदार यांना कलम १३ (२) अन्वये खालील नमूद तारखेस मागणी नोटीस बजावली होती कि, त्यांनी सदरची नोटीसितील नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत परत करण्याबाबत कळवूनही सदर रक्कम परतफेड करण्यास आपण असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे सेक्शन १३ (४) व नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खाली नमूद मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

**ताबा सूचना**
**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (४) व नियम ८/१**
**परिशिष्ठ IV प्रमाणे**

| अ. क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) अमन स्टील अँड प्लास्टिक सेंटर प्रोपाः महमद कासीमसाब सारवाड राः ५३, मेहताब नगर, शेळगी, सोलापूर ४१३००६ २) इम्रान लालअहमद शेख राः १७/२८२, शास्त्री नगर, सोलापूर ४१३००६ |
| | कर्ज खाते क्र. | ००५००३२०७००००११ |
| | थकीत कर्ज रक्कम दि. ३०/०९/२०२५ अखेर | एकूण रक्कम रुपये ३३.११.६९७.६५ (रु. तेहतीस लाख अकरा हजार सहाशे सत्याण्णव आणि पासष्ठ पैसे) अधिक दि. ०१/१०/२०२५ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | २९/१०/२०२५ |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १२/०२/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील नवीन शहर वाढ विभागातील, मौजे शेळगी येथील बसवेश्वर नगर मधील खुली प्लॉट जागा यांसी गट नं. १९/१/ब पैकी प्लॉट नं. ४८ यांसी मिळकत क्र. ५१३४८५, याचे हद्द पूर्वपश्चिम-४० फुट व दक्षिणोत्तर २५ फुट असे याचे एकूण क्षेत्र ९२.९३ चौ. मी. अथवा १००० चौ. फु. इतकी खुली जागा मिळकत असून या मिळकतीचे चतुः सिमा असे :- पूर्वेस - प्लॉट नं. ४९, पश्चिमेस रस्ता, उत्तरेस प्लॉट नं. ४६, दक्षिणेस -प्लॉट नं. ५० |
| २ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) अमन स्टील अँड प्लास्टिक सेंटर प्रोपाः महमद कासीमसाब सारवाड राः ५३, मेहताब नगर, शेळगी, सोलापूर ४१३००६ २) इस्माईल रोशन शेख राः १०१ आदर्श नगर, मित्र नगर, शेळगी, सोलापूर ४१३००६ ३) मैनोद्दिन कासीम पटेल राः प्लॉट नं. १७, घर नं. ५५. शास्त्री नगर, व्हॉलीबॉल ग्राउंड जवळ, उत्तर सदर बझार, सोलापूर ४१३००३. |
| | कर्ज खाते क्र. | ००५००३२१७००००२७ |
| | थकीत कर्ज रक्कम दि. ३०/०९/२०२५ अखेर | एकूण रक्कम रुपये १४,०६,४७३/- (रु. चौदा लाख सहा हजार चारशे त्रेहत्तर फक्त) अधिक दि. ०१/१०/२०२५ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | २९/१०/२०२५ व १४/११/२०२५ रोजी दैनिक तरुण भारत |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १२/०२/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील नवीन शहर वाढ विभागातील, मौजे शेळगी येथील बसवेश्वर नगर मधील खुली प्लॉट जागा यांसी गट नं. १९/१/ब पैकी प्लॉट नं. ४८ यांसी मिळकत क्र. ५१३४८५, याचे हद्द पूर्वपश्चिम-४० फुट व दक्षिणोत्तर २५ फुट असे याचे एकूण क्षेत्र ९२.९३ चौ. मी. अथवा १००० चौ. फु. इतकी खुली जागा मिळकत असून या मिळकतीचे चतुः सिमा असे :- पूर्वेस प्लॉट नं. ४९, पश्चिमेस रस्ता, उत्तरेस प्लॉट नं. ४६, दक्षिणेस -प्लॉट नं. ५० |
| ३ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) अमन स्टील अँड प्लास्टिक सेंटर प्रोपाः महमद कासीमसाब सारवाड राः ५३. मेहताब नगर, शेळगी, सोलापूर ४१३००६ २) इस्माईल रोशन शेख राः १०१ आदर्श नगर, मित्र नगर, शेळगी, सोलापूर ४१३००६ ३) मैनोद्दीन कासीम पटेल राः प्लॉट नं. १७, घर नं. ५५, शास्त्री नगर, व्होलीबॉल ग्राउंड जवळ, उत्तर सदर बझार, सोलापूर ४१३००३. ४) अमिरोद्दिन महमद सारवाड राः ४६, बसवेश्वर नगर, शेळगी, सोलापूर ४१३००६ |
| | कर्ज खाते क्र. | ००५००३२१७००००३१ |
| | थकीत कर्ज रक्कम दि. ३०/०९/२०२५ अखेर | एकूण रक्कम रुपये ७,९०,८६३/- (रु. सात लाख नव्वद हजार आठशे त्रेसष्ठ फक्त) अधिक दि. ०१/१०/२०२५ पासून १५% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | २९/१०/२०२५ व १४/११/२०२५ रोजी दैनिक तरुण भारत |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १२/०२/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील नवीन शहर वाढ विभागातील, मौजे शेळगी येथील बसवेश्वर नगर मधील खुली प्लॉट जागा यांसी गट नं. १९/१/८ पैकी प्लॉट नं. ४८ यांसी मिळकत क्र. ५१३४८५, याचे हह पूर्वपश्चिम-४० फुट व दक्षिणोत्तर २५ फुट असे याचे एकूण क्षेत्र ९२.९३ चौ. मी. अथवा १००० चौ. फु. इतकी खुली जागा मिळकत असून या मिळकतीचे चतुः सिमा असे :- पूर्वेस प्लॉट नं. ४९, पश्चिमेस रस्ता, उत्तरेस प्लॉट नं. ४६, दक्षिणेस -प्लॉट नं. ५० |

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी सदर स्थावर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये असा व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना येणे असलेली रक्कम कर्जदार यांचे कर्ज व मालमत्ता तारण कर्ज खाते यांचे अधीन राहील. कृपया लक्षात घ्या कि श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना उपलब्ध असलेल्या अश्या अधिकार आणि उपायांवर पृवग्रह न ठेवता हे प्रकाशन केले गेले आहे. श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर कायद्याच्या अधीन असलेल्या आधार आर्थिक आणि कर्जदाराच्या विरुद्ध आपणास पुढील अधिनियमाच्या कलम १३ (१३) नुसार नोंद घेण्याची विनंती केली आहे. आमच्या बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील तारण मिळकत विल्हेवाट लावण्यापासून किंवा व्यवहार करण्यास किंव्हा विक्रीच्या मार्गाने, भाडेपट्याने किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्ताद्वारे हस्तांतरित करण्यास आपल्याला प्रतिबंधित आहे.

**दिनांक : १२/०२/२०२६**
**स्थळ : सोलापूर**

सील

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
**SRM E-Tender (1st call) Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000038850 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:** 12/2025-2026, **Particulars:** Work of supply, erection testing and commissioning of additional 132/33 kV, 50 MVA power T/F along with HV, LV bay & 33kV bus extension at 132/33kV Walchandnagar substation under EHV O&M Circle, Solapur. **Estimated cost:** Rs. 1,73,13,138/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs.1,73,131/- **Tender cost**: Rs. 5,000/- + GST, **Sale period:** 12.02.2026 to 01.03.2026 **Last Date of Submission:** 01.03.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 02.03.2026 at 12:30 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608 For further details **Pre-Bid Meeting:** 16.02.2026 @ 12:45 PM at EHV O&M Circle, Solapur. Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit. 1) **https://srmetender.mahatransco.in** 2) **https://mahatransco.in Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur**

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**आर्थिक मालमत्तेचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंध कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (**पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 143071569 | मालमत्तेवर कर्ज | 1. बाळू दादाराव वाघमारे 2. समाधान बाळू वाघमारे | 06/12/2025 | INR 5,39,212.51/- |
| मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायतीचा संपूर्ण तुकडा आणि पार्सल मिळकत क्रमांक ५७५/१/४, एकूण ६६३ चौ.फूट, मौजे येथे स्थित. रानमसले, ग्रामपंचायतीच्या हद्दीत रानमसले, तालुका : उत्तर सोलापूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३२२२, सीमा :- पूर्वेकडे - मातंग समाज मंदिर, पश्चिमेकडे - सुभाष वाघमारे, उत्तर - एक गल्ली आणि देवस्थान, दक्षिणेकडे - ग्रामपंचायत रस्ता. | | | | | |
| 2 | 104063404 | मालमत्तेवर कर्ज | 1. प्रेमनाथ गोरख शिंदे 2. स्वाती प्रेमनाथ शिंदे | 21/05/2025 | INR 8,46,160.82/- |
| मालमत्तेचा पत्ता: सोलापूर उपविभाग मोहोळ येथील मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, नगरपरिषदेच्या हद्दीत मोहोळ बेअरिंग गट क्रमांक १२४८/१/सी/१, एकूण क्षेत्रफळ ० एच ७१ आर पैकी ० एच ०१ आर, पोटखराब ० एच २०आर, विभाग, सोलापूर, उपविभाग मोहोळ, महानगरपालिका पुणे रोडच्या हद्दीत, महाराष्ट्र-४१३२१३, आणि सिमा :- पूर्व - रस्ता, पश्चिम - रस्ता, उत्तर - अर्जुन क्षीरसागर, दक्षिण - महेश गोरख शिंदे. | | | | | |
| 3 | 103572100 | ग्रामीण गृहकर्ज | 1. रमेश धोंडीबा गुंड 2. स्वाती रमेश गुंड 3. रमेश धोंडिबा गुंड C/o धोंडिबा गुंड 4. स्वाती रमेश गुंड C/o रमेश गुंड | 27/01/2026 | INR 2,25,793.53/- |
| मालमत्तेचा पत्ता : सोलापूर उपविभाग उत्तर सोलापूर येथील मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल, ग्रामपंचायतीच्या हद्दीत, कळमण, बेअरिंग मिळकत क्रमांक ४२७, सुतार गल्लीजवळ, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३२२२. जाहिरात-मापन क्षेत्र ६७२ चौ.फूट. आणि सीमा :- उत्तर - प्रशांत मधुकर पवार, दक्षिण - रस्ता, पूर्व - शहाजी दीनानाथ सुतार, पश्चिम - रस्ता. | | | | | |
| 4 | 90596147 | मालमत्तेवर कर्ज | 1. सागर जांबुवंत भोसले 2. सुप्रिया सागर भोसले | 06/12/2025 | INR 4,23,560.83/- |
| मालमत्तेचा पत्ता : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ७५ चा संपूर्ण तुकडा आणि पार्सल, एकूण ६०० चौ.फूट, भोगाव येथे स्थित, ग्रामपंचायत भोगावच्या हद्दीत, उपविभाग : उत्तर सोलापूर, विभाग : सोलापूर, महाराष्ट्र - ४१३२२२, आणि सीमा :- पूर्व - अशोक पाटील यांचे क्षेत्र, पश्चिम - अविनाश भोसले यांचे क्षेत्र, उत्तर - रस्ता, दक्षिण - बिभीषण भोसले यांचे क्षेत्र. | | | | | |
| 5 | 116668755 | मालमत्तेवर कर्ज | 1. शहाजी निवृत्ती गरड 2. रेखा शहाजी गरड | 06/12/2025 | INR 10,26,077.87/- |
| मालमत्तेचा पत्ता : मालमत्तेचा तो संपूर्ण तुकडा आणि पार्सल म्हणजे ग्रामपंचायत मिळकत क्र. ६३६, एकूण मोजमाप क्षेत्र १८८१ चौ.फूट, मौजे रानमसले येथे, ग्रामपंचायत रानमसले, उपविभाग : उत्तर सोलापूर, विभाग : सोलापूर, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३२२२, आणि सीमा :- पूर्व - अण्णा गरड, पश्चिम - ग्रामपंचायत रस्ता, उत्तर - जांबुवंत गरड, दक्षिण - सत्यवान गरड. | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (**पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

दिनांक : **14/02/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**आर्थिक मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेले आणि **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 135815165 | मालमत्तेवर कर्ज | 1. सालुटगी बसवराज शिवकर्णी 2. शैला बसवराज सालुटगी | 23/01/2026 | INR 7,98,266.53/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक २४ चा संपूर्ण तुकडा आणि पार्सल, एकूण आदमेसुरंग क्षेत्रफळ ६८० चौ.फूट, होनमुर्गी येथे स्थित, ग्रामपंचायतीच्या हद्दीत : होनमुर्गी, उपविभाग : दक्षिण सोलापूर, विभाग: सोलापूर, महाराष्ट्र-४१३००४, आणि सीमा :- पूर्वेकडे - रामगोंडा बाळाप्पा सालुटगी, पश्चिमेकडे - बसन्ना आंदन्ना कोळी, उत्तरकडे - बसवराज राचप्पा हसापुरे, दक्षिणकडे - रस्ता.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

दिनांक : **14/02/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

# टी-२० विश्वचषकाचा थरार



## महत्त्वाचे

### रियान पराग राजस्थान रॉयल्सचा कर्णधार

**जयपूर** : आयपीएल २०२६ साठी रियान परागची राजस्थान रॉयल्सचा पुढचा कर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. संजू सॅमसन चेन्नई सुपर किंग्जमध्ये बदली झाल्यानंतर त्याने ही भूमिका स्वीकारली आहे.



२४ वर्षीय परागने यापूर्वीही या कामाचा अनुभव घेतला आहे. गत हंगामात सॅमसन दुखापतीमुळे वेळ गमावत असताना त्याने आठ सामन्यांमध्ये आरआरचे नेतृत्व केले होते. रॉयल्सने त्यापैकी फक्त दोन सामने जिंकले, परंतु परागचा वैयक्तिक फॉर्म वेगळा राहिला. त्या कालावधीत त्याने सरासरी ३८.५७ धावा केल्या आणि ईडन गार्डन्सवर कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध कारकिर्दीतील सर्वोत्तम ९५ धावा काढल्या. २०१९ मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण केल्यापासून पराग रॉयल्सचा खेळाडू आहे आणि तेव्हापासून तो प्रत्येक हंगामात खेळला आहे. गत दोन हंगामात त्याने प्रत्येक सामना खेळला आणि २०२४ हे त्याचे ब्रेकआउट वर्ष होते: ५२.०९ च्या सरासरीने आणि १४९.२१ च्या स्ट्राईक रेटने ५७३ धावा. एकूणच, परागने आरआरसाठी ८४ सामने खेळले आहेत, त्यात १५६६ धावा केल्या आहेत आणि सात विकेट घेतल्या आहेत. ■

### आयर्लण्डला मोठा धक्का, कर्णधार विश्वचषकातून बाहेर

**कोलंबो** : आयर्लण्डला शुक्रवारी मोठा धक्का बसला कारण त्यांचा कर्णधार पॉल स्टर्लिंग ओमानविरुद्धच्या गट सामन्यापूर्वी उजव्या गुडघ्याला दुखापत झाल्याने उर्वरित टी-२० विश्वचषक सामन्यांमधून बाहेर झाला आहे. बुधवारी येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध आयर्लण्डच्या ६७ धावांच्या पराभवादरम्यान झेल पकडताना स्टर्लिंगच्या उजव्या गुडघ्याला दुखापत झाली. त्याच सामन्यात फलंदाजीसाठी परतल्यानंतर जलद एक धाव घेण्याचा प्रयत्न करताना अनुभवी कर्णधाराची दुखापत आणखी वाढली. टी-२० विश्वचषक कार्यक्रम तांत्रिक समितीने स्टर्लिंगसाठी बदली खेळाडूला मान्यता दिली आहे, यात नवोदित युवा सॅम टॉपिंग तात्काळ प्रभावाने आयर्लण्डच्या १५ खेळाडूंच्या संघात सहभागी झाला आहे. आयर्लंड शनिवारी येथे त्यांच्या गट ब सामन्यात ओमानचा सामना करेल. टॉपिंग हा डावखुरा सलामीवीर फलंदाज आहे. तो गत वर्षी अबू धाबी येथे अफगाणिस्तान अ विरुद्धच्या चार दिवसांच्या सामन्यात आयर्लण्ड अ संघाकडून खेळला होता.

### बीडब्ल्यूएफ परिषदेने मांडला गुणपद्धतीचा नवीन प्रस्ताव

**क्वालालाम्पूर** : जागतिक बॅडमिंटन महासंघ (बीडब्लूएफ) परिषद २५ एप्रिल रोजी डेन्मार्कमधील हॉर्सेन्स येथे होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ३ बाय १५ गुण पद्धतीला या खेळासाठी अधिकृत स्वरूप म्हणून मतदान करणार आहे. गत वर्षी ८ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीत परिषदेने असा निष्कर्ष काढला की ३ बाय १५ प्रणाली सामन्यांचा उत्साह, स्पर्धात्मक निष्पक्षता, खेळाडू कल्याण आणि स्पर्धा सादरीकरण यांच्यात संतुलन राखते. गत वर्षी गुवाहाटी येथे झालेल्या जागतिक कनिष्ठ गट स्पर्धेत लागू करण्याशिवाय निवडक राष्ट्रीय व ग्रेड ३ स्पर्धांमध्ये या स्वरूपाची चाचणी आधीच सुरू करण्यात आली आहे. बॅडमिंटन प्रत्येक स्तरावर वाढत राहील, प्रेरणा देईल आणि भरभराटीला येईल याची खात्री करणे ही आमची जबाबदारी आहे. व्यापक चाचणी आणि विचारविनीमय केल्यानंतर, आम्हाला विश्वास आहे की ३ बाय १५ स्कोअरिंग सिस्टीम खेळाच्या भविष्यासाठी एक मजबूत पाया प्रदान करते, असे अध्यक्ष खुनिंग पटामा लीस्वद्त्रकुल यांनी गुरुवारी एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

### सौरभ नेत्रावलकरला संधी मिळाली नाही

**चेन्नई** : आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ च्या गट अ सामन्यात शुक्रवारी चेन्नईतील एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर नेदरलॅण्डने अमेरिकेविरुद्ध नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. या सामन्यासाठी सौरभ नेत्रावळकरला अमेरिकेच्या अंतिम एकादशमध्ये स्थान ळिले नाही. अमेरिकेला सलामीच्या सामन्यात भारताकडून व त्यानंतर कोलंबोमध्ये पाकिस्तानकडून पराभव पत्करावा लागला. दोन पराभव आधीच समोर आले आहेत, तर आणखी एका पराभवामुळे सुपर एट टप्प्यात पोहोचण्याच्या त्यांच्या आशा संपुष्टात येतील, त्यामुळे मोनांक पटेल आणि त्यांच्या संघासाठी हा सामना जिंकणे आवश्यक आहे. दरम्यान, नामिबियावर सात गड्यांनी विजय मिळवल्यानंतर नेदरलॅण्ड्ने वेग घेतला आहे. बास डी लीडेने उत्तम अष्टपैलू कामगिरी केली. त्याने दोन प्रमुख बळी घेतल्या आणि नामिबियाला १५६ धावांवर रोखले आणि नंतर ७२ धावांची खेळी करत आव्हानाला बळकटी दिली. ■

# झिम्बाब्वेकडून ऑस्ट्रेलियाला पराभवाचा धक्का

## टी-२० विश्वचषकातील पहिला उलटफेर ● मुझारबानी, इव्हान्स, बेनेटची आक्रमक खेळी



ब्रायन बेनेट नाबाद ६४

◆ **कोलंबो, १३ फेब्रुवारी**

ब्लेसिंग मुझारबानीच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम गोलंदाजी, ब्रॅड इव्हान्सचा प्रभावी मारा व ब्रायन बेनेटच्या नाबाद ६४ धावांच्या धाडसी खेळीमुळे झिम्बाब्वे टी-२० विश्वचषकात ऑस्ट्रेलियाविरुद्ध अपराजित राहिला. कोलंबोमध्ये जागतिक टी-२० क्रमवारीत ११ व्या स्थानावर असलेल्या झिम्बाब्वेने दुसरा विश्वमानांकित ऑस्ट्रेलियाला २३ धावांनी पराभवाचा धक्का दिला. या शानदार विजयाबरोबरच झिम्बाब्वेने गट ब मध्ये श्रीलंकेनंतर दुसरे स्थान मिळविले व आपल्या सुपर एट फेरीच्या आशा कायम राखल्या. श्रीलंका व झिम्बाब्वेचे प्रत्येकी ४ गुण आहेत. १७ धावांत ४ बळी टिपणारा ब्लेसिंग मुझारबानी सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

दुखापतींच्या समस्यांनी ग्रासलेल्या ऑस्ट्रेलिया संघाचा हंगामी कर्णधार ट्रॅव्हिस हेडने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. झिम्बाब्वेने २० षटकांत २ बाद १६९ धावा उभारल्या. प्रत्युत्तर देताना ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ १९.३ षटकांत १४६ धावांतच गारद झाला. मॅट रेनशॉची ६५ धावांची धाडसी खेळी झिम्बाब्वेविरुद्ध व्यर्थ ठरली.

झिम्बाब्वेने डावाची चांगली सुरुवात केली. ब्रायन बेनेट व तादिवानाशे मारुमानी या दोन्ही सलामीवीरांनी ऑस्ट्रेलियन गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले. या दोघांनी ६१ धावांची सलामी भागीदारी केली. ऑस्ट्रेलियाला अखेर ८ व्या षटकात यश मिळाले. मार्कस स्टोइनिसने मारुमानीला तंबूत पाठवले. त्याने २१ चेंडूत ७ चौकारांसह ३५ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाला या यशाचा फायदा घेता आला नाही. ब्रायन बेनेटने रायन बर्लच्या मदतीने स्वैर फलंदाजी करत संघाच्या धावसंख्येला आकार दिला. रायन बर्ल १६ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर ३० चेंडूत ३५ धावा काढल्यानंतर बाद झाला. टी-२० विश्वचषकांत झिम्बाब्वेकडून बर्ल व बेनेटने दुसऱ्या गड्यासाठी ७० धावांची भागीदारी करून मसकाड्झा व टेलरने केलेल्या ६२ धावांची विक्रमी भागीदारीला मोडीत काढले.

बेनेटने आपले आक्रमण सुरूच ठेवले आणि ४३ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. तो ५६ चेंडूत ७ चौकारांसह ६४ धावा करून



सामनावीर ब्लेसिंग मुझरबानीचे ४ बळी

नाबाद राहिला. झिम्बाब्वेने स्पर्धात्मक धावसंख्या गाठली. ऑस्ट्रेलियाकडून सातपैकी केवळ दोन गोलंदाजांना प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश आले.

विजयासाठी १७० धावांचा पाठलाग करताना २०२१ च्या टी-२० विश्वचषक विजेत्या ऑस्ट्रेलिया संघाची दाणादाण उडाली. मॅट रेनशॉने तेवढी ४४ चेंडूंत ६५ धावांची खेळी करून ऑस्ट्रेलियाला आशा निर्माण केली, पण फलंदाजीपाठोपाठ गोलंदाजीतही उत्कृष्ट कामगिरी करत झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाला रोखण्यासाठी व त्यांच्या टी-२० विश्वचषक सुपर एटच्या आशा धोक्यात आणण्यासाठी कडक क्षेत्ररक्षण केले.

ब्लेसिंग मुझारबानी व ब्रॅड इव्हान्सने अनुक्रमे ४ व ३ बळी घेतले आणि त्यांच्या वेगवान गोलंदाजीच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाला १९.३ षटकांत १४६ धावांत गुंडाळले आणि २३ धावांनी विजय मिळवला.

ऑस्ट्रेलियाकडून रेनशॉसह कर्णधार ट्रॅव्हिस हेड (१७) व ग्लेन मॅक्सवेल (३१) हे तिघेच दोन अंकी धावा काढू शकले. ग्लेन मॅक्सवेल व मॅट रेनशॉने पाचव्या गड्यासाठी सर्वाधिक ७७ धावांची भागीदारी करून इतिहास घडविला. त्यांनी शेन वॉटसन व स्टीव्ह स्मिथच्या विक्रमी ७४ धावांच्या भागीदारीला मोडीत काढले. त्यांचे तीन फलंदाज भोपळा न फोडताच तंबूत परतले. उर्वरित फलंदाज मुझारबानी, इव्हान्सच्या प्रभावी माऱ्यासमोर टिकाव धरू शकले नाहीत. वेलिंग्टन मसाकाड्झा व रेयान बर्लने प्रत्येकी १ बळी मिळविला. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानविरुद्ध कुलदीपला संधी मिळावी

## सुनील गावस्कर यांचे प्रतिपादन

◆ **नवी दिल्ली, १३ फेब्रुवारी**

रविवारी होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तानविरुद्धच्या भारतीय संघाच्या हाय-व्होल्टेज सामन्यात लेग-स्पिनर कुलदीप यादवला वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगची जागा मिळावी अशी अपेक्षा भारतीय संघाचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी व्यक्त केली आहे.



गुरुवारी येथे नामिबियाच्या फलंदाजांकडून अर्शदीपला काही शिक्षा भोगावी लागली, जरी गतविजेत्या भारतीय संघाने ९३ धावांनी विजय मिळवत विजयाची मालिका कायम ठेवली. त्याने चार षटकांचा पूर्ण कोटाही पूर्ण केला नाही.

आमच्या सर्व गोलंदाजांनी बळी टिपले. अर्शदीपने त्याचे चार षटके पूर्ण केले नाहीत, तर शिवम दुबेने दोन षटके गोलंदाजी केली आणि हार्दिकने त्याची चार षटके पूर्ण केली. यावरून कुलदीप यादव पाकिस्तानविरुद्ध अर्शदीपची जागा घेऊ शकतो, असे सूचित होते. श्रीलंकेच्या खेळपट्ट्या फिरकी गोलंदाजांना मदत करतात आणि भारताचा तीन फिरकी गोलंदाज खेळविण्याचा इतिहास आहे. कोलंबोमध्ये पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारताच्या अंतिम एकादशमध्ये कुलदीपला स्थान मिळावे अशी अपेक्षा आहे, असे गावस्कर यांनी म्हटले आहे.



भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याला लक्षात घेऊन आपल्या गोलंदाजीत बदल केला. हार्दिकने पहिले षटक टाकल्याने असे दिसून येते की अर्शदीप पाकिस्तानविरुद्धच्या पुढील सामन्यात खेळू शकणार नाही. वरुण चक्रवर्तीने केवळ दोन षटके टाकली व जर त्याने त्याचे पूर्ण चार षटके टाकले असते तर तो पाच किंवा सहा बळी घेऊ शकला असता. वरुणबद्दलची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे जेव्हा त्याला गोलंदाजी करायला सांगितले जाते तेव्हा त्याला बळी मिळतात. अक्षर पटेलने तीन षटकांत दोन बळी घेतल्या, हे एक चांगले लक्षण आहे, असे ते म्हणाले.

संजू सॅमसनने नामिबियाविरुद्ध काही चांगले शॉट्स मारले, त्यामुळे त्याला थोडा आत्मविश्वास मिळाला असेल. जर तो पाकिस्तानविरुद्धचा पुढचा सामना खेळला तर त्याला खेळपट्टीवर जास्त वेळ घालवावा लागेल, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका यांच्यात गटातील वर्चस्वासाठी चुरस

◆ **अहमदाबाद, १३ फेब्रुवारी**

सुपर एट पात्रता जवळजवळ निश्चित झाल्यानंतर, अपराजित न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका शनिवारी येथे झुंजणार आहे. उभ संघादरम्यान टी-२० विश्वचषक गटात अव्वल स्थानासाठी सरळ लढत होणार आहे.



मिचेल सॅण्टनर



एडन मार्कराम

दोन्ही संघांनी आपले सुरुवातीचे दोन्ही सामने जिंकले आहेत, त्यामुळे आता त्यांच्यात केवळ गट ड मध्ये वर्चस्वच नव्हे तर सुपर ८ मध्ये जाण्याची गती देखील निश्चित करू शकते.

अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यात विजय मिळविताना न्यूझीलंडकडून टिम सेफर्ट (६५ धावा), ग्लेन फिलिप्स (४२), मार्क चॅपमन (२८) आणि डॅरिल मिशेल (नाबाद २५) यांच्या वेगवान योगदानाच्या जोरावर १७.५ षटकांत लक्ष्याचा यशस्वी पाठलाग केला. यापूर्वी, सेफर्ट आणि फिन ॲलनने यूएईचा १० गडी राखून पराभव केला होता.

दरम्यान, दक्षिण आफ्रिकेने दबावाखाली आक्रमक खेळ आणि संयम यांची सांगड घातली आहे. कॅनडाविरुद्ध कर्णधार एडेन मार्करामने ३२ चेंडूत ५९ धावा केल्या, तर डेव्हिड मिलर (नाबाद ३९) आणि ट्रिस्टन स्टब्स (नाबाद ३४) यांनी जोरदार खेळ केला आणि त्यानंतर लुंगी नगिदीने ३१ धावांत ४ बळी टिपून सहज विजय मिळवला.

दक्षिण आफ्रिकेने अखेर नाट्यमय दुहेरी सुपर ओव्हरमध्ये विजय मिळवला, मिलर आणि स्टब्सने दबावाखाली खेळ केला. दक्षिण आफ्रिकेने त्यांचे दोन्ही सामने याच ठिकाणी खेळले आहेत, त्यामुळे त्यांना खेळपट्टी आणि परिस्थितीची ओळख झाली आहे.

कॅगिसो रबाडा आणि नगिदी यांच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिकेच्या वेगवान आक्रमणाने आधीच परिस्थितीशी जुळवून घेतले आहे.

सुपर ८ मध्ये दोन्ही संघांसाठी पात्रता निश्चित दिसत असली तरी, गट विजेते म्हणून अंतिम फेरी गाठल्याने पुढील सामन्यांवर परिणाम होऊ शकतो आणि पुढील सामन्यांना अधिक अनुकूल मार्ग मिळू शकतो. (वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**आयर्लण्ड वि. ओमान**
**स्थळ** : प्रेमदासा स्टेडियम, कोलंबो
**वेळ** : सकाळी ११.०० वाजतापासून

**इंग्लंड वि. स्कॉटलंड**
**स्थळ** : ईडन गार्डन्स, कोलकाता
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून

**न्यूझीलंड वि. दक्षिण आफ्रिका**
**स्थळ** : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# भारत पाकिस्तानविरुद्ध फिरकी धोक्यासाठी सज्ज

◆ **नवी दिल्ली, १३ फेब्रुवारी**


नामिबियाचा कर्णधार गेरहार्ड इरास्मसच्या अपारंपरिक फिरकी गोलंदाजीला तोंड देताना भारताला संघर्ष करावा लागला. आता रविवारी कोलंबो येथे होणाऱ्या टी-२० विश्वचषक सामन्यापूर्वी पाकिस्तानचा फिरकी गोलंदाज उस्मान तारिकने निर्माण केलेल्या आणखी एका अपारंपरिक धोक्यासाठी भारतीय संघाला काम करावे लागले.

इरास्मस आणि तारिक दोघेही ऑफ-स्पिन गोलंदाजी करतात. गुरुवारी इरास्मसने गोल आर्म ॲक्शनसह बरेच चेंडू टाकले. त्याने चार षटकांमध्ये २० धावांत चार बळी घेतले असले तरी भारताने दमदार विजयाच्या दिशेने ९ बाद २०९ धावांची नोंद केली. इरास्मसने अक्षम्य डेथ ओव्हर्समध्येही कामगिरी केली आणि बलाढ्य भारतीय फलंदाजांवर वर्चस्व गाजविले.

नामिबियाविरुद्ध भारताकडून धावा काढणाऱ्या फलंदाजांमध्ये ईशान किशनचा समावेश होता व विजयानंतर, त्याला विचारण्यात आले की रविवारी रात्री तारिक ॲण्ड कंपनीशी खेळण्यासाठी इरास्मसचा सामना करणे ही चांगली तयारी होती का?



ईशान किशन



उस्मान तारिक

नाही, मला वाटते की आम्ही तयारीचा भाग आधीच पूर्ण केला आहे आणि आता चेंडू पाहण्याची आणि आमचा नैसर्गिक खेळ खेळण्याची वेळ आली आहे. जिथे चेंडू असेल तिथे फलंदाज म्हणून आम्हाला केवळ मैदानात उतरायचे आहे, कारण हा टी-२० सामना आहे, असे ईशान किशन म्हणाला.

आम्ही फलकावर चांगली धावसंख्या उभारण्याचा प्रयत्न करत आहोत. पण आम्हाला आमच्या ताकदीवरही विश्वास ठेवावा लागेल. तयारी करावी लागेल असे काहीही नाही. आम्ही पाकिस्तानच्या फिरकी माऱ्याशी दोन हात करण्यासाठी सज्ज आहो, असे तो म्हणाला.

अपारंपरिक गोलंदाजी शैलीने गोलंदाजी करणारा कोणीतरी फलंदाजाच्या मनावर परिणाम करू शकतो, तेव्हा स्वतःच्या ताकदीवरही विश्वास ठेवण्याची गरज आहे, असेही तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

# झिम्बाब्वेचा ब्रेंडन टेलर टी-२० विश्वचषकातून बाहेर

**कोलंबो** : झिम्बाब्वेला मोठा धक्का बसला आहे, अनुभवी यष्टिरक्षक-फलंदाज ब्रेंडन टेलर या आठवड्याच्या सुरुवातीला झालेल्या गट सामन्यात झालेल्या दुखापतीमुळे चालू टी-२० विश्वचषकातून बाहेर झाला आहे. ४० वर्षीय टेलर ९ फेब्रुवारी रोजी ओमानविरुद्धच्या सामन्यात जखमी निवृत्त झाल्यामुळे मैदानावरून लंगडा पडला होता. हा सामना त्यांनी येथे आठ गड्यांनी जिंकला होता. त्याच्या दुखापतीचे नेमके स्वरूप अद्याप स्पष्ट झालेले नाही. ब्रेंडन टेलरला दुखापत झाली व तो स्पर्धेतून बाहेर झाला आहे, असे कर्णधार सिकंदर रझाने शुक्रवारी येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यापूर्वी नाणेफेकीच्या वेळी सांगितले. २००४ मध्ये झिम्बाब्वेमध्ये पदार्पण केल्यापासून टेलरने ३६ कसोटी, २०७ एकदिवसीय आणि ५९ टी-२० सामने खेळले आहेत. त्याच्या शेवटच्या पाच टी-२० डावात तो रिटायर हर्ट होण्याची ही तिसरी वेळ आहे. ■

# आयर्लण्डला ओमानविरुद्ध विजयाची आशा

◆ **कोलंबो, १३ फेब्रुवारी**

सलग दोन पराभवांनंतर आयर्लण्ड आणि ओमानच्या सुपर एटमधील त्यांच्या आशा जवळजवळ संपुष्टात आल्या आहेत. आता शनिवारी येथे गट ब मधील दोन तळाच्या संघांमधील टी-२० विश्वचषक सामन्यात आयर्लण्डला ओमानविरुद्ध विजयाची आशा आहे.



पॉल स्टर्लिंग



जतिंदर सिंग

दोन्ही संघांना अनुक्रमे दोन पराभव पत्करावे लागले आहेत आणि ते स्पर्धेत आपला पहिला विजय मिळविण्यासाठी उत्सुक असतील.

आयर्लण्डला सह-यजमान श्रीलंका व ऑस्ट्रेलियाकडून अनुक्रमे २० आणि ६७ धावांनी पराभव पत्करावा लागला, तर ओमानला झिम्बाब्वेकडून आठ गड्यांनी व श्रीलंकेकडून १०५ धावांनी पराभव पत्करावा लागला.

मोठ्या स्पर्धेतील अनुभवाच्या आधारे आयर्लण्ड ओमानविरुद्ध विजयाचा प्रबळ दावेदार म्हणून सुरुवात करेल. आयर्लण्ड संघात बहुतेक भारत आणि पाकिस्तानी वंशाचे खेळाडू आहेत.

शनिवारी आयर्लण्डला स्पर्धेत टिकून राहण्यासाठी मोठा विजय मिळवावा लागेल, तर ओमान दोन मोठ्या पराभवांनंतर एक गुण सिद्ध करण्याचा प्रयत्न करेल.

आयर्लण्डला फलंदाजीत संघर्ष करावा लागला आहे. कर्णधार कर्णधार पॉल स्टर्लिंगने अद्याप स्पर्धेत चांगली कामगिरी केलेली नाही आणि मोठी धावसंख्या उभारण्यासाठी कर्णधाराच्या फॉर्मवर बरेच काही अवलंबून असेल.रॉस अडायर, हॅरी टेक्टर, लोर्कन टकर आणि कर्टिस कॅम्फर यांसारख्या खेळाडूंना आयर्लंडच्या फलंदाजी विभागाला बळकटी देण्यासाठी त्यांना मोठ्या धावसंख्येत रूपांतर करावे लागेल. डावखुरा फिरकी गोलंदाज जॉर्ज डॉकरेल हा आयर्लण्डचा सर्वोत्तम गोलंदाज आहे, परंतु त्याला वेगवान गोलंदाज मार्क अडायर आणि बॅरी मॅकार्थी आणि फिरकी गोलंदाज मॅथ्यू हम्फ्रीज आणि गॅरेथ डेलानी यांच्याकडून साथ मिळणे आवश्यक आहे. दुसरीकडे, ओमानकडे गमावण्यासारखे काहीही नाही आणि आयर्लण्डला पराभूत करण्यासाठी आणि स्पर्धेत त्यांचा पहिला विजय मिळविण्यासाठी अष्टपैलू कामगिरीची त्यांना आशा असेल. (वृत्तसंस्था)

# युएईचा कॅनडावर ५ गड्यांनी रोमांचक विजय

## आर्यनश, सोहेबची अर्धशतके ● सामनावीर जुनैद सिद्धिकीचे ५ बळी

◆ **नवी दिल्ली, १३ फेब्रुवारी**

आर्यनश शर्माने ५३ चेंडूत नाबाद ७४ धावा, तर शोहेब खानने २९ चेंडूत ५१ धावा फटकावल्या. या दोघांच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर संयुक्त अरब अमिरातने (यूएई) शुक्रवारी नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या गट ड सामन्यात १५१ धावांचा पाठलाग करत कॅनडाविरुद्ध पाच गडी राखून विजय मिळवला.



आर्यंश शर्माची विजयी खेळी



पाच बळी टिपणारा सामनावीर जुनैद सिद्धिकी

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या कॅनडाने २० षटकांत ७ बाद १५० धावा उभारल्या. युएईने विजयासाठी आवश्यक असलेल्या १५१ धावा १९.४ षटकांत ५ गडी गमावित काढल्या.

३५ धावांत ५ बळी टिपून युएईचा विजयाचा मार्ग सोपा करणारा जुनैद सिद्धिकी सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. सामन्याच्या प्रारंभीच जुनैदने एका पाठोपाठ धक्के देत कॅनडाचे कंबरडे मोडले. कॅनडाकडून पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या हर्ष ठाकरने ४१ चेंडूंत २ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने ५० धावांची खेळी केली. नवनीत ढालीवालने ३४, तर श्रेयस मोवाने २१ धावांची व कर्णधार दीपेश बाजवाने ११ धावांची भर घातली. युएईने प्रभावी गोलंदाजी व कडक क्षेत्ररक्षण करीत कॅनडाला १५० धावांवर रोखले.

त्यानंतर विजयासाठी धावांचा पाठलाग करताना युएईचा सलामीवीर आर्यनश शर्माने ५३ चेंडूत नाबाद ७४ धावांची विजयी खेळी केली. मात्र दुसऱ्या टोकावर त्याचे सहकारी खेळपट्टीवर टिकाव धरू शकत नव्हते. कॅनडाच्या फिरकीपटूंनी मधल्या षटकांमध्ये पकड घट्ट केली, त्यामुळे युएईची धावसंख्या ४ बाद ६६ अशी घसरली होती, परंतु तरीही शर्माने एका टोकाला मजबूत पकड दिली. त्याला खरी साथ मिळाली ती सोहेब खानची. सोहेबने जोरदार प्रतिआक्रमणात चार षट्कार आणि चार चौकार मारले, तर आर्यनशसोबत केवळ ४२ चेंडूत ८४ धावा जोडल्या. शर्माने ५३ चेंडूत सहा चौकार आणि तीन षट्कारांसह नाबाद ७४ धावांची खेळी केली आणि युएईच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

कॅनडाकडून अनुभवी अष्टपैलू साद बिन जफरने १४ धावांत ३ बळी टिपण्यात यश मिळविले. (वृत्तसंस्था)

# विजय खरोखरच अविश्वसनीय : सिकंदर रझा

◆ **कोलंबो, १३ फेब्रुवारी**

माजी विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाविरुद्धचा आमचा विज हा खरोखरच अविश्वसनीय आहे, असे झिम्बाब्वे संघाचा हंगामी कर्णधार सिकंदर रझा म्हणाला. झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाविरुद्ध २३ धावांनी शानदार विजय मिळविला. संघात निर्माण झालेल्या संस्कृती, एकता आणि वातावरणामुळे हा निकाल शक्य झाला, असे तो म्हणाला.

शुक्रवारी येथील आर प्रेमदासा स्टेडियमवर टी-२० विश्वचषकाच्या गट ब सामन्यात झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाला पराभवाचा धक्का दिला. खूप आनंदी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, खूप अभिमानास्पद, असे तो म्हणाला.

रझाने १३ चेंडूत नाबाद २५ धावा केल्या आणि गोलंदाजीची सुरुवात केली, परंतु नवव्या षटकात पाय दुखावल्याने त्यांना वेदनेने मैदानाबाहेर जावे लागले आणि त्याच्या तरुण संघाने ऐतिहासिक विजय मिळवताना ड्रेसिंग रूममधून पाहणे भाग पडले. संस्कृती, वातावरण, आम्ही घेतलेली एकता, आम्ही बऱ्याच काळापासून निर्माण केली आहे हे पाहणे छान वाटले. (वृत्तसंस्था)

# अश्विनचा तारिकला तोंड देण्याबाबत भारताला सल्ला

◆ **नवी दिल्ली, १३ फेब्रुवारी**

पाकिस्तानचा ऑफ स्पिनर उस्मान तारिकच्या अनोख्या साईड-आर्म ॲक्शनला तोंड देण्यासाठी सज्जा होत असताना, फिरकीपटू आर. अश्विनने भारतीय फलंदाजांना एक सोपा सल्लादिला आह. तो चेंडू टाकण्यापूर्वी थांबतो तेव्हा केवळ दूर जा, असे अश्विन म्हणाला.

३० वर्षीय तारिकच्या स्टॉप अँड पॉज शैलीने बरीच खळबळ उडवून दिली आहे, त्याने चार टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत आणि प्रति षटक सहा धावांपेक्षा कमी इकॉनॉमी रेटने ११ बळी घेतल्या आहेत. तो रविवारी प्रेमदासा येथील संथ खेळपट्टीवर कट्टर प्रतिस्पर्ध्यांमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषक सामन्यात निर्णायक भूमिका बजावू शकतो.

जर तो चेंडू टाकण्यापूर्वी थांबला तर फलंदाजाला दूर जाण्याचा अधिकार आहे. मला वाटले म्हणून थांबत आहे असे तो म्हणू शकतो, ही पंचांसाठी मोठी डोकेदुखी असेल, असे अश्विनने म्हटले आहे.

नियमांनुसार सामना जिंकण्यासाठी सर्व काही करायला हवे. मी केवळ एवढेच म्हणेन की तो चेंडू कधी सोडेल हे मला माहित नाही व मी तिथून निघून जाईन. जर मी तिथून निघून गेलो तर ती पंचांची जबाबदारी आहे, असे तो म्हणाला. पाकिस्तान तारिकचा वापर कमी प्रमाणात करत आहे. इंग्लंडचा माजी कर्णधार केविन पीटरसनने त्याची स्टॉप अँड पॉज ॲक्शन बेकायदेशीर ठरवल्याने तो क्रिकेट विश्वात चर्चेत आला आहे. (वृत्तसंस्था)

# तोरणी व अरळी येथे उद्या जल अर्पण दिवस

## जल जीवन मिशनमधून होणार कार्यक्रम; सीईओ जंगम यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ फेब्रुवारी-**

ग्रामस्थांचा लोक सहभाग अधिक दृढ करणे, पाणी पुरवठा योजनाचे संचालन आणि देखभाल यासाठी आत्मविश्वास निर्माण करणे आणि प्रत्येक कुटुंबाला कायमस्वरूपी शुद्ध पुरेसे पिण्याचे पाणी मिळण्यासाठी वचन बद्धकरिता जल जीवन मिशन अंतर्गत योजना गावाला हस्तांतरण दिवस जल अर्पण दिवस म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत रविवार दि. १५ फेब्रुवारीला जल अर्पण दिवस तोरणी (ता.अक्कलकोट) व अरळी (ता.मंगळवेढा) या दोन ग्रामपंचायतमध्ये साजरा करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम म्हणाले, जिल्ह्यात प्रत्येक कुटुंबाला कायमस्वरूपी शुद्ध पुरेसे पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनांची काम प्रगती पथावर सुरू आहेत.गावातील जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण झालेल्या योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरण करण्यात येत आहे.जिल्हयातील तोरणी (ता.अक्कलकोट) व अरळी (ता.मंगळवेढा) या गावातील पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाले आहे. सदरची योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरण करण्यासाठी १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सदर दोन गावात जल अर्पण दिवस गावात साजरा करण्यात येणार आहे.

यामध्ये गावातील पाणीपुरवठा योजनेची संपूर्ण माहिती ग्रामस्थांना देऊन योजना कायमस्वरूपी ठेवण्यासाठी देखभाल दुरुस्तीची हमी घेण्यात येणार आहे.गावात उत्सव साजरा करताना पाण्याचे महत्व ग्राम स्थांना कळावे यासाठी शालेय विद्यार्थ्यांची गावातून रॅली, जल प्रतिज्ञा, गावाला मिळणारी शुद्ध पाण्याची हांडे सजवून गावातून मिरवणूक काढण्यात येणार आहे. शुद्ध पाण्यासाठी (एफ.टी.के.) किटचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात येणार आहे तसेच या कार्यक्रमात महिला बचत गट, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, शिक्षक व युवकाचा सहभाग घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील गावात जल जीवन मिशनचे काम पूर्ण करून पाणी पुरवठा योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यासाठी गावात जल अर्पण दिवस साजरा करावा असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल जाधव व ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेटटी यांनी केले आहे.

## महत्वाचे...



**सोलापूर : कोटणीस नगर, भाग क्र. २ येथे पंडितजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनीष देशमुख, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, भाजप सरचिटणीस शिवराज सरतापे मंडल, अध्यक्ष महेश देवकर, मयूर युगे, प्रभाकर पडलकर, श्रीनिवास बुरुडकर उपस्थित होते.**



### पंढरपुरात शशिकांत शिंदे यांचे स्वागत

**पंढरपूर, दि. १३ फेब्रुवारी-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रांताध्यक्ष शशिकांत शिंदे यांचे पंढरपूर येथे आगमन झाले असता, पक्षाच्या उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.स्वागतावेळी भैरवनाथ शुगर वर्क्स लिमिटेडचे चेअरमन अनिल सावंत, तालुकाध्यक्ष अतुल चव्हाण, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे सोलापूर जिल्हाध्यक्ष सागर पडगळ, पक्षाचे प्रवक्ते महादेव तळेकर उपस्थित होते.



### पंढरपुरात शीतगृह शवपेटी लोकार्पण सोहळा

**पंढरपूर, दि.१३ फेब्रुवारी-**

शीतगृह शवपेटी लोकार्पण सोहळा येथील सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ.कैलश करांडे यांच्या हस्ते शहरातील निकते सर्जिकल येथे मंगळवारी ( दि.१०) संपन्न झाला येथील ओम साई राम स्टील अँड प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत, रोटरी क्लब ऑफ पंढरपूर यांच्या माध्यमातून हा उपक्रम अंमलात आणता आल्याबद्दल त्यांनी ओमसाईराम स्टील अँड प्रायव्हेट लिमिटेडच्या संचालकांचे तसेच रोटरी क्लबच्या सदस्यांचे देखील आभार व्यक्त केले. या लोकार्पण सोहळ्यास रोटरी क्लब ऑफ पंढरपूरचे अध्यक्ष डॉ. वैभव सादिगले, सचिव मयूर परिचारक, प्रकल्प प्रमुख सोमेश गानमोटे तसेच किशोर निकते, सचिन भिंगे, शेखर शिंदे उपस्थित होते. ही सेवा अत्यंत माफक दरात रोटरी क्लबचे किशोर निकते यांच्या निकते सर्जिकल जुनी पेठ या दुकानातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सेवेसाठी संपर्क: श्री वैभव ८८०६०८०६१७ असे देखील आवाहन करण्यात आलेले आहे.

# सोलापुरात 'सौंदर्यवेद'चा शुभारंभ

## निरामयं सौंदर्यम् अलंकार या बोधवाक्याने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

संस्कृत भाषेचा समृद्ध वारसा आणि निसर्गाचे वरदान लाभलेल्या 'सौंदर्यवेद : इंडिक सेंटर फॉर ब्युटी अँड हेल्थ केअर'चे उद्घाटन सोहळा निर्मलाश्री बिल्डिंग, जुने विठ्ठल मंदिराजवळ येथे संपन्न झाला. 'निरामयं सौंदर्यम् अलंकार :' (निरोगी असणे हाच सौंदर्याचा खरा दागिना आहे) हे बोधवाक्य घेऊन सुरू झालेल्या या उपक्रमाने सोलापूरकरांचे लक्ष वेधून घेतले आहे.

या वैशिष्ट्यपूर्ण केंद्राचे उद्घाटन रोटरी क्लब ऑफ नॉर्थच्या प्रेसिडेंट अ‍ॅड.असावरी सराफ यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सचिन किणीकर उपस्थिते होते.

**संस्कृत आधारित व्यवसायाचे वेगळेपण :**

आजच्या आधुनिक काळात डॉ. रेवा कुलकर्णी यांच्या अभिनव संकल्पनेतून आणि अर्चना भूम कर यांच्या नेटक्या नियोजनातून



साकारलेले 'सौंदर्यवेद' हे संस्कृत संस्कृतीवर आधारित व्यवसाय मॉडेल आहे. येथे वापरली जाणारी सर्व सौंदर्य प्रसाधने १०० टक्के केमिकल-फ्री (रसायनमुक्त) असून ती पूर्णतः नैसर्गिक आहेत, हे या केंद्राचे मुख्य वैशिष्ट्य आहे. केवळ बाह्य सौंदर्यावर भर न देता आंतरिक आरोग्य आणि नैसर्गिक शुचिता यावर येथे भर दिला जाणार आहे.

या सोहळ्यास रुद्र अ‍ॅकॅडम ीच्या संचालिका संगीता जाधव आणि संचालिका चंदा पाटील यांची सन्माननीय उपस्थिती लाभली. मान्यवरांनी सोलापुरात अशा प्रकारचा अभिनव उपक्रम सुरू झाल्याबद्दल कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रेणुका कळयणकर (रक्षंधा ब्यूटी पार्लर) यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाची आकर्षक सजावट मेघा व्यास व पृथ्वीराज कुरे यांनी केली होती, तर प्रिंटिंग आणि इतर व्यवस्थापनात सिल्व्हर स्क्रीन प्रिंटिंग प्रेसने महत्त्वाची भूमि का बजावली. सोलापूरकरांसाठी हे केंद्र म्हणजे नैसर्गिक सौंदर्यो पचारांचे हक्काचे ठिकाण ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. आता रोज दुपारी १ ते ६ या वेळेत हे सेंटर सुरू आहे.



# सोलापूरमध्ये प्रथमच "Educating AI" संकल्पनेवर टेडेक्ससिंहगड सीओई २०२६

## एन.बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचा TEDX उपक्रम यशस्वी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

अभियांत्रिकी शिक्षणाच्या क्षेत्रात नवा मैलाचा दगड ठरत, एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी म हाविद्यालय, केगाव यांच्या वतीने TEDxSinhgad COE २०२६ अंतर्गत ट्रेड एक्स २०२६ या कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले. सोलापूर पंचक्रोशीमध्ये प्रथमच TEDx संकल्पनेअंतर्गत झालेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरला. कार्यक्रमाची यंदाची संकल्पना Educating I - कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील शिक्षण, विचार व कौशल्यांची जडणघडण अशी होती. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चाललेल्या या कार्यक्रमात शिक्षण, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवोन्मेष, उद्योजकता आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवर मंथन झाले.

या TEDx Talk मध्ये पाच विविध क्षेत्रांतील मान्यवर वक्त्यांनी आपले विचार मांडले. कॉर्पो रेट ट्रेनर डॉ. अर्शद सय्यद, लेखक अतुल कहाते, इन्फ्लुएंसर मंदार पाडवळ, उद्योजिका ऐश्वर्या यादव आणि उद्योजक मुदस्सर अली रंगरेज यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची वाढती भूमिका, भविष्यातील करिअर संधी आणि विद्यार्थ्यांनी आत्मसात करावयाच्या कौशल्यांवर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला १५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांसह विविध वयोगटातील प्रेक्षकांचा प्रतिसाद लाभला. सूत्रसंचालन मानसी जाधव आणि ऐश्वर्या यादव यांनी केले. संपूर्ण आयोजनाची धुरा प्रा. डॉ. प्रदीप तपकिरे आणि त्यांच्या विद्यार्थी टीमने समर्थपणे सांभाळली. या उपक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले तसेच कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांचे मार्गदर्शन लाभले.

# हडपीड येथील मठात भक्ती आणि सेवेचा संगम अनुभवला

## महेश इंगळे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ फेब्रुवारी-**

कोकण हे स्वामी भक्तांचे माहेरघर असून या माध्यमातून जोगेश्वरी मुंबई येथील श्री स्वामी समर्थ भक्त परिवार संचलित कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हडपीड येथील श्री स्वामी समर्थ मठात भक्ती आणि सेवेचा संगम पहावयास मिळाला असल्याचे मनोगत अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे यांनी व्यक्त केले.

नुकतेच श्री स्वामी समर्थ हडपिड मठ यांच्या सौजन्याने महेश इंगळे, प्रथमेश इंगळे मित्र परिवारा यांच्या आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय कोकण दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी हडपिड येथील मठात श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान या श्री स्वामी समर्थांच्या मूळस्थाना वरील श्री स्वामी



समर्थांचे नित्य दिनक्रम व वर्षभरात मंदिरात साजरे होणारे उत्सव इत्यादी बाबत चेअरमन इंगळे यांनी श्री स्वामी समर्थ मठात भाविकांना मार्गदर्शनपर माहिती दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी हडपिड मठाच्या वतीने श्री वटवृक्ष देवस्थानचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे, प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, व सर्व मित्र परिवार सदस्यांचा स्वामी समर्थांचे वस्त्र, हडपिड मठ स्वामी समर्थांची प्रतिमा असलेले सन्मान चिन्ह देऊन हडपिड मठाचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर राणे, सचिव नंदकुमार पेडणेकर यांनी सन्मान केला. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा. शिवशरण अचलेर, डॉ. हिरण्णा पाटील, संतोष पराणे, नंदकुमार घाटगे, कुमार हत्तुरे, सुरेश वाले, रवि कदम, अंकूश केत, सुनिल पवार, स्वामीनाथ मुसळे, मनोज इंगुले, बाबा सुरवसे, ओंकार वाले, शेखर अडवितोटे, प्रसन्न हत्ते, साहील पवार, नामदेव माने, विश्वनाथ देवरम नी, शिवू बिडवे, कणबसे शेठ, मेजर अमोल माने, हडपीड मठाचे संस्थापक प्रभाकर राणे, सचिव नंदकुमार पेडणेकर उपस्थित होते.

# आजपासून श्री रेवणसिद्धेश्वर मल्लिनाथ देवस्थान महाशिवरात्र यात्रा महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१३ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील आळंद तालुक्यातील निरगुडी येथे सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान जागृत श्री रेवणसिद्धेश्वर मल्लिनाथ देवस्थान महाशिवरात्र यात्रा महोत्सव निमित्त रविवार १५ फेब्रुवारीपासून देशभरातील लाखो भाविकांच्या उपस्थित विविध धार्मिक सामाजिक व देशभक्ती कार्यक्रम आयोजित केली आहे.

यंदा यात्रा कमिटीचे वतीने यात्रेची जयत्त तयारी करण्यात आले असून बैल, खोंड, गाई सह अनेक जनावराचे गड्डा यात्रा भरविण्यात आला आहे. रात्री ८ वाजता निरगुडी येथील वें. कै. शंकरय्या स्वामी यांच्या घरातून श्री रेवणसिदेश्वर मल्लिनाथ देवस्थान पर्यंत श्री चे पालखी, नंदिध्वजचे पुरवंतसह विविध वाद्यसमवेत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. सोमवार दि.१६ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ वाजता श्री चे रुद्राभिषेक पूजा, अग्नी पूजा, या नंतर दिवसभर सर्व धर्माचा आणि सर्व पक्षाचा प्रमुख उपस्थिती धर्मसभा कार्यक्रम होणार आहे . दुपारी ४ वाजता श्रीचे रथोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

दि.१५, १६ व १७ फेब्रुवारी रोजी देशभक्ती गीत गायन भजन सह श्रीचे दर्शन सोहळा कार्यक्रम होणार असून या काळात दिवस रात्र महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आला आहे.

## निधन वृत्त...

### वी. वी. आलेगावी



**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

एस.व्ही.एम. संघ संचलित इलकल बीबीए कॉलेजचे निवृत्त प्राचार्य वी. वी. आलेगावी यांचे १२ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८६ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात मोठा मुलगा येथील प्रसिद्ध आर. एस. मोगले साडी सेंटरचे शिवकुमार मोगले, कन्या सेवासदन प्रशालेच्या शिक्षिका डॉ. अंजली शिरसी, इलकल येथील २ पुत्र प्रसन्न व नरेंद्र आलेगावी आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर इलकल येथे १३ फेब्रुवारी रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

### जाहीर प्रसिध्दीकरण

संकीर्ण अर्ज क्र. ३२५/२०२५

**सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी क्र. १ यांचे समोर**

**श्री. रविंद्र दगडू गायकवाड**
वय-५० वर्षे, धंदा व्यापार,
रा. ६५, अंत्रोळीकर नगर भाग-१,
होटगी रोड, सोलापूर. — **अर्जदार**

विरुध्द

१) **मा. मंडळ अधिकारी साो. मजरेवाडी,**
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर.
२) **श्री. नारायण नरसिंगराव अनगोंडा**
वय - सज्ञान, धंदा - मजुरी,
३) **श्री. दामोदर नरसिंगराव अनगोंडा**
वय - सज्ञान, धंदा - मजुरी,
४) **त्रिवेणी प्रभाकर वडला**
वय - सज्ञान, धंदा - घरकाम,
५) **ललिता विरय्या मुनरानी**
वय - सज्ञान, धंदा - घरकाम,
६) **श्री. रविंद्र नरसिंगराव अनगोंडा**
वय - सज्ञान, धंदा - मजुरी,
सर्व रा. मजरेवाडी, सोलापूर, — **जाब देणार**

ज्याअर्थी यातील अर्जदाराने जाब देणार फेरफार नोंद नं. २१२६६ व फेरफार नोंद २५४४५ या नोंदीविरूध्द सदरचा अपील दाखल केलेला असून त्या अपीलास जो विलंब झालेला आहे तो माफ होऊन मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याकामी जाबदेणार याना नोटीसा काढले असता अद्यापि त्याचा रिपोर्ट आलेला नाही. त्यामुळे सदर जाबदेणार नं. २ ते ६ यांना जाहीर प्रसिध्दीकरण नोटीसाद्वारे ही नोटीस देत आहे.

त्याअर्थी तुम्हास या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, हे जाहीर प्रसिध्दीकरण झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर पुढील नेमलेली ता. ०५/०३/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता स्वतः अगर नेमलेल्या विधीज्ञामार्फत हजर राहावे येणेप्रमाणे तुमचेकडून घडून न आल्यास या दाव्याचे न्यायालयीन कामकाज तुमच्याविरुध्द एकतर्फी चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी व सदर दाव्याचा जो निकाल लागेल तो निकाल तुमचेवर बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण केले ता. १३/०२/२०२६

कोर्टाचा शिक्का

**हुकूमावरुन**
**सही/-**
**मा. उपविभागीय अधिकारी**
**क्र.१, सोलापूर**

# वैकुंठ स्मशानभूमीतील बंद असलेली गॅस दाहिनी दुरुस्त करा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ फेब्रवारी -**

येथील वैकुंठ स्मशानभूमीतील ५० लाख रुपये खर्चुन बसविण्यात आलेली गॅंस दाहिनी गेल्या दोन, चार वर्षापासून बंदच आहे. त्यामुळे आपल्या आप्तस्वकीयांच्या पार्थिवावर या गॅंसदाहिनी मध्ये अंत्यसंस्कार करण्याची इच्छा असताना देखील मृतांच्या नातेवाईक मंडळींना येथील स्मशानभूमीमध्ये सध्या पारंपारिक पध्दतीनेच अंत्यसंस्कार करावे लागत आहेत. त्यामुळे बंद असलेली गॅंस दाहिनी त्वरीत सुरु करावी, अशी मागणी शहर व उपनगरातील नागरिकांमधून केली जात आहे.

येथील वैकुंठ स्मशानभूमीत मृतदेहावर लाकडाचा वापर करुन अंत्यसंस्कार करण्यात येत होते. लाकडाच्या वाढलेल्या किंमती आणि लाकूड वापरामुळे प्रचंड प्रमाणात होत असलेले प्रदूषण तसेच दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचे बिघडत चाललेले संतुलन यामुळेच इंधनासाठी लाकडा ऐवजी सोलार किंवा गॅंसचा वापर करण्यावर केंद्र व राज्य सरकारकडून भर दिला जात आहे.

दरम्यान पंढरपूरातील वैकुंठ स्मशानभूम ीत राज्यसभेचे तत्कालीन खासदार राजकुम ार धुत यांच्या खासदार निधीतून पन्नास लाख रुपये आणि येथील नगरपालिकेने



### वारंवार बातम्या प्रसिध्द मात्र पालिका प्रशासन धिम्म

याबाबत दैनिक सोलापूर तरुण भारत मधून देखील वारंवार बातम्या देखील प्रसिध्दीस देण्यात आलेले आहे. मात्र नगरपालिका प्रशासन धिम्म असून या बाबत कोणतीही ठोस कार्यवाही प्रशासनाकडून केली जात नसल्याचे दिसून येत आहे.

काही निधी खर्चुन मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी गॅंस दाहिनी उभी केली होती. गॅंस दाहिनी उभी करण्यात आल्यावर देखील येथील स्मशानभूमीत पारंपारिक पध्दतीने आणि गॅंस दाहिनीवर अंत्यसंस्कार करण्याची सुविधा पालिकेकडून नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सुरुवातीला काही दिवस मृतांच्या अनेक इच्छुक नातेवाईकांकडून या गॅंस दाहिनीम ध्ये आपल्या आप्तस्वकीयाच्या मृतदेहांवर अंत्यंस्कार करण्यात आले होते. तर ज्यांना गॅंसदाहिनीमध्ये अंत्यसंस्कार करणे पटत

> गॅंस दाहिनी दुरुस्त झाल्यास मृतदेहावर अंत्यसंस्कार करणे सोपे होईल. या बरोबरच होणारे प्रदूषण टाळले जाईल,पर्यावरणाचा होणारा ऱ्हास देखील थांबला जाईल. त्यामुळे पालिकेने त्वरीत बंद पडलेली गॅंस दाहिनी सुरु करावी अशी आमची विनंती आहे.
>
> **- सुनील सुर्यवंशी, नागरिक**

नव्हते ते पारंपारिक पध्दतीने आपल्या नातेवाईकाच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करीत होते. मात्र गॅंस दाहिनी सुरु झाल्यावर काही महिन्यांमध्येच कोरोनाच्या एक, दोन लाटा आलेल्या होत्या. त्या काळात कोरोना आजारामुळे मृत झालेल्या व्यक्तींवर अंत्यसंस्कार करताना अंत्यसंस्कारासाठी उपस्थित असलेल्या इतरांना कोरोनाचा प्रादुर्भाव होवू नये याची काळजी घेवून अंत्यसंस्कार करण्याच्या प्रशासनाकडून काही मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या होत्या. त्यावेळी अंत्यसंस्कारासाठी उपस्थितांच्या संख्येवर मर्यादा देखील लावण्यात आलेल्या होत्या. त्यावेळी सुरुवातीला तर कुटुंबातील एक, दोघां सदस्यांच्या उपस्थितीत पालिका कर्मचाऱ्यांकडूनच कोरोनामुळे मृत झालेल्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येत होते. येथील स्मशानभूमीत देखील खबरदारी घेऊन कोरोनामुळे मृत झालेल्या व्यक्तीच्या मृतदेहावर सुरुवातीला काही दिवस गॅस दाहिनीद्वारे अंत्यसंस्कार करण्यात आले. यासाठी येथील नगरपरिषदेकडून एक हजार रुपये एवढा माफक दर आकारण्यात आला आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींच्या काळात अंत्यविधीसाठीचा येणारा खर्च देखील कमी झाला. पर्यायाने होणारे प्रदूषणही देखील रोखले गेले. या बरोबरच अंत्यसंस्कार करताना अंत्यसंस्कारासाठी उपस्थित असलेल्यांना कोरोनाचा प्रादुर्भाव होण्याचा धोका देखील कमी झाला होता ही एकीकडे वस्तुस्थिती होती. तर दुसरीकडे मात्र कोरोनामुळे झालेले मृतदेह जाळल्याम ुळे याचा परिणाम विपरीत झाला. कारण कोरोनामुळे मृत झालेले मृतदेह हे प्लास्टिक बॅंग मध्ये ठेवलेले असायचे. त्यामुळे अशा पार्थिवावर अंत्यसंस्कार करताना तो गॅंस दाहिनी मध्ये तसाच ठेवला जायचा. अशा प्रकारे कोरोनामुळे मृत झालेल्या अनेकांच्या पार्थिवावर त्यावेळी या गॅंसदाहिनी मध्येच अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यामुळे गॅंस दाहिनीच्या चिमणी मध्ये काजळी चढत गेली. परिणामी पर्यावरण पूरक असणारी ही गॅंस दाहिनी बंद पडली.

## छायाचित्रातून...



महाशिवरात्रीनिमित्त सोलापूर शहरातील विविध भागातील महादेव मंदिर येथे मंडप उभारण्यात आले आहे. महापौर बंगला रेल्वे स्टेशन रोड परिसरात टिपलेले छायाचित्र.



शिवजन्मोत्सवच्या अनुषंगाने सोलापूर शहरातील डाळिंबी आड मैदान येथे मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

## संध्या धर्माधिकारी यांच्या 'बेरं' कथासंग्रहाला आशादीप साहित्य पुरस्कार

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

स्मृती शेष डी. एस. घोडेस्वार यांच्या पाचव्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रज्ञा बागुल व हंसराज बागुल यांनी प्रायोजित केलेल्या राज्य आशादीप साहित्य पुरस्कार येथील ग्रामीण कथा लेखिका संध्या सूर्यकांत धर्माधिकारी यांच्या 'बेरं' कथासंग्रहाला जाहीर झाला आहे. यासाठी राज्यातून प्रतिथयश मान्यवर साहित्यिकांच्या ६५ साहित्यकृती प्राप्त झाल्या आहेत. त्यातील उत्कृष्ट व दर्जेदार ३० साहित्यकृती पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा २६ एप्रिल रोजी भुसावळ येथे संपन्न होणार आहे. सौ. धर्माधिकारी यांच्या बेरं या कथासंग्रहाला हा तिसरा राज्य पुरस्कार जाहीर झाला आहे. यापूर्वी त्यांचा 'रकमा' हा ग्रामीण कथासंग्रह देखील अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेला आहे.




# मी दंड करत नाही, जागेवरच गाड्या निष्काशीत करतो...

## अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांचा इशारा

### सात रस्ता येथे अतिक्रमण हटाव मोहीम

### दोन गाड्या निष्काशीत, दोन गाड्या जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

मी सूचना, दंड वगैरे काही करत नाही. अतिक्रमित गाड्या थेट जागेवरच निष्काशीत करतो. यामुळे कारवाईस अडथळा करू नका. अतिक्रमण करू नका. कारवाई अडथळा केल्यास गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी सात रस्ता येथील कारवाईदरम्यान संबंधित विक्रेत्यांना दिला.

सोलापूर महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज सायंकाळी मोठ्या पोलीस बंदोबस्तात सात रस्ता येथील बिग बजार लगतच्या अतिक्रमित चायनीज व भेळ गाड्यांवर कारवाई केली. मोठ्या फौज फाट्यासह अतिक्रमण विरोधी पथक या ठिकाणी दाखल झाले. येथील भेळच्या गाड्या जागेवरच निष्काशीत करण्यात आल्या. इतर चायनीज व भेळ च्या गाड्यांवर कारवाई करत असताना काही विक्रेत्यांनी दंड करा पण गाड्या निष्काशीत करू नका, गाड्या सोडा अशी विनंती अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांना केली. तर दुसरीकडे ज्यांच्या गाड्या निष्काशीत केल्या त्यांनी कारवाई पूर्णपणे करा.

कुणालाही सोडू नका, अशी मागणी केली. यावेळी पुन्हा काही विक्रेत्यांनी दंड करून गाड्या सोडा, आम्ही पुन्हा या परिसरातही दिसणार नाही अशी विनवणी केली. त्यावर अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी मी सूचना अथवा दंड करत नाही तर थेट गाड्या निष्काशीत करतो. यामुळे कुणीही अडथळा करू नका. कारवाई करू द्या. अडथळा केल्यास थेट गुन्हा दाखल करण्यात येईल. जर गाड्या सोडल्या तर कारवाई करणाऱ्यांवर अन्याय होईल, असा आक्रमक इशारा दिला. त्यानंतर विरोध मावळला. दरम्यान, या ठिकाणी अतिक्रमित दोन भेळच्या गाड्या जागेवरच जेसीबीच्या साह्याने निष्काशीत करण्यात आल्या तर दोन गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत, अशी माहिती अधिक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिली. शहरात सार्वजनिक ठिकाणी रस्त्याला अडथळा होणारे अतिक्रमण हटविण्याची मोहीम सातत्याने सुरूच राहणार आहे, असे बनसोडे यांनी स्पष्ट केले.





## इलिझियम क्लब जामश्रीतर्फे दिव्यांग आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू गंगा कदमचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १३ फेब्रुवारी**

अंध भारतीय महिला क्रिकेट क्षेत्रात भारताचे नाव जागतिक पातळीवर उज्ज्वल करणाऱ्या भारतीय अंध महिला क्रिकेट संघाच्या उपकर्णधार गंगा कदमचा आज इलिझियम क्लब -जाम श्रीच्या सदस्यांकडून डॉ. रोहिणी देशपांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी गंगाचे प्रशिक्षक अनिल सांब्राणी यांचाही इलिझियम कल्बच्या दस्यांच्या वतीने डॉ. दिलीप जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. गंगांने सरावाची सुरुवात २०१६ पासून जामश्री क्रिकेट अकादमी येथून प्रशिक्षक सांब्राणी यांच्याकडून केली व सध्या ती जामश्री अंकित इलिझियम क्लब येथे सराव करत आहे. तिला जामश्रीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश दमाणी व संतोष भंडारी यांचे सहकार्य लाभले. यावेळी इलिझियम क्लबचे मेंटॉर राजीव देसाई, क्लबचे सदस्य विजय जाधव, उदयशंकर चाकोते, राजेश नाईक, ॲड. दत्तात्रय अंबुरे, धनंजय हिरेमठ, मोहित मेहता, पार्थ शहा, प्रा. अतुल बाकळे आदी उपस्थित होते.

## गजानन महाराज प्रकट दिन विविध कार्यक्रमांनी साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

संत श्री गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त तुळजापूर वेस येथील श्री नगरेश्वर मंदिरात गुरुमाउली सेवा संघाच्यावतीने पारंपरिक गुलाल यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गजानन महाराजांच्या विजय ग्रंथातील २१ व्या अध्यायाचे सामुदायिक पारायण करण्यात आले. त्यानंतर गुलालाचा कार्यक्रम होऊन भाविकांसाठी महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला.

याप्रसंगी नगरसेवक किसन जाधव, ज्योतिषाचार्य महेश ओव्हाळ, डॉ.संतोष पै, केशव चाटला, नागेश बिराजदार, राजू केत, अभिषेक सालुटगी, दीपक दुरे-पाटील, दत्ता भोसले, सुषमा सुरवसे, बाई भोसले, विजया चटके, सुजाता जुगदार उपस्थित होते.

## आ.देशमुखांच्या दुबई दौऱ्याची फलश्रुती!

### 'कन्सिस्टंट इंजिनिअरिंग कन्सल्टंट्सच्या कार्यालयाचे आज उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

कन्सिस्टंट इंजिनिअरिंग कन्सल्टंट्स प्रा.लि. या कंपनीच्या नवीन सोलापूर कार्यालयाचे उद्घाटन शनिवार, दि.१४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता जुळे सोलापूर येथील साईवेद डिव्हाईन, दुसरा मजला, शिवदारे कॉलेजजवळ, विशाल नगर या पत्त्यावर होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सुभाष देशमुख उपस्थित राहणार आहेत.

आमदार देशमुख यांनी अलीकडील दुबई दौऱ्यादरम्यान तेथील सोलापूरमधील उद्योजकांना आपल्या मायभूमीत उद्योग उभारून स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत उद्योजक सागर कुलकर्णी यांनी सोलापूरमध्ये कंपनीचे नवीन कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. हा उपक्रम दुबई दौऱ्याची फलश्रुती ठरत आहे. सोलापूर सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून जिल्ह्यात उद्योग, गुंतवणूक आणि रोजगारवाढीसाठी विविध उपक्रम राबवले जात असून, या नव्या कार्यालयामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना देणारा हा महत्त्वाचा टप्पा असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.



# मराठवाड्याच्या आतिथ्य सुविधांना बळकटी; 'एनराइज बाय सयाजी'चे उद्घाटन

### 30 खोल्या, प्रशस्त बँक्वेट हॉल्स, भोजन व्यवस्था

### समकालीन बिझनेस हॉस्पिटॅलिटीचा नवा अनुभव

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १३ फेब्रुवारी-**

लातूर शहरातील वाढत्या औद्योगिक 'ओल्ड एमआयडीसी' परिसरात 'एनराइज बाय सयाजी लातूर'ने आपली सेवा सुरु केली आहे. ही सेवा मराठवाडा प्रदेशातील आतिथ्य क्षेत्रासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. लातूर रेल्वे स्थानकापासून हे हॉटेल सुमारे ३ किमी अंतरावर असून सोलापूर विमानतळापासून १२० किमी अंतरावर आहे.



३० खोल्यांचे हे हॉटेल लातूरला देशातील वेगाने विकसित होणाऱ्या टियर-२ शहरांमध्ये स्थान मिळवून देणाऱ्या औद्योगिक आणि व्यावसायिक पट्ट्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सज्ज आहे. देशातील प्रमुख सोयाबीन व्यापार केंद्र आणि ११ सहकारी साखर कारखान्यांमुळे ''महाराष्ट्राची साखर पट्टी'' म्हणूनही ओळखले जाते.

'एनराइज बाय सयाजी लातूर'मध्ये व्यवसाय व विरंगुळ्यासाठी प्रवास करणाऱ्या पाहुण्यांसाठी तीन श्रेणींमध्ये एकूण ३० खोल्यांची सुविधा उपलब्ध आहे१८ डिलक्स रूम्स, ९ एक्झिक्युटिव्ह रूम्स आणि ३ प्रीमियम एक्झिक्युटिव्ह रूम्स. प्रत्येक खोली आधुनिक सुविधा आणि आरामदायी रचनेने सज्ज आहे

येथे विविध आकारांचे चार प्रशस्त बँक्वेट हॉल्स उपलब्ध असून ते बोर्ड मिटिंग्स, प्रशिक्षण सत्रे, मोठ्या परिषदांपासून सामाजिक समारंभांपर्यंत सर्व कार्यक्रमांसाठी उपयुक्त आहेत. 'ज्वेल' हा सर्वात मोठा हॉल थिएटर शैलीत सुमारे ७०० पाहुण्यांची क्षमता असलेला आहे.

'सॉलिटेअर' मध्यम आकाराच्या कार्यक्रमांसाठी, 'क्रिस्टल' कॉर्पोरेट बैठका-समारंभांसाठी, 'कनेक्ट' हा छोट्या चर्चांसाठी सुसज्ज बोर्डरुम आहे. निवास आणि कार्यक्रम सुविधांना पूरक म्हणून 'मोमेंट्ट' आणि 'होरायझन' ही मल्टी-क्युजिन रेस्टॉरंट्स उपलब्ध आहेत, असे सयाजी हॉटेल्सचे असोसिएट जनरल मॅनेजर राजेंद्र जोशी यांनी सांगितले.

# दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सवामध्ये सोलापूर विद्यापीठाची उल्लेखनीय कामगिरी

### तब्बल 13 पारितोषिके मिळवून चमकदार यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली यांच्या वतीने म्हैसूर येथे आयोजित ३९ व्या दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सवमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने ऐतिहासिक व अभूतपूर्व अशी कामगिरी नोंदवित एकूण १३ पारितोषिके पटकावली. त्यामध्ये ११ वैयक्तिक व सांघिक स्पर्धांतील बक्षिसांसह दोन विभागांतील सर्वसाधारण विजेतेपदे मिळवून विद्यापीठाने आजवरची सर्वोच्च कामगिरी साध्य केली आहे.

विभागीय महोत्सवाच्या इतिहासात प्रथमच विद्यापीठाला वैयक्तिक आणि सामूहिक कलाप्रकारांत एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने पारितोषिके मिळाल्याने हा विक्रम विशेष ठरला आहे. दि. ९ ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत उत्साहपूर्ण वातावरणात ही स्पर्धा झाली. कर्नाटक, महाराष्ट्र आणि गोवा या तीन राज्यांतील एकूण ३६ विद्यापीठांचा सहभाग लाभलेल्या या महोत्सवात विविध कला प्रकारांतील चुरशीच्या स्पर्धांनी रंगत आणली.




ललित कला विभागात 'जनरल चॅम्पियन ट्रॉफी'मध्ये द्वितीय क्रमांक : ललित कला विभागात विद्यापीठाने एकूण द्वितीय विजेतेपद मिळवले. कार्टूनिंग आणि पोस्टर मेकिंग या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावत आपले वर्चस्व सिद्ध केले. तसेच कोलाज आणि ऑन द स्पॉट पेंटिंग या प्रकारांत चतुर्थ क्रमांक, तर रांगोळी स्पर्धेत पाचवा क्रमांक मिळवून सर्वांगीण गुणवत्ता दाखवून दिली. वाङ्मय विभागात तृतीय क्रमांक : वाङ्मयीन स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. 'जनरल चॅम्पियन ट्रॉफी'मध्ये तृतीय क्रमांक पटकावत विद्यापीठाने आपली बौद्धिक ताकद सिद्ध केली. हिंदी वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक, तर हिंदी वादविवाद स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून विद्यार्थ्यांनी प्रभावी मांडणी व विचारशक्तीचे दर्शन घडवले.

इतर कला प्रकारांमध्येही यशाची नोंद : मिमिक्री स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत विद्यार्थ्यांनी अभिनय कौशल्याची छाप पाडली. फोक ऑर्केस्ट्रा आणि क्रिएटिव्ह कोरिओग्राफी या प्रकारांत चतुर्थ क्रमांक, तर तालवाद्य स्पर्धेत पाचवा क्रमांक मिळवत सांघिक सादरीकरणातही विद्यापीठाने भरीव कामगिरी केली. या यशामुळे विद्यापीठाची कला, साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रातील गुणवत्ता अधोरेखित झाली आहे.

कुलगुरु प्रा.डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरु डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.केदारनाथ काळवणे यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण मेहनत, शिस्तबद्ध तयारी आणि सर्जनशीलतेच्या जोरावर हे यश संपादन केल्याचे त्यांनी नमूद केले.

# आम्ही प्रश्न मांडले, महापौरांनी ते सोडविले : डॉ.कोठे



### शांती चौकातील हिंदू स्मशानभूमीची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

अक्कलकोट रोड, शांती चौक येथील महापालिकेच्या हिंदू स्मशानभूमीची दूरवस्थेबाबत एका निवेदनाद्वारे आम्ही महापालिकेकडे प्रश्न मांडले होते. महापौर विनायक कोंड्याल यांनी याची दखल घेत या स्मशानभुमीच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देत ते सोडविले, असे पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष डॉ.सूर्यप्रकाश कोठे यांनी सांगितले.

वॉचमनची नियुक्ती करण्यात यावी, शौचालयाची व्यवस्था करावी, कंपाउंड वॉल उभारावे, विद्यमान भिंतीची उंची वाढवावी, रस्ता तयार करावा, कचरापेट्यांची व्यवस्था करावी, लाईट पोल्सची संख्या वाढवावी आदींकडे लक्ष वेधण्यात आले होते. महापौर विनायक कोंड्याल यांनी या स्मशानभूमीची पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, अधीक्षक अभियंता अनिल चव्हाण, विभागीय अधिकारी बक्षी, डॉ.सूर्यप्रकाश कोठे, वासुदेव इप्पलपल्ली, दयानंद मामड्याल, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, सचिव संतोष सोमा, नरसप्पा इप्पाकायल, बाबा मिस्त्री, विश्वनाथ दुर्लेकर, छत्रपती अवशेट्टी, भूलिंगम रापेल्ली, भोजराज पवार, गणेश बिराजदार, सुरेंद्र शिंदे, विनायक खरात, सुनील पाचंगे आदी उपस्थित होते.

### बजेटमध्ये तरतूद करण्याची ग्वाही

येथील संरक्षक भिंतीची उंची वाढविणे, वृक्षारोपणाचा उपक्रम हाती घेणे यांसह विविध कामांसाठी बजेटमध्ये निधींची तरतूद करण्याची ग्वाही महापौर विनायक कोंड्याल व अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी दिली. महापालिकासह शासनाचा विविध योजनांमधून या स्मशानभूमीचे प्रश्न मार्गी लावणार आहोत, असेही सांगण्यात आले.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT


## ▶▶ महत्वाचे...

### सामुहिक ईष्टलिंग पूजनाचे उद्या आयोजन

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**
आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळ, सोलापूर यांच्या वतीने महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वानिमित्त रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.०० वाजता योगविहार, विजापूर रोड, इंदिरानगर जवळ येथे सामूहिक ईष्टलिंग पूजनाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे हे २२ वे वर्ष असून, हा उपक्रम सातत्याने पार पडत आहे. सदर पूजन शास्त्रोक्त पद्धतीने अध्यात्मिक ज्येष्ठ मान्यवर व तज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे. पूजनासाठी आवश्यक साहित्याची व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली असून इच्छुकांसाठी पूजनार्थ ईष्टलिंगही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी आत्मशुद्धी, ऊर्जा वृद्धी व आध्यात्मिक उन्नती साधण्यासाठी सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी केले आहे.

### साने गुरुजी शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी उल्हास बिराजदार

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**
साने गुरुजी शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी उल्हास बिराजदार यांची तर व्हाईस चेअरमनपदी फरजाना रचभरे यांची निवड करण्यात आली. पतसंस्थेच्या कार्यालयात निवडणुक निर्णय अधिकारी सुरेश जुजगार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी चेअरमन व व्हाईस चेअरमनपदासाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्याने बिनविरोध निवड झाल्याचे निवडणुक निर्णय अधिकारी सुरेश जुजगार यांनी जाहीर केले. यावेळी पतसंस्थेचे सचिव आप्पाराव इटेकर, विरभद्र यादवाड, सुनिल चव्हाण, भिमराया कापसे, मुरलीधर कडलासकर, भाऊसाहेब मोरे, जयंत गायकवाड, शिवानंद हिरेमठ महादेवी पाटील आदि संचालक उपस्थित होते.



### नटराज नृत्यसंगीत विद्यालयातर्फे आज सांस्कृतिक कार्यक्रम

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**
रघुनाथ गड्डम यांच्या नटराज नृत्य संगीत विद्यालयाच्यावतीने आज, शनिवार, दि.१४ फेब्रुवारी रोजी हुतात्मा स्मृती मंदिरात दुपारी दोन वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात भरत नाट्यम नृत्य, सेमी क्लासिकल व समूह नृत्य यावर आधारित कार्यक्रम होणार आहे. मोनिका द्यावनपल्ली व लतिका बल्ला यांच्या मार्गदर्शनाखाली १५५ विद्यार्थिंनी सहभागी होणार आहे.

# कर्जमाफीची हालचाल वेगात; शेतकऱ्यांची मागविली यादी

## सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या थकबाकीदार शेतकऱ्यांना दिलासा?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**
राज्यातील थकबाकीदार शेतकऱ्यांसाठी दिलासादायक घडामोडी सुरू झाल्या आहेत. ३० जून आणि ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकबाकीत असलेल्या शेतकऱ्यांची सविस्तर माहिती सहकार विभागाने सर्व बँकांकडून मागविली आहे. यामुळे लवकरच नव्या कर्जमाफीबाबत निर्णय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, १९९० पासूनचे थकबाकीदार, तसेच यापूर्वी कर्जमाफीचा लाभ घेतलेले शेतकरी यांचाही तपशील शासन पातळीवर गोळा केला जात आहे.

सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक थकबाकी असल्याने सोलापूर जिल्ह्यातील परिस्थिती चिंताजनक मानली जात आहे. जिल्ह्यात एकूण ७,२५,९१६ शेतकरी असून एकूण कर्जवाटप १४,३५४ कोटी रुपयांचे आहे. त्यापैकी २,७१,९७३ शेतकरी सध्या थकबाकीत आहेत. या थकबाकीची रक्कम तब्बल ३,९७६ कोटी रुपये इतकी आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेचेच सुमारे २४ हजार शेतकरी थकबाकीत असल्याचे समोर आले आहे. राज्यभरातील आकडेवारीनुसार, ३० जून २०२५ पर्यंत २४ लाख ७३ हजार ५६६ शेतकऱ्यांकडे एकूण ३५ हजार ४७७ कोटी रुपयांची थकबाकी आहे. संभाव्य कर्जमाफीसाठी सुमारे ४० हजार कोटी रुपयांचा निधी लागणार असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

**मंगळवेढा तालुक्यातील अडचणी :** सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे थकबाकीदारांची माहिती प्राप्त झाली असून ती शासनाला ऑनलाइन पाठविली जात आहे. मात्र मंगळवेढा तालुक्यातील काही विकास कार्यकारी सहकारी सोसायट्यांकडून आवश्यक माहिती अद्याप प्राप्त झालेली नसल्याची चर्चा आहे. जर ही माहिती मुदतीत शासनाकडे पोहोचली नाही, तर त्या भागातील शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती :** राज्य सरकारने कर्जमाफीच्या पार्श्वभूमीवर सखोल अभ्यास सुरु केला आहे. माजी सनदी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असून, पुढील दीड महिन्यांत समितीचा अहवाल शासनाला सादर होणार आहे. या अहवालाच्या आधारे दीर्घकालीन उपाययोजना आणि कर्जमाफीचा अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

**वारंवार कर्जमाफी का करावी लागते? :** रवर्षी कोणत्या जिल्ह्यांतील शेतकरी अधिक प्रमाणात थकबाकीत जातात, त्यांची पीकपध्दती, जमिनीचा प्रकार, पाण्याची उपलब्धता आणि हवाम ानाचा परिणाम यांचा सखोल अभ्यास कृषी विभागामार्फत केला जात आहे. वारंवार कर्जमाफी का करावी लागते? यामागील मूळ कारणांचा शोध घेण्यावरही भर देण्यात आला आहे.

### राज्यभरातील शेतकऱ्यांचे लागले लक्ष

सध्याच्या हालचाली पाहता, राज्यात व्यापक कर्जमाफी जाहीर होण्याची शक्यता बळावत आहे. मात्र अंतिम निर्णय समितीच्या अहवालानंतरच होणार आहे. बँका आणि सहकार विभागाकडून माहिती संकलनाची प्रक्रिया वेगाने सुरु आहे. येत्या काही महिन्यांत शेतकऱ्यांच्या भवितव्याचा निर्णय होणार आहे. त्यामुळे सोलापूरसह राज्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष आता शासनाच्या निर्णयाकडे लागले आहे.




### नियमित कर्जदारांनाही प्रोत्साहन

३० जून आणि ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या थकबाकीदारांबरोबरच मागील पाच वर्षांतील नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची माहितीही सहकार विभागाने मागविली आहे. २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा विचार सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे केवळ थकबाकीदार नव्हे, तर प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्यांनाही शासनाकडून दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

# वंदे भारत एक्सप्रेसमध्ये साप ठेवणाऱ्याला अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**
मध्य रेल्वेच्या आरपीएफ पथकाने एक महत्त्वपूर्ण यश मि ळवत दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी वंदे भारत एक्सप्रेसम ध्ये साप ठेवणाऱ्या एका आरोपीला अटक केली आहे. नाशिक जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या ३७ वर्षीय आरोपीचे नाव जगन अर्जुन भाले आहे. दि.१२ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंब्रा येथून त्याला अटक करण्यात आली.



दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी गाडी क्रमांक २२२२५ च्या कोच सी-१६ च्या शौचालयात एक साप आढळला. शौचालय तात्काळ बंद करण्यात आले आणि नियंत्रण कक्षाला कळवण्यात आले. सोलापूर स्थानकावर सापाला सुरक्षितपणे वाचवण्यात आले.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये एका अज्ञात व्यक्तीने शौचालयात साप ठेवल्याचे उघड झाले. रेल्वे कायदान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आणि प्रकरणाचा तपास सुरू झाला. सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने आणि एका गुप्त माहीतगाराने दिलेल्या माहितीनुसार, आरपीएफ पथकाने कारवाई केली आणि मुंब्रा येथील आरोपी जगन अर्जुन भाले याला अटक करण्यात आली. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली.

# जिल्हा न्यायाधीश राणे यांची नंदुरबारला बदली; बार असोसिएशनतर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१३ फेब्रुवारी-**
सोलापूर जिल्हा न्यायाधीश योगेश राणे यांची नंदुरबार येथे बदली झाली आहे. सोलापूर बार असोसिएशनतर्फे जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.बाबासाहेब जाधव, सचिव ॲड.बसवराज हिंगमिरे यांच्या हस्ते सत्कार करुन त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.



न्यायाधीश योगेश राणे यांनी सोलापूर येथे कार्यरत असताना न्यायदान प्रक्रियेत पारदर्शकता, शिस्त, वेळेचे काटेकोर पालन, न्यायालयीन कामकाजात गती यावर विशेष भर दिला. वकिलांशी असलेले सुसंवादपूर्ण व सहकार्याचे संबंध, न्यायप्रक्रियेत दाखवलेली तटस्थता व न्यायनिष्ठा यामुळे ते वकील वर्गात विशेष लोकप्रिय ठरले, असे सांगण्यात आले. याप्रसंगी जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग रजपूत, ॲड.एन.के. शिंदे, ॲड.बापूसाहेब देशमुख, ॲड.शरद पाटील, ॲड.नीलेश जोशी, ॲड.रियाज शेख, ॲड. मीरा प्रसाद यांच्यासह वकील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महापौर कोंड्याल यांनी केला आ. कल्याणशेट्टी यांचा सत्कार

**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांनी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी व महापौरांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी महापौर विनायक कोंड्याल यांनी सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासंदर्भात विविध विषयांवर चर्चा केली. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनीही सोलापूर शहराच्या विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली. यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांनी अक्कलकोटचे नूतन नगरअध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांचा सत्कार केला.

# निकृष्ट रस्ता; दुसऱ्या दिवशीही अन्नत्याग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**
सोलापूर शहरातील प्रभाग क्र. १५ मधील कोनापुरे चाळ परिसरात पाईपलाईन कामानंतर करण्यात आलेल्या कथित निकृष्ट रस्ता दुरुस्तीच्या निषेधार्थ नीलेश श्रीनिवास संगेपाग यांचे अन्नत्याग आंदोलन आज दुसऱ्या दिवशीही सुरु राहिले आहे.



प्रशासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या परिसरात पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता पूर्ववत करताना संपूर्ण रुंदीमध्ये लाईक टू लाईक पद्धतीने डांबरीकरण करण्यात आले नाही. अत्यल्प जाडीचे, अंदाजे अर्धा ते एक इंच कॉंक्रीट टाकण्यात आल्याने रस्त्याची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट झाले आहे. रस्त्यावर खड्डे निर्माण झाले असून मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. श्रीकांत वाघमारे, जुबेर हिरापुरे, मल्लिकार्जुन पिलगेरी, आकाश गायकवाड, सुचित्रा वाघमारे यांच्यासह अनेक नागरिक आंदोलनस्थळी उपस्थित राहत आहेत. प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा संगेपाग यांनी दिला आहे.

### बेलाटीच्या बाळूमामा मंदिरात उद्या कार्यक्रम

**सोलापूर :** बेलाटी येथील विजयपूर-पुणे या महामार्गावरील सद्गुरु संत बाळूमामा मंदिरात रविवार, १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री व अमावस्या निमित्त विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती मंदिर समि तीचे अध्यक्ष श्रीराम पाटील-बेलाटकर यांनी दिली. सोमवार व मंगळवार मंदिरात भजन, कीर्तन आणि धनगर ओव्यांच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# स्थायी, परिवहनसह स्वीकृत सदस्यांसाठी रस्सीखेच

- स्वीकृत सदस्यसाठी भाजपात प्रचंड गर्दी
- तडवळकर, अळ्ळीमोरे, जामगुंडे यांची नावे आघाडीवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**
महापालिकेत यावेळी दहा स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. या दहापैकी नऊ भाजपचे असतील तर एक एमआयएम पक्षाचा असेल. भाजपकडे इच्छुकांची मोठी गर्दी आहे. 'स्वीकृत'साठी भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, सरचिटणीस सुधा अळ्ळीमोरे, प्रभाकर जामगुंडे यांची नावे आघाडीवर आहेत. दरम्यान, अनेकांनी आपापल्या कुवतीनुसार फिल्डिंग लावली आहे. भाजपाच्या तीनही आमदारांच्या शिफारशीने स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. भाजपवर नाराज असलेल्या सम ाजाला संधी दिली जाण्याची शक्यता आहे.

नव्याने स्थापन झालेल्या महापालिकेची पहिली सर्वसाधारण सभेत स्थायी समिती, परिवहन समि तीसह स्वीकृत सदस्यांची निवड होणार आहे. महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली होणारी ही पहिलीच सभा आहे. नवनिर्वाचित सदस्यांनादेखील या सभेची उत्सुकता आहे. गटनेते, विरोधी पक्षनेता याबाबत सभागृहातले चित्र याचदिवशी स्पष्ट होणार आहे. या सभेची विषयपत्रिका प्रसिध्द झाली असून त्यामध्ये चार विषय आहेत. या सभेत स्थायी समितीचे १६ आणि परिवहन समितीचे १२ सदस्य निवडले जातील. स्थायी समितीचे सदस्य महापालिकेवर निवडून आलेल्या सदस्यांम धूनच नियुक्त केले जातील. स्थायी समिती ही महापालिकेची सर्वात महत्वाची समिती आहे. आर्थिक निर्णय घेण्याचे अधिकार या समितीला आहेत. पुढील महिन्यात महापालिकेचे बजेट असल्याने ही समिती अधिक सक्षम करण्याच्यादृष्टीने भाजप विचार करेल. परिवहन समितीचे सदस्य निवडण्याचा अधिकार मात्र राजकीय पक्षांचा आहे. या समितीवर कार्यकर्त्यांची वर्णी लावण्यात येते. परिवहन विभागाची अवस्था बिकट आहे. या विभागाला उर्जितावस्था मिळवून देण्याच्या दृष्टीने या क्षेत्राची माहिती असणाऱ्या कार्यकर्त्यांना या समितीवर संधी दिली जाणार आहे.

**स्थायी, परिवहन समितीच्या चेअरमन पदावर अनेकांचा डोळा**

स्थायी समिती आणि परिवहन समिती चेअरमन पदावर अनेकांचा डोळा आहे. दोघांसाठी स्वतंत्र गाडी आहे. कार्यालय आहे. भत्तादेखील आहे. बजेटमध्ये खर्चाची तरतूद आहे. मागच्या टर्ममध्ये चेअरमन पदाचा वाद सर्वोच्च न्यायालयात गेल्याने चार वर्षे हे पद रिक्त राहिले होते. शहर उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयकुमार देशमुख यांचे कार्यकर्ते अपेक्षा बाळगून आहेत. अनंत जाधव, राजकुमार पाटील, प्रा.नारायण बनसोडे, रंजीता चाकोते गणेश वानकर यांची नावे चर्चेत आहेत.

**विरोधी पक्षनेतेपदाबाबत मौन**

२० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महापालिकेच्या पहिल्या सभेत विरोधी पक्षनेतेपदावर कोणाची निवड केली जाणार? याबाबत सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे नेते मौन बाळगून आहेत. १०२ सदस्यांच्या सभागृहात भाजपचे ८७ सदस्य आहेत. विरोधी पक्षाचे १५ सदस्य निवडून आले आहेत. यामध्ये एमआयएमचे ८ सदस्यांचा समावेश असून विरोधी बाकावरचा सर्वात मोठा पक्ष आहे. नियमानुसार या पक्षाला विरोधी पक्षनेतेपद दिले पाहिजे. परंतु ती इच्छा सत्ताधारी भाजपाची नसल्याने ते कायद्याचा कीस पाडत आहेत. सभेत शिवसेना, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस यांची भूमिका काय असेल तेदेखील स्पष्ट होईल.



# छत्रपती शिवाजी महाराज चौक सुशोभीकरणावरुन पेटला वाद

## ऐतिहासिकतेला तिलांजली, तीव्र आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**
सोलापूर शहराच्या अभिमानाचे प्रतीक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सुशोभीकरणाच्या कामावरुन नव्याने वादंग निर्माण झाला आहे. येथील काम निकृष्ट दर्जाचे झाले असून त्यात ऐतिहासिकतेचा अभाव असल्याचा आरोप शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. जनभावनेचा आदर राखत १९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या शिवजयंती उत्सवानंतर या विषयावर व्यापक जनआंदोलन उभारण्यात येणार आहे, असा इशाराही देण्यात आला आहे



छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाशी संबंधित स्थळाचे सुशोभीकरण करताना ऐतिहासिक संदर्भ, वास्तुरचना आणि दर्जा यांचा विचार होणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात झालेले काम दर्जाहीन असून त्यात कोणतीही ऐतिहासिक झलक दिसत नाही. त्यामुळे सदरचे काम ऐतिहासिक दर्जाचे करावे. या कामासाठी झालेल्या खर्चावर तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीवरही प्रश्नचिन्ह उभा राहतो, असेही सांगण्यात आले.

**शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या चौकातील कामाच्या संदर्भात शिवप्रेमींमध्ये तीव्र संतापाची लाट आहे. शिवजयंती उत्सवाला आणि पाळण्यासोहळ्याला बाधा येऊ नये म्हणून मध्यवर्ती महामंडळ शांत होते. शिवजयंतीनंतर यासंदर्भात तीव्र लढा उभा करु, असे मध्यवर्ती महामंडळाचे सदस्य श्रीकांत डांगे यांनी सांगितले.

**पदाधिकाऱ्यांना घेतले नाही विश्वासात**

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरणासाठी आलेला निधी लॅप्स होण्याची भीती घालून घाईघाईत सदरचे काम केले आहे. मध्यवर्तीच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले गेले नाही. याला कोणताही ऐतिहासिक वारसा नसल्याने हे काम शिवप्रेमींना पसंत नाही, असे मध्यवर्ती महामंडळाचे सदस्य राजन जाधव यांनी सांगितले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३५६

**मग संजयो म्हणे रायातें । आईकें तो पार्थु तेथे ।**
**शोकाकुल रुदनातें । करितुसे ।।**

कुरुक्षेत्रावर लढण्यासाठी गेलेल्या कौरव-पांडव सैन्याची सविस्तर माहिती संजयाने राजा धृतराष्ट्राला दिली. त्यानंतर आपल्याशी कोण लढणार आहे हे पाहाण्यासाठी अर्जुन कौरव सैन्याच्या पुढे आला. आपल्या समोर लढणारे दुसरे-तिसरे कोणी नसून आपले बंधू, गुरुजन, ईष्ट मित्र, पितामह आहेत हे पाहिल्या नंतर तो मोहग्रस्त झाला. मोहग्रस्त झाल्याने अर्जुनाची वीरवृत्ती कशी निघून गेली, त्यानंतर तो गांगारुन काय-काय बोलू लागला याचे सविस्तर विवेचन संजयाने राजा धृतराष्ट्रासमोर केले. हे सर्व ऐकुन राजाला कसा आनंद होत गेला हे संजय पाहात होता. पण राजापुढे बोलायचे कसे म्हणून तो गप्प राहिला. अर्जुनाची म ोहग्रस्तपणामुळे झालेली स्थिती ऐकण्यात राजाला आनंद वाटू लागला. आता मोहग्रस्त अर्जुन नेम के काय करणार हे जाणून घेण्याची राजाला ईच्छा झाली. राजा आपली ईच्छा संजयापुढे प्रकट करणार त्या अगोदरच संजय पुढील वृत्तांत सांगू लागला. मोहग्रस्त झालेल्या अर्जुनाने आपल्या हातातील धनुष्यबाण टाकुन दिले, त्याला त्याचे अश्रु आवरेनात. हे युध्द करण्यापेक्षा संन्यास घेऊन सर्व वैभवाचा त्याग करण्याची त्याची मानसिक तयारी झाली. इथपर्यन्त माऊलींनीं पहिल्या अध्यायात वर्णन केले आहे.



दुसऱ्या अध्यायाच्या प्रारंभी हे उपरोक्त ओवी आली आहे. या ओवीत संजय म्हणतो, राजा, अर्जुन रणभूमीवर शोकाकुल होऊन रडत आहे. धर्मक्षेत्रावर स्वकीय पाहून त्याच्या चित्तात अपुर्व असे प्रेम निम ाण झाले आहे. पाण्याने जसे मीठ विरघळते, वाऱ्याने जसे ढग हलत जातात, अगदी तसे धैर्ययुक्त असलेल्या अर्जुनाची वीरवृत्ती, चित्त विरघळले आहे. त्यामुळे अर्जुन चिखलात रुतलेल्या राजहंसाप्रमाणे कोमेजून दीनवाणा झाल्याचे संजय म्हणाला. हे सर्व सांगत असतांना संजय सुध्दा कोमेजून गेल्यासारख्या झाला होता. कारण न्यायाच्या बाजूने लढणाऱ्या अर्जुनाचे युध्द प्रारंभ होण्यापुर्वीच असे हाल झाले तर युध्दाचे काय खरे? असा प्रश्न संजयासमोर उभा झाला होता. पण धृतराष्ट्र मात्र हे सर्व ऐकून आनंदी झाल्याचे संजयाच्या लक्षात येत होते. आपली मुलं न लढताच विजयमाला प्राप्त करीत आहेत याचा आनंद राजाला होत होता. दुसऱ्याच्या दु:खात सुख मानण्याची वृत्ती अनेकात असते ती वृत्ती काही अंशी का असेना पण या धृतराष्ट्रात होती. आम्हीही बऱ्याच वेळा असेच वागतो. दुसऱ्याचे काही झाले तरी चालेल, दुसऱ्याने कितीही माघार घेतली तरी चालेल. पण आपण तसूभरही माघार न घेता विजय, आंनद आपणालाच मिळाला पाहिजे असे म्हणतो. ही वृत्ती कधीना कधी तरी आपणाला अडचणीत आणू शकते, याची जाणीव असायला हवी. बाहेर तर सोडाच बरेच लोक आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या बाबतीतही त्याच्या अडचणीत आनंद मानतात. आपल्या बाबतीत असे घडणार नाही याची दक्षता आपण घ्यावी. अशी वृत्ती चांगली नसते हे सदैव लक्षात असावे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार,**
**दि. १४ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ द्वादशी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- पूर्वपाढा(१८.१५)**
**योग - सिध्द (२७.१७)**
**करण - गरज (२८.३७)**
**राहू काल :**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

**दिनविशेष : शनि प्रदोष.**
**व्हॅलेंटाईन डे: प्रेमीयुगुले, मित्र आणि कुटुंबीय आपुलकी व्यक्त करण्यासाठी हा दिवस साजरा करतात**
**भाजपच्या ज्येष्ठ नेत्या आणि दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री सुषमा स्वराज यांचा जन्म**
**टेलिफोन पेटंट: १८७६ मध्ये अलेक्झांडर ग्रॅहम बेल आणि एलिशा ग्रे यांनी टेलिफोनच्या पेटंटसाठी अर्ज केला होता.**

# शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळातर्फे शिवजयंती उत्सवाला प्रारंभ

## श्रीच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा; स्वच्छता कर्मचाऱ्यांचा गौरव करून दिला संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

शहरात शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने शिवजयंती उत्सवाला उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ करण्यात आला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रम ास मान्यवरांची उपस्थिती लाभली. आम दार सुभाष देशमुख, महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्या हस्ते महाराजाच्या मूर्तीची विधिवत पूजा करून आरती करण्यात आली. यावेळी जय भवानी जय शिवाजीच्या घोषणाने परिसर दुमदुमून गेला होता.

शुक्रवार १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता डाळिंब आड येथील मैदानात भगव्या ध्वजाचे अनावरण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून आरती करण्यात आली. यानंतर महाप्रसादाचे वाटप करून शिवजयंती उत्सवाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. परिसर जय भवानी जय शिवाजी घोषणांनी आणि ढोल-ताशांच्या गजरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.



शिवजयंती उत्सवामुळे शहरात सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.यावेळी मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने महापालिकेतील नगर अभियंता, विद्युत विभाग तसेच घनकचरा विभागातील स्वच्छता कर्मचारी महिलांचा मध्यवर्तीच्यावतीने शाल,श्रीफळ, स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मध्यवर्ती म हामंडळाच्या ट्रस्ट अध्यक्ष पद्माकर काळे, उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर, कार्याध्यक्ष उत्तरा बरडे-बचुटे, संजीवनी मुळे, उज्वला साळुंखे, राजन जाधव, श्रीकांत डांगे, श्रीकांत घाडगे, नगरसेवक विनोद भोसले, शिवाजी वाघमोडे, ज्ञानेश्वर सपाटे, बाबासाहेब जाधव, दत्तामामा मुळे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देविदास घुले, सचिन स्वामी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले.



## महापौर विनायक कोंड्याल यांनी घेतली आ. विजयकुमार देशमुख यांची सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिकेचे नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी आमदार विजयकुमार देशमुख यांची भेट घेतली. याप्रसंगी आ. विजयकुमार देशमुख यांनी महापौर विनायक कोंड्याल यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी शहराच्या विकासासंदर्भात विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महानगरपालिका व राज्य शासन यांच्यात समन्वय ठेवून काम करण्याची गरज असल्याचे मत दोन्ही मान्यवरांनी व्यक्त केले. या भेटीप्रसंगी नगरसेवक संजय कोळी, नगरसेवक शिवानंद पाटील, अविनाश पाटील, नगरसेवक राजकुमार पाटील, नगरसेवक अमर पुदाले, पिंटू डावरे उपस्थित होते.

# 'लाडक्या बहिणींना' मिळणार एकरकमी सहा हजार रुपये

## ई-केवायसी व पडताळणीसाठी ३१ मार्चपर्यंत मुदत तर एप्रिलमध्ये होणार वितरण

**सोलापूर, दि. १३ फेब्रवारी-**

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत लाभार्थी महिलांसाठी महत्वाची घडामोड घडली आहे. डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ या चार महिन्यांचे थकित मानधन लाभार्थींना एप्रिल महिन्यात एकरकमी ६००० रुपये म्हणून दिले जाणार असल्याची माहिती संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. मात्र, हा लाभ केवळ ई-केवायसी पूर्ण व अचूक असलेल्या आणि निकषांनुसार पात्र ठरणाऱ्या महिलांनाच मिळणार आहे.

योजनेअंतर्गत दरमहा प्रत्येक पात्र महिलेला आर्थिक सहाय्य दिले जाते. राज्यभरातील सुमारे सव्वादोन कोटी लाभार्थींसाठी दरमहा सरासरी ३२०० कोटी रुपयांचा निधी लागतो. मात्र, डिसेंबरपासून निधी वितरणात खंड पडला होता. आता ई-केवायसी प्रक्रिया, त्यातील त्रुटी दुरुस्ती आणि संशयित लाभार्थींची पडताळणी पूर्ण झाल्यानंतरच थकित रक्कम वितरित केली जाणार आहे.

### पात्र महिलांनाच मिळणार लाभ

शासनाच्या सूचनेनुसार ई-केवायसी, त्रुटी दुरुस्ती आणि पडताळणीची संपूर्ण प्रक्रिया ३१ मार्चपर्यंत पूर्ण केली जाणार आहे. त्यानंतरच पात्र लाभार्थींना थकित चार महिन्यांची एकरकमी रक्कम एप्रिलमध्ये वितरित केली जाईल. त्यामुळे 'लाडक्या बहिणींनी' वेळेत प्रक्रिया पूर्ण करून लाभ निश्चित करावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### सोलापूर जिल्ह्याची स्थिती

सोलापूर जिल्ह्यात एकूण ११,३०,५६३ महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. जिल्ह्यासाठी दरमहा सुमारे १६९.५८ कोटी रुपयांचा निधी लागतो. पडताळणीत सुमारे दोन लाख लाभार्थी कमी होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. सध्या १,१७,५५० महिलांची पडताळणी प्रक्रिया सुरू आहे.

### संशयित लाभार्थ्यांची घरोघरी पडताळणी

योजनेतील अपात्र लाभार्थ्यांना वगळण्यासाठी अंगणवाडी सेविकांमार्फत घरोघरी जाऊन पडताळणी सुरू आहे. वय, उत्पन्न, कुटुंबातील लाभार्थ्यांची संख्या, चारचाकी वाहन, सरकारी नोकरी आदी निकषांची तपासणी केली जात आहे. योजनेनुसार लाभार्थी महिलेचे वय २१ ते ६५ वर्षांदरम्यान असावे, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असावे, चारचाकी वाहन नसावे आणि ती सरकारी नोकरदार नसावी. तसेच एका कुटुंबात जास्तीत जास्त दोन लाभार्थींनाच लाभ मिळू शकतो. तपासणीत अनेक लाभार्थी २१ वर्षांखालील, ६५ वर्षांवरील किंवा मृत असल्याचे आढळले आहे. त्यामुळे अपात्र लाभार्थ्यांची संख्या मोठी असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पात्रता न ठरणाऱ्या महिलांना योजनेतून कायमचे वगळण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### ३१ मार्चपर्यंत अंतिम मुदत

लाभार्थी महिलांसाठी ई-केवायसी बंधनकारक करण्यात आली आहे. ई-केवायसी करताना अनेकांनी चुकीचे पर्याय निवडल्यामुळे काही पात्र महिलांचे पैसे अडकले होते. त्यामुळे त्रुटी दुरुस्तीसाठी शासनाने ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तसेच ज्या महिलांची ई-केवायसी अद्याप पूर्ण झालेली नाही, त्यांनाही हीच अंतिम संधी देण्यात आली आहे.महिला व बालविकास विभागाच्या आयुक्त नयना गुंडे यांनी लाभार्थींना मुदतीत ई-केवायसी पूर्ण करून चुका दुरुस्त करण्याचे आवाहन केले आहे.



## जिजामाता प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

जिजामाता प्रशाला कोंडी (ता. उत्तर सोलापूर)च्या दहावीचा निरोप समारंभात राष्ट्रमाता जिजामाता व संस्थेच्या माजी अध्यक्ष स्वर्गीय निर्मलाताई ठोकळ यांच्या प्रतिम ेचे पूजन संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ यांनी केले व आशीर्वादपर शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेच्या सचिवा शिल्पा ठोकळ संचालक मंडळ प्रशालेचे मुख्याध्यापक उदय जाधव यांनी दहावी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

इ १० वी वर्गशिक्षक सारंग पाटील यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमात वाती शिंदे, नीळ, समृद्धी भोसले या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण सचिन ठोकळ यांनी केले. कार्यक्रमास सारंग पाटील, लक्ष्मण आगलावे, कैलास देशमुख, सुनिता वणगे, शिपाई संतोष कासे उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता नववीच्या सर्व विद्यार्थ्यांनी केले. सूत्रसंचालन स्नेहल जगन्नाथ शिंदे तर आभार आम्रपाली दगडू कांबळे हिने मानले.

## घरगुती भांडणाच्या कारणावरुन चौघांना मारहाण

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

राहत्या घराजवळ असताना घरगुती भांडणाच्या कारणावरून आठ जणांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण चौघांना मारहाण केली. याबाबत अधिक माहिती अशी की, चुंगी येथील राहत्या घराजवळ असताना घरगुती भांडणाच्या कारणावरून बाळू बंदपट्टे, करण बंदपट्टे व इतर ५ ते ६ जणांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यामध्ये सारिका अभिमान बंदपट्टे रा. चुंगी ता. अक्कलकोट, जि. सोलापूर , रत्नाबाई अभिमान बंदपट्टे, राधिका कृष्णा पवार वय २५ वर्षे रा. डोंबार जवळगा, ता. अक्कलकोट यांना सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना अक्कलकोट येथे दाखल करण्यात आले होते. तेथून पुढील उपचारासाठी रेफरने शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल करण्यात आले, अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# प्राध्यापक भरतीला 'ग्रीन सिग्नल'; परंतु शिक्षकेतरांना डावलले

राज्यातील अनुदानित महाविद्यालयांमधील ५,०१२ रिक्त प्राध्यापक पदे भरण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अखेर हिरवा कंदील दाखवला आहे. यामध्ये सोलापूर विभागातील सुमारे ३५० पदांचा समावेश असून, विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयाने यासंबंधीची प्रक्रियाही सुरू केली आहे. मात्र, या निर्णयाचे स्वागत होत असतानाच, दुसरीकडे शिक्षकेतरांची भरती बंदी कायम असल्याने शिक्षकेतर कर्मचारी संघटनेकडून नाराजी व्यक्त होत आहे.

गेल्या वर्षभरात प्राध्यापक भरतीच्या निकषांम ध्ये दुसऱ्यांदा बदल करण्यात आला आहे. नव्या नियमांनुसार गुणदानाची पद्धत याप्रमाणे असेल: शैक्षणिक आणि संशोधन गुणवत्ता: ६० गुण, अध्यापन कौशल्य मूल्यमापन: २० गुण, मुलाखत: २० गुण. यापूर्वी ही पद्धत ७५ (पात्रता) आणि २५ (मुलाखत) अशी होती. वारंवार होणाऱ्या या बदलांमुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत प्राध्यापक संघटनांनी याला विरोध दर्शवला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने १८ जुलै २०१८ रोजी प्रसिद्ध केलेली नियमावली डावलून उच्च शिक्षण विभागाला स्वतंत्र नियमावली ठरवता येत नाही, असा एम. फुक्टोचा आरोप आहे.

**शिक्षकेतर कर्मचारी दुर्लक्षितच?**

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हे महाविद्यालय व्यवस्थापनातील रथाची दोन चाके असल्याचे वारंवार सांगितले जाते. त्यामुळे शिक्षकाबरोबर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचीही भरती बंदी उठवणे क्रमप्राप्त होते. परंतु तसे झाले नाही. कार्यालयीन कामकाज, परीक्षा व्यवस्था, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, वेतननिर्गमन, प्रशासकीय समन्वय आदी सर्व जबाबदाऱ्या शिक्षकेतर कर्मचारी सक्षमपणे पार पाडत असतात. त्यांच्याअभावी शैक्षणिक प्रक्रिया सुरळीत चालूच शकत नाही. वर्षानुवर्षे ही पदे रिक्त असल्यामुळे संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा विस्कळीत होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी शिक्षकेतर कर्मचारी भरतीही तात्काळ उठवावी, हीच शिक्षकेतर कर्मचारी संघटनेची अपेक्षा आहे.

**विद्यापीठ व महाविद्यालयात भेदभाव नको**

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणारे सर्व नियम व आर्थिक फायदे विद्यापीठ व अनुदानित महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जशाच्या तसे लागू होतात. परंतु त्यासाठी उच्च शिक्षण विभागातील अधिकारी शासन निर्णयाची मागणी करतात. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या शासन निर्णयानुसार उच्च शिक्षण विभागाने कोणताही निर्णय लागू करताना विद्यापीठ व म हाविद्यालय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकाच वेळेस लागू करावा. त्यामुळेच महाविद्यालय व विद्यापीठातील आश्वासित प्रगती योजना (१०-२०-३०), महाविद्यालयातील लघुलेखक आणि प्रयोगशाळा सहाय्यक यांचे वेतनश्रेणीचे प्रश्न प्रलंबित राहिले आहेत.



### अधिकाऱ्यांचा नियमबाह्य कारभार

रजा मंजूर करण्याचा अधिकार संबंधित आस्थापना प्रमुखांना असतो. परंतु संबंधित लेखाधिकारी अर्धी रजा नामंजूर करीत आहे. अर्धी रजा न मिळणेबाबत रजा संहितेमध्ये कुठेही नमूद नाही. तसेच वेतन सातव्या आयोगानुसार, रजा रोखीकरण मात्र सहाव्यानुसार. हा अजब कारभार उच्च शिक्षण विभागाचा आहे. कोणत्याही लेखी आदेशाशिवाय गेल्या वर्षभरापासून सर्व विभागातून हा आर्थिक लाभ निवृत्त झालेल्या उन्हाळी व दिवाळी सुट्टी नसलेल्या प्राचार्य, ग्रंथपाल व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मिळाला नाही.




**विद्यापीठातून...**
**अजितकुमार संगवे**
**मो. 9881133103**

**भ्रष्टाचार आणि प्रलंबित लेखापरीक्षण**

उच्च शिक्षण विभागातील लेखाधिकारी कार्यालयातील भ्रष्टाचाराला कधी आळा बसणार असा प्रश्न विद्यापीठ व महाविद्यालय शिक्षक व शिक्षक कर्मचाऱ्यांमधून होत आहे. लेखाधिकारीकडून वेतन निश्चित पडताळणी, निवृत्तीसाठी अंतिम वेतन प्रमाणपत्र ही कामे अर्थपूर्ण तडजोडीशिवाय होत नसल्याचा आरोप कर्मचारी संघटनेने केला आहे. लेखापरीक्षणादरम्यान जाणीवपूर्वक त्रुटी काढणे आणि नंतर त्या सोयीस्करपणे वगळणे, असा नियमबाह्य कारभार या कार्यालयात प्रत्येक महाविद्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यामार्फत चालतो. तसेच विभागीय शिक्षण सहसंचालक आणि लेखाधिकारी कार्यालयाच्या वर्षानुवर्षे प्रलंबित विद्यापीठ व म हाविद्यालयातील लेखापरीक्षणावर आणि भ्रष्टाचारावर मंत्री महोदयानी उपाय योजना करणे गरजेचे आहे. तसेच विद्यापीठ व महाविद्यालयीन कार्यालयीन कामे तत्पर व वेळेत होण्यासाठी लेखाधिकारी व विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय हे एका ठिकाणीच असणे गरजेचे आहे.

# आ. देवेंद्र कोठे यांनी निधी वाढसंदर्भात केलेल्या मागणीला मुख्यमंत्र्यांचा होकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

शहराच्या विकास आराखड्यातील तसेच अक्कलकोट रस्ता, होटगी रस्ता एमआयडीसीतील रस्त्यांकरिता आमदार देवेंद्र कोठे यांनी केलेल्या वाढीव निधीच्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ होकार दिला.

शहराच्या विकास आराखड्यातील रस्ते पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. परंतु सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती नाजूक आहे. त्यामुळे विकास आराखड्यातील रस्त्यांसाठी जिल्हा नियोजन समितीतून वाढीव निधी देण्यात यावा, अशी मागणी केली होती, असे आ. कोठे यांनी सांगितले. अक्कलकोट रस्ता आणि होटगी रस्ता एमआयडीसीतील रस्त्यांकरिता लागणारा निधी ७५ टक्के राज्य शासन आणि २५ टक्के उद्योजकांकडून घेण्याचा निर्णय झाला आहे. हा निर्णय उद्योजकांसाठी त्रासदायक ठरणार आहे. त्यामुळे या निर्णयात बदल करून ७५ टक्के राज्य शासन आणि २५ टक्के जिल्हा नियोजन समिती किंवा महापालिकेकडून घेण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला द्याव्यात, अशी मागणीही केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर शहराच्या विकास आराखड्यातील रस्ते पूर्ण करण्यासाठी वाढीव निधी देण्याच्या मागणीला होकार दिल्यामुळे शहरातील तसेच एम आयडीसी परिसरातील रस्त्यांच्या कामाला आता वेग येणार आहे. या बैठकीस आमदार देवेंद्र कोठे, प्रभारी जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे उपस्थित होते.

### उद्योजकांना मोठा दिलासा

अक्कलकोट रस्ता व होटगी रस्ता औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांकरिता उद्योजकांकडून २५ टक्के रक्कम घेण्याचा निर्णय झाल्यामुळे उद्योजकांमध्ये अस्वस्थता होती. सोलापूरच्या उद्योग जगताला पुन्हा पूर्वीप्रमाणे 'अच्छे दिन' येण्यासाठी २५ टक्के रक्कम उद्योजकांनी भरण्याच्या नियमात बदल करावा, अशी मागणी उद्योजकांकडून करण्यात येत होती. या मागणीची दखल घेऊन आमदार देवेंद्र कोठे यांनी शासन दरबारी सदर प्रश्न मांडत पाठपुरावा केला. मुख्यमंत्र्यांकडून होकार मिळाल्यामुळे उद्योजकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# महापालिकेतील बेशिस्त पार्किंगला बसणार ब्रेक

- **पालिकेकडून पार्किंगबाबत नवीन नियमावली जाहीर**
- **नागरिकांना हुतात्मा स्मृती मंदिर, मनपाच्या मागे पार्किंगची सोय**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

महापालिकेतील बेशिस्त पार्किंगला आळा घालण्यासाठी अखेर प्रशासनाने गुरुवारी नवीन नियमावली जाहीर केली आहे. यानुसार आता नागरिकांना हुतात्मा स्मृती मंदिर तसेच मनपाच्या मागे पार्किंगची सोय करण्यात आली आहे. शासनाकडून आलेल्या अधिकाऱ्यांसाठी पूर्वीच्या ठिकाणीच पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था राहणार आहे. यामुळे आता महापालिकेत पार्किंगसंदर्भात शिस्त दिसून येणार आहे.

महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीत बेशिस्त पार्किंगचा प्रश्न गंभीर बनला होता. विशेष म्हणजे, आयुक्तांच्या दालनाकडे जाणाऱ्या मार्गावरही वाहने उभी केली जात असल्याने ये-जा करताना अडथळे निर्माण होत आहेत. आपत्कालीन परिस्थितीत हीच बेशिस्त पार्किंग मोठा धोका ठरू शकते, अशी स्थिती आहे. यासंदर्भात माध्यमांनी महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधताच गुरुवारी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पार्किंगसंदर्भात नवीन नियमावलीचे परिपत्रक काढले. यानुसार शासनाकडून प्रतिनियुक्तीने आलेल्या अधिकारी यांच्या वाहनांकरिता (अतिरिक्त आयुक्त ते सहाय्यक आयुक्त व इतर) प्रशासकीय इमारतीच्या उजव्या बाजूला (पूर्वीचे पत्राशेडमध्ये) पार्किंगची सोय करण्यात आली आहे. महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी महानगरपालिकेच्या मागील बाजूस आयसीआयसीआय बँक शेजारील जागेत पार्किंगची सोय करण्यात आली आहे. नागरिकांना हुतात्मा स्मृती मंदिर व सोलापूर महानगरपालिकेच्या मागील बाजूस आयसीआयसीआय बँक शेजारील जागेत आपली वाहने लावता येणार आहेत. एकंदर महापालिकेच्या नवीन नियमावलीमुळे महापालिकेतील वाहनांच्या पार्किंगला शिस्त येण्यास मदत होणार आहे.

### नियंत्रणासाठी सुरक्षारक्षक व सीसीटीव्हीची सोय

गुरुवारी पार्किंग संदर्भात काढण्यात आलेल्या परिपत्रकानुसार ठरविण्यात आलेल्या जागेत व्यवस्थितरित्या वाहने लावण्यासाठी व त्यांना सूचना देण्यासाठी सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. नगर अभियंता कार्यालयाकडून वाहने शिस्तीत लावण्यासंदर्भात पांढऱ्या रेघा ओढण्यात येणार आहेत. संगणक विभागाकडून पार्किंग ठिकाणी सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत. यासंदर्भात आयुक्तांनी संबंधित विभागांना कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...




## फार्मसी विद्यार्थ्यांची औषधी वनस्पती उद्यानाला भेट

**टेंभुर्णी, दि. १३ फेब्रुवारी-**

येथील एस.व्ही.एस कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च टेंभुर्णीच्या प्रथम/द्वितीय विद्यार्थ्यांसाठी नुकतीच वसुंधरा औषधी उद्यान आणि वृक्ष संवर्धन इंदापूर येथील औषधी वनस्पती उद्यानाला एक दिवसीय शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती. या भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष वनस्पतींची ओळख आणि त्यांचे औषधी उपयोग समजावून देणे हा होता. या भेटीदरम्यान, विद्यार्थ्यांना उद्यानातील २०० हून अधिक प्रकारच्या दुर्मिळ आणि उपयुक्त औषधी वनस्पतींचे निरीक्षण करण्याची संधी मिळाली. यामध्ये प्रामुख्याने अडुळसा, कोरफड, अश्वगंधा, ब्राह्मी, तुळस, भुईआवळा, सर्पगंधा, नागकेशर, आणि सप्तरंगी यांसारख्या वनस्पतींच्या शास्त्रीय नावांची आणि त्यांच्या औषधीय गुणांची माहिती वनस्पती तज्ज्ञांनी दिली. ही भेट यशस्वी करण्यासाठी संस्थेचेअध्यक्ष राजेंद्र ठोंबरे, कॉलेजचे प्राचार्य कृष्णात ढेकळे, डॉ. नेहा काजळे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.रेणुका देशपांडे, प्रा. ऐश्वर्या सरवदे, प्रा.अभिषेक घागरे, प्रा.सृष्टी काळे, प्रा. भाग्यश्री घाडगे, प्रा. दिग्विजय पाटील यांनी परिश्रम घेतले



## वखारिया विद्यालयात दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**बार्शी, दि. १३ फेब्रुवारी-**

उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयात विद्यार्थी-शिक्षक दिन आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थी शिक्षक दिनाचे अभिरुप मुख्याध्यापक म्हणून प्रथमेश शेंडगे तर उपमुख्याध्यापक म्हणून प्रेरणा पाटील यांनी काम पाहिले स्वयंशासन दिनी इतर विद्यार्थ्यांनी विषय शिक्षक म्हणून अध्यापनाचे कार्य केले. दुपारच्या सत्रात विद्यालयातील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. सुनील विभुते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी प्रमुख पाहुणे आणि मुख्याध्यापक दयानंद रेवडकर अभिरुप मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक यांच्या हस्ते कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.अनिल वैद्य यांनी प्रमुख पाहुण्याचा परिचय करुन दिला तर एन. एन. महाले यांनी प्रस्ताविक केले. डॉ. प्रशांत काशीद, अतुल राठोड यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी सहशिक्षक मकरंद जगदाळे आणि रेवणसिद्ध दुलंगे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन समृद्धी ठोंगे आणि वैष्णवी ढावारे या विद्यार्थिनींनी तर आभार सहशिक्षक डॉ. प्रशांत काशीद यांनी मानले.

## सेवालाल महाराज जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी राहुल राठोड

**अक्कलकोट, दि. १३ फेब्रुवारी-**



तालुक्यातील दूधनी येथील शिवाजी नगर तांडा येथे श्री संत सेवालाल महाराज पोहरादेवी यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. या जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी उद्योजक राहूल राठोड तर उपाध्यक्षपदी डॉ. सुनील चव्हाण यांची निवड करण्यात आली. बैठकीत संत श्री सेवालाल महाराज व जगदंबा मंदिरात तांड्याचे ज्येष्ठ शंकर राठोड, नायक हरीचंद्र राठोड, कारभारी लालू पवार, संस्थापक अध्यक्ष अशोक राठोड यांच्या उपस्थितीत ही निवड करण्यात आली. प्रथम अशोक राठोड यांच्या हस्ते मंदिरात पूजन करण्यात आले. यानंतर महेश चव्हाण खजिनदार, द्वारकेश राठोड सचिव, भारत पवार कार्याध्यक्ष, विश्वनाथ राठोड प्रसिद्धी प्रमुख, धार्मनंद पवार नियोजन प्रमुख मोहन राठोड, अनिल राठोड, अमोल राठोड, रोहन राठोड, गुंडाराज राठोड, जितेस्वर राठोड, सतिश चव्हाण, अनिल राठोड, रुपेश जाधव, किर्ती राठोड, रवि जाधव, निखील राठोड, मिथून पवार, गोपाळ चव्हाण, विनोद जाधव, प्रिन्स राठोड, सोनू पवार, शिवाजी चव्हाण, बंटी पवार, अप्पाराव राठोड, गुरुनाथ राठोड, सोनू अंबादास राठोड तर सल्लागार म्हणून शंकर राठोड, हरीचंद्र राठोड, लालू पवार, लक्ष्मण राठोड, भिल्लू चव्हाण याप्रमाणे सर्वानुमते निवड करण्यात आली.

## टेंभूचे पाणी कोळ्यात दाखल; आ. डॉ. देशमुख यांच्या प्रयत्नांना यश

**सांगोला, दि. १३ फेब्रुवारी-**



सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून तालुक्यातील दुष्काळी पट्ट्यासाठी वरदान ठरलेल्या टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी अखेर कोळा भागात दाखल झाले आहे. कोळा भागात पाणी पोहोचताच शेतकऱ्यांनी मोठा जल्लोष केला. टेंभू योजनेचे पाणी कोळा आणि परिसरातील गावांना मिळावे, यासाठी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी शासन स्तरावर मोठा संघर्ष केला होता. तांत्रिक अडचणी दूर करणे, निधीची उपलब्धता आणि जलसंपदा विभागाकडे केलेला सततचा पाठपुरावा यामुळेच आज हे पाणी या भागात पोहोचू शकले आहे. पाणी दाखल झाल्यानंतर या भागातील शेतकऱ्यांनी आ.देशमुख यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली. मतदारसंघातील प्रत्येक दुष्काळी गावापर्यंत पाणी पोहोचवणे हेच माझे ध्येय आहे. टेंभूचे पाणी कोळ्यात येणे हा केवळ सुरुवात असून, सांगोला तालुका पूर्णतः सुजलाम सुफलाम करण्यासाठी मी कटिबद्ध आहे असे मनोगत आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले.

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून पुरस्कारासाठी प्रस्तावाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**द. सोलापूर, दि.१३ फेब्रुवारी-**

इतर मागास विकास विभागांतर्गत कार्यरत इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत स्थापना करण्यात आलेल्या विविध पुरस्कारांसाठी पात्र व इच्छुक व्यक्ती तसेच समाजाच्या उत्थानासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांकडून महात्मा बसवेश्वर सामाजिक समता शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार, क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार देण्यात येणार आहेत. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख २१ फेब्रुवारी २०२६ असून, अर्ज सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सात रस्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, चौथा मजला, सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. अर्जाचा नमुना व अधिक माहिती संबंधित कार्यालयात उपलब्ध आहे. पात्र व इच्छुक व्यक्ती व संस्थांनी विहित मुदतीत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक गणेश सोनटक्के यांनी केले आहे.

### पुणे स्टेशनवरुन हरंगुळ-पुणे व नांदेड-पुणे रेल्वे पूर्ववत सुरू करा

# रेलरोको आंदोलनाची तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ फेब्रुवारी-**



हरंगुळ-पुणे व नांदेड-पुणे ट्रेन पुणे स्टेशनवरून पूर्ववत सुरु करण्याच्या मागणीसाठी रेल्वे प्रवासी सेलच्यावतीने रेलरोको आंदोलनाची तयारी केली जात आहे. २६ जानेवारीपासून या रेल्वे पुणे स्टेशनवर न जाता हडपसरपर्यंतच धावत आहेत. यापूर्वी ही काझीपेठ-पुणे ही ट्रेन हडपसरमध्येच थांबवण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाच्यावतीने पुणे रेल्वे स्टेशनवरील ताण कमी करण्याससाठी हडपसर व खडकी हे दोन स्टेशन विकसित करण्यात येत असल्याचे सांगण्यात येत आहे.

परंतु हडपसर स्टेशनवरुन प्रवाशांना पुढे पुणे, पिंपरी चिंचवड, तळेगाव जाण्यासाठी कुठलीच सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध नाही. यामुळे रिक्षावाले प्रवाशांची प्रचंड लूट करत आहेत. प्रवाशांची खूप गैरसोय होत आहे. प्रवाशांच्या दृष्टीने इतर कुठल्याही सुविधांचा अभाव असताना रेल्वे प्रशासन रेल्वे हडपसरला थांबवण्याचा अट्टाहास का करत आहे? उत्तर भारतातून पुण्याला येणाऱ्या ट्रेनच्या प्रवाशांचा ताण पुणे स्टेशनवर पडत नाही का? का फक्त मराठवाड्यातून येणाऱ्याच प्रवाशांचा ताण पुणे स्टेशनवर पडत आहे? मध्य रेल्वे विभाग व दक्षिण मध्य रेल्वे विभाग यांच्या प्रतिस्पर्धेचे बळी मराठवाड्याचे प्रवासी पडत नाहीत ना? कारण आजपर्यंत हडपसर इथे टर्मिणेट होणाऱ्या सर्व ट्रेन्स या दक्षिण मध्य रेल्वेच्या विभागाच्या आहेत असे अनेक प्रश्न सर्व सामान्य नागरिकांच्या मनात उपस्थित होत असल्याचे रेल्वे प्रवासी सेलचे अध्यक्ष शैलेश वखारिया यांनी सांगितले आहे.

यापूर्वी रेल्वे प्रशासनाला निवेदनद्वारे विनंती करण्यात आली आहे की, पुणे स्टेशनवर प्लॅटफॉर्म उपलब्ध नसेल तर पुणे स्टेशनवर थांबा देऊन त्या ट्रेन पुढे खडकी स्टेशनवर टर्मीनेट कराव्यात. त्याचबरोबर दुसरा पर्याय म्हणजे पुणे-अहमदाबाद दुरांतो एक्सप्रेसची निघण्याची वेळ सायंकाळी ९ वा. च्या ऐवजी ८.५० वा. केल्यास त्या प्लॅटफॉर्मवर हारंगुळ-पुणे एक्सप्रेस घेऊन ती पुढे पुणे-नांदेड एक्सप्रेस म्हणून नांदेडकडे रवाना होऊ शकते, असे रेल्वे प्रवासी सेलचे रेल्वे अभ्यासक कनिष्क बोकेफोडे यांनी सुचवले आहे. परंतु बार्शी, धाराशिव, लातूर, नांदेड या सर्व परिसरातील अनेक प्रवासी संघटना, या विभागातील जनप्रतिनिधी यांनी वारंवार रेल्वे प्रशासनापुढे या मागण्या मांडून देखील प्रशासनची ताठर भूमिका पाहून आता रेल रोको आंदोलन केले जाणार आहे.

या रेलरोको आंदोलनास मराठवाडा प्रवासी संघ, लातूर रेल्वे प्रवासी संघ, अनेक व्यापारी व सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी यांनी पाठिंबा दर्शवला आहे. सुरुवातीला बार्शी रेल्वे स्टेशनवर हे आंदोलन होईल, तरी प्रशासनाने मागण्या मान्य न केल्यास कुर्डुवाडी रेल्वे स्टेशनवर रेलरोको आंदोलन करण्यात येईल. तरी रेल्वे प्रशासन जागे न झाल्यास सोलापूर रेल्वे स्टेशन-पुणे रेल्वे स्टेशन इथे रेलरोको आंदोलन करत आंदोलनाची व्याप्ती वाढवण्यात येणार असल्याचे शैलेश वाखारिया यांनी सांगितले आहे.

## महाशिवरात्री रोजी वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानमधील दिनक्रमात बदल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१३ फेब्रुवारी-**

सालाबादाप्रमाणे यंदाही येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात रविवार दि.१५ फेब्रुवारी माघ वद्य त्रयोदशी रोजी महाशिवरात्री संपन्न होत आहे. ब्रह्मांडनायक अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज हे देवादी देव महादेवाचे निस्सीम भक्त आहेत.

यानिमीत्ताने येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात महाशिवरात्री अत्यंत भक्तीभावाने संपन्न होत असतो. महाशिवरात्रीनिमित्त मंदिरातील दिनचर्येत व स्वामींच्या नित्योपचारात पारंपारीक पध्दतीचे बदल करण्यात आले आहेत. सालाबाद प्रमाणे पहाटे ५ वाजता श्रींची काकड आरती संपन्न होईल. सकाळी ११:३० वाजता नित्यनियमाने होणारी नैवेद्य आरती व रात्रीची शेजारती महाशिवरात्रीमुळे होणार नाही. रात्री १० ते १२ या वेळेत पुरोहीत मोहनराव पुजारी व मंदार महाराज पुजारी व ब्रम्हवृंद यांच्या विधीवत मंत्रोच्चारात मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या अधिपत्याखाली प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते लघुरुद्र अभिषेक व महाशिवरात्रीची महापूजा होऊन रात्री १२ वाजता श्रींची आरती संपन्न होईल याची सर्व स्वामी भक्तांनी नोंद घ्यावी, अशी माहीती मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे यांनी याप्रसंगी दिली.

## राज्यस्तरीय अश्व नृत्य स्पर्धेत करमाळ्याचा बादशहा प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. १३ फेब्रुवारी-**

संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा जि अहिल्यानगर येथील खंडोबा देवगड यात्रेनिमित्त आयोजित राज्यस्तरीय अश्वनृत्य स्पर्धेत शेटफळ (ता.करमाळा) येथील नामदेव साबळे यांच्या बादशहा घोड्याने प्रथम क्रमांक मिळवत तो महाराष्ट्र अश्व केसरीचा मनकरी ठरला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात देवगड अश्व सेवा संस्था आणि ग्रामपंचायत हिवरगाव पावसा यांच्या संयुक्त विद्यमाने श्री शेत्र खंडोबा देवस्थान ट्रस्ट हिवरगाव पावसा यात्रेनिमित्त भव्य पशुपक्षी प्रदर्शन व राज्यस्तरीय अश्वस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी झालेल्या आश्वास स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध ठिकाणचे नामांकित घोडे मालक आपले अश्व घेऊन आले होते. यामध्ये देखना अश्व व अश्वनृत्य स्पर्धा संपन्न झाल्या या



स्पर्धेत शेटफळ तालुका करमाळा येथील नामदेव साबळे यांच्या बादशहा घोड्याने प्रथम क्रमांक मिळवला आहे संगमनेर विधानसभेचे विद्यमान आमदार अमोल खताळ व स्पर्धा पंच गोपा कापरे यांच्या हस्ते साबळे यांना प्रथम क्रमांकाचे बक्षीस पारितोषकासह प्रदान करण्यात आले साबळे यांना अश्व पालनाचा छंद असून गेले पंधरा वर्षापासून त्यांनी हा छंद जोपासला आहे. परासरातील विवाह व इतर समारंभांमध्ये नृत्य करणारे अश्व त्यांच्याकडे आहेत.

## संत नामदेव महाराज राष्ट्रीय एकात्मता विश्व महासंमेलन नागपुरात

**बार्शी, दि. १३ फेब्रुवारी-**

संत नामदेव महाराज राष्ट्रीय एकात्मता विश्व महासंमेलन शिंपी/दर्जी समजाचे रविवार दि. २२ फेब्रुवारी रोजी नागपूर येथे रेशीमबाग या मैदानावर होणार असून भारतातील शिंपी समाजातील सर्व पोटजाती एकत्र येत आहेत. या महासंमेलनला पद्मश्री रामकिशोर छीपा डेरावाला (राजस्थान), पद्मश्री कनुभाई टेलर (गुजरात), प्रवीण दर्जी (गुजरात) आणि संत मंडळी, राजकीय प्रतिभावान समाजबंधू, भजनी मंडळे यांचा सहभाग होणार आहे. या कार्यक्रमाला देशपातळीवरील मान्यवर उपस्थित राहणार असून संत नामदेव विश्व पुरस्काराने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान, प्रल्हाद जोशी, खा. प्रणीती शिंदे, संजय नहार, खा. अनिल बोंडे, संजय खोड्के, आमदार सुलभा खोड्के (अमरावती), आ. रविकुमार राणा (बडनेरा), नवनीतजी राणा, अभिनेते गोविंदजी नामदेव, हभप जितेंद्रनाथ महाराज, स्वामी गोविन्दगिरी महाराज, सप्तखंजरी वादक सत्यपाल महाराज उपस्थित राहणार आहेत. हा माहिती पश्चिम महाराष्ट्र मुख्य संघटक संतोष मुळे, जिल्हा उपाध्यक्ष सुनिल सरवदे यांनी दिली.

## होळी आणि उन्हाळी सुट्ट्यांमध्ये विशेष रेल्वे गाड्या सुरू राहणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी -**

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी होळी उत्सव आणि उन्हाळी सुट्ट्यांमध्ये सोलापूर विभागातून धावणाऱ्या विशेष गाड्यांची सेवा रेल्वे सुरू ठेवणार आहे. त्याचा तपशील : साप्ताहिक गाड्यांमध्ये सोलापूर-लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई साप्ताहिक विशेष २४.०२.२०२६ पर्यंत दर मंगळवारी धावणार होती. ती आता १४.०७.२०२६ पर्यंत धावणार आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई-सोलापूर साप्ताहिक विशेष २५.०२.२०२६ पर्यंत दर बुधवारी धावणार होती. ती आता १५.०७.२०२६ पर्यंत धावणार आहे. सोलापूर-अनकापल्ले साप्ताहिक विशेष गाडी २७.०२.२०२६ पर्यंत धावणार होती. ती आता दर शुक्रवारी १०.०७.२०२६ पर्यंत धावणार आहे. अनकापल्ले-सोलापूर साप्ताहिक विशेष गाडी २७.०२.२०२६ पर्यंत धावणार होती. ती आता दर शनिवारी ११.०७.२०२६ पर्यंत धावणार आहे.

२८ फेब्रुवारपर्यंत दररोज धावण्यासाठी अधिसूचित केलेल्या दैनिक गाड्या १५ जुलैपर्यंत सुरू ठेवण्यात आल्या आहेत. यामध्ये सोलापूर-दौंड अनारक्षित दैनिक विशेष, सोलापूर-कलबुरगि अनारक्षित दैनिक विशेष, हडपसर-हरंगुळ अनारक्षित दैनिक विशेष या गाड्यांच्या वेळा, रचना आणि थांब्यांमध्ये कोणताही बदल होणार नाही.

# जिल्ह्यात पॅलिएटिव्ह केअर सेवा लवकरच

### वैद्यकीय उपचारासह मानसिक आधारासाठी समुपदेशन, आहार सल्ला ही मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

गावपातळीवरील गंभीर, पूर्णपणे बरे न होणाऱ्या आजारांनी ग्रस्त, दीर्घकालीन वेदना सहन करणारे तसेच अंथरुणाला खिळून असलेले रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी दिलासादायक ठरणारी पॅलिएटिव्ह केअर सेवा राज्यात सुरु करण्यात आली आहे. या सेवांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा पॅलिएटिव्ह केअर समिती स्थापन करण्यात आली असून पूर्ण जिल्ह्यातही या सेवेची लवकरच अंमलबजावणी सुरू होणार आहे.

या सेवेमुळे केवळ वैद्यकीय उपचारच नव्हे, तर वेदना कमी करणे, मानसिक आधार देणे, तसेच रुग्ण व नातेवाइकांचे जीवनमान उंचावण्यावर भर देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ही सेवा गावपातळीपर्यंत पोहोचवण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. गंभीर, दीर्घकालीन किंवा पूर्णपणे बरे न होणाऱ्या आजारांनी ग्रस्त रुग्णांच्या वेदना कमी करणे, त्याना शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिक आधार देणे ही पॅलिएटिव्ह केअर सेवेची संकल्पना आहे. पॅलिएटिव्ह केअर सेवा ही केवळ उपचारांची नव्हे, तर मानवी संवेदनांची सेवा आहे. गंभीर आजाराने त्रस्त रुग्णांना वेदनारहित आणि सन्मानाने जगता यावे, यासाठी ही सेवा गावपातळीपर्यंत प्रभावीपणे राबवली जाणार आहे. जिल्हा रुग्णालयात दहा व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये प्रत्येकी दोन खाटा अशा रुग्णांसाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत. अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांनी दिली.

**या रुग्णांसाठी ही सेवा**

कॅन्सर, शेवटच्या टप्प्यातील किडनी, लिव्हर आजार, हृदयविकार, न्यूरोलॉजिकल व डायलेसिस, वृद्धापकाळातील आजार इ. साठी. वेदनाशामक औषधे, पोषण सल्ला, नर्सिंग केअर, घरगुती काळजी व मार्गदर्शन याचा यात समावेश.




## करकंबच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १३ फेब्रुवारी-**

न्यू.इंग्लिश स्कूल करकंब (ता. पंढरपूर) येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रमुख पाहुणे, शिक्षक, शिक्षिका व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. ज्ञानेश्वर लेंडवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी आयुष्यात संयम, शिस्त, आत्मविश्वास, एकाग्रता अशा अनेक गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत. समाजामध्ये घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचे निरीक्षण करून आपण त्यातून चांगल्या विचारांचे अनुकरण करत चांगले गुण आत्मसात करावेत.जीवनामध्ये आपण कोणाशी संगत करतो ते फार महत्त्वाचे आहे. आपल्या आयुष्यात सकारात्मक व नकारात्मक असे दोन पर्याय असतात त्यातील कोणता निवडावयाचा ते आपण ठरवावयाचे असते, असेही प्रा. लेंडवे यांनी सांगितले.

# शाश्वत विकासासाठी रसायन शास्त्र महत्वाचे : डॉ. घनवट

### खेडगी महाविद्यालयात रसायन शास्त्राबाबत राष्ट्रीय परिषद

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१३ फेब्रुवारी-**

सध्याच्या धावपळीच्या जीवनात आरोग्य, ऊर्जा व पदार्थ विज्ञान या क्षेत्रांतील शाश्वत विकासासाठी रसायनशास्त्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. समाजोपयोगी संशोधन, हरित रसायनशास्त्र, नवीन ऊर्जा साहित्य व पर्यावरणपूरक तंत्रज्ञान यावर विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी भर द्यावा, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या स्कूल ऑफ कैमिकल सायन्सचे संचालक डॉ. ए. ए. घनवट यांनी केले.



सी. बी. खेड्गी महाविद्यालयात रसायनशास्त्र विभाग व नॅक यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम-उषा प्रायोजित दोन दिवसीय आरोग्य, ऊर्जा आणि साहित्यातील शाश्वत विकासासाठी रसायनशास्त्र या विषयावरील राष्ट्रीय परिषदच्या शुभारंभाप्रसंगी डॉ. घनवट बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी हे होते. व्यासपीठावर माजी नगराध्यक्षा शोभा खेडगी, सचिव सुभाष धरणे, संचालिका पवित्रा खेडगी, प्राचार्य डॉ. गुरुलिंगप्पा धबाले उपस्थित होते. प्रारंभी परिषदेचे उदघाटन शोभा खेडगी यांच्या हस्ते करण्यात आले. पहिल्या सत्रात कर्नाटक केंद्रीय विद्यापीठाचे प्रा. हरीश होल्ला यांनी नैसर्गिक उत्पादने -औषधशास्त्रातील शास्त्रीय रसायनशास्त्र या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. अनिल गोरे यांनी मायक्रो नॅनोप्लास्टीक -आरोग्य, पर्यावरण आणि टिकाऊपणासाठी एक मूक धोका या विषयावर पर्यावरण व मानवी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती दिली. तिसऱ्या सत्रात डॉ. अमृतलाल प्रजापत यांनी टेक्सटाईल वेस्ट वाटरसाठी प्रगत ऑक्सीडेशन प्रक्रिया या विषयावर वस्त्रोद्योगातील सांडपाण्यावर उपाययोजना सांगितल्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी चौथ्या सत्रात डॉ. बी. बी. शिंगटे यांनी मन ते रेणू -औषधांमध्ये कल्पनांचे भाषांतर करणे या विषयावर औषध संशोधनातील नवकल्पनांवर प्रकाश टाकला. पाचव्या सत्रात डॉ. हेमराज यादव यांनी केमिकल रिसर्च आणि इनोव्हेशन इन मटेरियल सायन्स मधील उदयोन्मुख ट्रेंड या विषयावर आधुनिक संशोधन प्रवाह स्पष्ट केले. सहाव्या सत्रात प्रोस्टर व तोंडी सादरीकरण सत्र घेण्यात आले. या सत्रात पीजी, यूजी व संशोधक विद्यार्थ्यांनी आपले संशोधन सादर केले. या सत्रासाठी परीक्षक म्हणून दयानंद महाविद्यालयाचे रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. एस.वाय. जाधव व प्रा.आर. एम. ओव्हाळ यांनी काम पाहिले. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रा. के. व्ही. झिपरे हे होते. समारोप भाषण प्रा. ए. एस. लवंड यांनी केले. प्रा. जी. एस. धबाले, डॉ. मुद्दसर गौर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. मुद्दसर गौर यांनी तर परिचय डॉ. ए. व्ही. धोत्रे यांनी करून दिला. राष्ट्रीय परिषदेचा सारांश प्रा. दयानंद कोरे यांनी केले. आभार प्रा. गायत्री रामपुरे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. पवन हरदास व डॉ. विठ्ठल मकणे यांनी केले. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. एस. आर. जिद्दीमनी, डॉ.लक्ष्मण ढाले, प्रा. एस. बी. भैरुणगी, प्रा. एस. सी. गंगधे, प्रा. एस. एस. बनेगाव, प्रा. मोहिनी पुजारी, प्रा. जुवेरिया शेख यांनी परिश्रम घेतले. परिषदेसाठी १०० हून अधिक शिक्षक, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अथर्व हरिदास यांच्या एकाकी त्रिपद पारायणास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ फेब्रुवारी-**

श्री गुरुजी वेदविद्या प्रतिष्ठान गुरुकुल श्री क्षेत्र ओझरद्वारा आयोजित प्रात:स्मरणीय घनपाठी साक्षात वेदसूर्य कै. श्रीकृष्णशास्त्री गोडशे गुरूजी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित केलेल्या एकाकी त्रिपद पारायण पंढरपूर क्षेत्रातील वेदमूर्ती दत्तात्रेय हरिदास यांचे चिरंजीव व प्रात:स्मरणीय कै. घनपाठी गजानन शास्त्री गोडशे गुरुजी यांचा नातू आणि श्री गुरुजी वेदविद्या प्रतिष्ठान गुरुकुलचे प्रधान आचार्य व गोडशे गुरुजी वैदिक परंपरेचा वारसा लाभलेले वेदमूर्ती घनपाठी श्री धनंजय विश्वनाथ जोशी यांचा शिष्य वेदमूर्ती अथर्व दत्तात्रेय हरिदास श्री क्षेत्र पंढरपूर निवासी हा करणार आहे.

हे पारायण मि. माघ वद्य अष्टमी पासून प्रारंभ झाला आहे. त्यावेळी गोडशे गुरुजी वैदिक परंपरेचे दिग्गज घनपाठी वेदमूर्ती शांताराम भानोसे गुरुजी,घनपाठी मधुरशास्त्री जोशी गुरुजी, घनपाठी महेश रेखे गुरुजी, घनपाठी निलेश केदार गुरुजी, घनपाठी गजेंद्र गढीकर गुरुजी यांची उपस्थिती व आशिर्वादासह मार्गदर्शन लाभले.

हे पारायण मि. फाल्गुन शुद्ध प्रतिपदेपर्यंत चालणार आहे. तरी वेदप्रेमी धर्माभिमानी बंधू भगिनींनी श्रवणाचा व दर्शनाचा लाभ घ्यावा.



## महत्त्वाचे

### मंगळवेढ्यातून १९ वर्षीय कॉलेज तरुणी बेपत्ता; पोलिसात तक्रार दाखल

**मंगळवेढा, दि. १३ फेब्रवारी-**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून एक १९ वर्षीय काँलेज तरुणी बेपत्ता झाली असून याबाबत तिच्या कुटूंबियांनी मंगळवेढा पोलीसात तक्रार दिली आहे. दरम्यान तपासिक अंमलदार तथा महिला पोलीस उपनिरीक्षक डॉ. आरती कनीरे ह्या मुलीचा शोध घेत आहेत. पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील बेपत्ता तरुणी दि. ११ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजता राहते घरातून कोणास काही न सांगता निघून गेली आहे. कुटूंबियांनी सदर मुलीचा सर्वत्र कसून शोध घेतला मात्र ती मिळून आली नाही. तिचे वर्णन पुढील प्रमाणे उंची पाच फुट, रंग सावळा, अंगात गुलाबी रंगाचा ड्रेस, काळी जीन्स, कानात सोन्याची झुबे अशा वर्णनाची मुलगी कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी पोलीस उपनिरीक्षक डॉ. आरती कनीरे (९३२५४७८१११) वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### सोजर इंग्लिश स्कूल आयोजित आनंद बाजारात ४० हजारांची उलाढाल

**बार्शी, दि. १३ फेब्रवारी-**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सोजर इंग्लिश स्कूलमध्ये शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी आनंद बाजारचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी श्री. बावकर आणि शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्याध्यापिका रिटा नेटके उपस्थित होत्या. या आनंद बाजारात भाजीपाला, फळे, स्टेशनरी, वडापाव, इडली-सांबर, मुग वडा, हुरडा, ढोकळा, सौंदर्य प्रसाधने, भेळ, चाटभांडार, शालेय साहित्य, चॉकलेट, बिस्कीटे, ज्यूस, आईसक्रीम या सारख्या वस्तुंचे जवळपास ६७ स्टॉल लावण्यात आले होते. आपले कौशल्य पणाला लावत विद्यार्थ्यांनी सुमारे ४० हजारांची विक्री केली. सोनाली नष्टे यांनी सूत्रसंचालन केले. सर्व स्टॉलचा जमाखर्च लिहिण्याचे काम अमृता शहा यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका नेटके यांचे मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### करमाळा पंचायत समिती सदस्य सोनाली तकिक यांचा सत्कार

**जेऊर, दि. १३ फेब्रवारी-**

वांगी पंचायत समिती गणातील नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य सोनाली तकिक यांचा शेटफळ (ता. करमाळा) येथील जिव्हाळा ग्रुप व ग्रामस्थांच्या वतीने वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ शेतकरी गटाचे अध्यक्ष हर्षाली नाईकनवरे होत्या. उपस्थितांचे स्वागत माजी सरपंच मुरलीधर पोळ यांनी केले. यावेळी गणेश मोरे, नितीन तकिक, मकाईचे माजी संचालक किरण पोळ यांनी आपले विचार व्यक्त केले. प्रास्ताविक गजेंद्र पोळ यांनी केले तर आभार रोहित लबडे यांनी मानले. यावेळी लोकविकास फार्मर प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष वैभव पोळ, विलास लबडे, कैलास लबडे प्रताप पोळ देगाव सोसायटीचे चेअरमन हरिचंद्र शेळके, लक्ष्मण गुंड-पाटील, योगेश घोगरे, विजय लबडे, राजेंद्र साबळे, प्रशांत नाईकनवरे नानासाहेब साळुंखे, महादेव पोळ, महेश पोळ, अतुल रोंगे, गंगाधर पोळ उपस्थित होते.

### किणी येथील मोफत अरोग्य शिबिरात २५० रूग्णांची तपासणी

**अक्कलकोट, दि. १३ फेब्रवारी-**

रोटरी क्लब ऑफ अक्कलकोट व डॉ.अभिजीत तुळजापूरे दवाखाना यांच्या संयुक्त विद्यमाने किणी (ता. अक्कलकोट) येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले. शिबिराचा २५० हून अधिक रुग्णांनी लाभ घेतला. सुमारे १०० रुग्णांची नेत्र व दंत तपासणी करण्यात आली, तर १५० रुग्णांची रक्तदाब, मधुमेह, गुडघेदुखी, अंगदुखी व इतर सर्वसाधारण आजारांची तपासणी करण्यात आली. मनोज काटगाव, संजीव नंदर्गी व डॉ.अभिजीत तुळजापूरे यांच्या सहकार्याने मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. शिबिरात डॉ. प्रशांत वाली, डॉ. विपुल शहा, डॉ. प्रमोद सुतार, डॉ. अभिजीत तुळजापूरे, डॉ. आशुतोष साखरे, डॉ. राजेश मलंग तसेच पॅथॉलॉजिस्ट नागराज बिराजदार यांनी मोलाची सेवा दिली. शिबिराच्या आयोजनात भिमराव तुळजापूरे तसेच गावकरी अशोक साखरे, संजय किणीकर, दयानंद घिवारे, सुरेश कलशेट्टी, अर्जुन डोंगरे, रितेश खुणे, गणेश मस्के, ऋषी पंधरकर आदींचा सहकार्य लाभले. हा उपक्रम अध्यक्ष गुरूशांतप्पा पाटील, सचिव प्रदीप तोरस्कर व कोषाध्यक्ष केदार नारोणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.



# लोकसहभागातून कासाळगंगेचे पुनरुज्जीवन

### श्रमदानातून साकारली नदी; २३ गावे दुष्काळ मुक्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ फेब्रुवारी-**

सांगोल्यासह पंढरपूर, माळशिरस तालुक्यातील २३ गावे व वाड्यावरील रहिवाशांनी कासाळगंगा ओढ्याचे ४२ किलोमीटर पुनर्जीवन करत श्रमदानातून नदी साकारली. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नातून टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेकडून ४ कोटी ५७ लाखाचा सीएसआरचा निधी मिळाला. कासाळगंगा नदी पूर आणि दुष्काळ मुक्तीचे मॉडेल बनली आहे. गाळाने पडीक जमीन लागवडीखाली येत माळरानावर फळबागा फुलल्या आहेत.

त्यामुळे या भागातील नागरिकांचे स्थलांतर थांबण्यास मदत झाली आहे. कासाळगंगा ओढ्याचे पहिल्या टप्प्यात ५ किलोमीटर लांबीचे पुनर्जीवन महूद (ता. सांगोला) ग्रामस्थांनी लोकसहभागातून केले. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर जिल्ह्याला उपलब्ध करून दिलेल्या निधीतून डिझेल खर्चाचे सहाय्य झाले. पाणी उपलब्ध होत असतानाच पुनर्जीवन कामातून उपलब्ध झालेल्या गाळातून पडीक क्षेत्र लागवडीखाली आले. अतिक्रमण काढताना जमिनीच्या तुकड्यापेक्षा पाणी महत्वाचे मानले गेल्याने प्रशासकीय मदतीची आवश्यकता भासली नाही.

सोलापूर जिल्ह्यातील ४२ किमी लांबीच्या कासाळगंगा नदीचे पुनरुज्जीवन टीसीएस ने केले. ४ कोटी ५७ लाख खर्चून नदीपात्रातील गाळ काढणे, बंधाऱ्याची स्थिरता व वृक्षारोपण करण्यात आले. यामुळे २४ गावे व ३ तालुक्यांना लाभ झाला.



भूजलपातळी वाढली, पिकांच्या पद्धतीत बदल झाला व स्थलांतर थांबले व उलट स्थलांतरित नागरिक वापस येण्याची प्रक्रिया सुरू झाली. टीसीएसच्या या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील नैसर्गिक संसाधनांचे पुनरुज्जीवन होऊन सामाजिक-आर्थिक बदल घडत आहेत. कासाळगंगा खोऱ्यातील सर्वात मोठ्या म्हणजे २५ हजारापर्यंत लोकसंख्या असलेल्या महूद गावात सुवर्ण पेढ्यांची संख्या कित्येक पटीने वाढली. बदलत्या हवामानावर आधारित पीक पद्धती, क्लस्टर डेव्हलपमेंट हेही नदी पुनर्जीवन कामातून साकारले गेले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील नद्या साठी 'चला जाणुया नदीला', हे अभियान सुरू करून नद्यांना पुनर्जीवित करण्याचा केलेला संकल्प भावी पिढीसाठी व पर्यावरणासाठी वरदान ठरणारा आहे. सोलापूर जिल्ह्यातील कासाळ गंगा, माणगंगा, सांगली जिल्ह्यातील महांकाली, अग्रणी तीळगंगा या नद्यांच्या पुनरुज्जीवनाचे काम अगोदर पासूनच लोकसहभागातून सुरू आहे. या कामाने मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले व वर्धा येथे झालेल्या कार्यक्रमात तत्कालीन उपमुख्यमंत्री व विद्यमान मुख्यमंत्री यांनी १०८ नद्यांची पुनरुज्जीवनासाठी निवड केली. त्याचाच एक भाग म्हणून सांगोला तालुक्यातील कासाळगंगा नदीचे काम प्रगतीपथावर असल्याने त्या कामास मुख्यमंत्री यांनी प्राधान्य दिल्याचे समजते अशा पद्धतीने नद्यांचे काम झाले तर पर्यावरणात वृद्धी होऊन मनुष्य, प्राणी, वृक्षवेली यांचे जगणे सुलभ होईल.

महाराष्ट्र राज्याची सर्वसमावेशक, संतुलित आणि दीर्घकालीन प्रगती व्हावी. यात शेतीसाठी मोठी गुंतवणूक, सिंचन व जलसंवर्धन, उद्योग-धंद्यांचा विस्तार, तसेच ग्रामीण व शहरी भागात पायाभूत सुविधांच्या मोठ्या प्रमाणावर विकास करणे, हेच शासनाचे धोरण आहे. जलयुक्त शिवार अभियानाचा विस्तार करून दुष्काळग्रस्त भागांना दिलासा. नदीजोड प्रकल्पाद्वारे पाण्याचे असमान वितरण कमी करणे.सिंचन प्रकल्पांना गती देऊन लाखो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणून शेतकऱ्यांना दिलासा देणे व महाराष्ट्राला संतुलित व प्रगतिशील राज्य बनवण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. कासाळगंगा नदी बारमाही आणि निर्मल वाहण्यासाठी लोकअभ्यास करण्यात आला. त्यातून पुढे आलेल्या उपाययोजना करण्यासाठी कृती अहवाल शासनाला सादर करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या चला जाणूया नदीला अभियानांतर्गत शासनाच्या विविध योजना कन्व्हर्जन मधून उपाययोजना होण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे.

### उपाययोजनांसाठी टास्क फोर्स

कासाळगंगा नदीच्या पाण्यामुळे ११ हजारांहून अधिक हेक्टर कोरडवाहू क्षेत्रासाठी पाणी उपलब्ध झाले. ३३.६० लाख घनमीटर गाळ काढण्यात आला, त्यातून ४७३ हेक्टर पडीक क्षेत्र लागवडीखाली आले. जवळपास १ लाख लोकसंख्येच्या या भागातील कृषी आणि संलग्न क्षेत्रातून २० टक्क्यांनी उत्पन्न वाढले. रोगराईमुळे डाळिंब संपण्याच्या मार्गावर पोचले असताना इथल्या शेतकऱ्यांनी पेरू, केळी, पपई, चिंच, आवळा, ड्रॅगन फ्रुट अशा फळबागांनी शिवार फुलवले. भाजीपाला, चारा पिकांचे क्षेत्र वाढले. स्थानिक ग्रामस्थांनी २८ रुपये घनमीटर एवढ्या माफक दरात पुनरुज्जीवनाचे काम केले. कटफळ गावात ढोबळी मिरची उत्पादन आणि विक्री व्यवस्था बूम झाल्याने 'रिव्हर्स मायग्रेशन' सुरू झाले. दुष्काळी महिम गावातील दुग्धोत्पादन जवळपास दुप्पट झाले.

# जिल्ह्यात एका महिनाभर 'महा रेशीम अभियान'

### ११ मार्चपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ फेब्रुवारी-**

जिल्ह्यात महारेशीम अभियान २०२६-२७ अंतर्गत १० फेब्रुवारी ते ११ मार्च या कालावधीत नवीन तुती लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी ११ मार्चपर्यंत 'आपले सरकार' या पोर्टलवर वस्त्रोद्योग विभाग निवडून ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा रेशीम अधिकारी विनित पवार यांनी केले आहे.

राज्यात तुती लागवड करून शेतकरी रेशीम कोष निर्मितीद्वारे भरघोस उत्पन्न मिळवत आहेत. रेशीम उद्योगासाठी अनुकूल वातावरण असल्याने या क्षेत्रात सातत्याने वाढ होत आहे. तुती लागवडीद्वारे एक एकर क्षेत्रातून दुसऱ्या वर्षापासून दोन लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न शेतकरी मिळवत असल्याचे दिसून आले आहे. जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये वर्ष २०२५-२६ मध्ये ९७७ शेतकऱ्यांनी १२६० एकर क्षेत्रावर



तुती लागवड केली असून ७ लाख ९२ हजार २५० अंडीपुंजांपासून ४ लाख ५९ हजार ४७६ कोष उत्पादन झाले आहे. यामधून सुमारे २० कोटी ६७ लाख रुपयांची उलाढाल झाली आहे. मोठ्या प्रमाणावर रेशीम कोष उत्पादन होत असल्याने जालना, बीड, बडनेरा, सोलापूर, बारामती व नागपूर येथे कोष बाजारपेठा सुरू करण्यात आल्या आहेत. शासनाच्या धोरणानुसार शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी रेशीम उद्योग महत्त्वाची भूमिका बजावत आहे. रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांना एक एकर तुती लागवड, जोपासना व कीटक संगोपन गृहासाठी तीन वर्षांत एकूण ८९५ मनुष्य दिवसांची मजुरी दिली जाते. यामध्ये मजुरीपोटी २ लाख ७९ हजार २४० रुपये व साहित्यासाठी १ लाख ५३ हजार रुपये, असे एकूण ४ लाख ३२ हजार २४० रुपये अनुदान देण्यात येते.

तसेच केंद्र पुरस्कृत 'सिल्क समग्र' योजनेअंतर्गत प्रति एकर तुती लागवडीसाठी ४५ हजार रुपये, सिंचन संचासाठी ४५ हजार रुपये, कीटक संगोपन गृहासाठी २ लाख ४३ हजार ७५० रुपये, संगोपन साहित्यासाठी ३७ हजार ५०० रुपये व निर्जंतुकीकरण औषधासाठी ३ हजार ७५० रुपये, असे एकूण ३ लाख ७५ हजार रुपये अनुदान देण्यात येते.

बहुभूधारक शेतकऱ्यांसाठी 'सिल्क समग्र-२' योजनेतून दोन एकर तुती लागवडीसाठी कीटक संगोपन गृह, साहित्य व निर्जंतुकीकरण औषधांसह ५ लाख ६२ हजार ५०० रुपये अनुदान उपलब्ध आहे. मनरेगा व सिल्क समग्र योजनेसाठी नोंदणी करण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालय, सोलापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा रेशीम अधिकारी पवार यांनी केले आहे. नाव नोंदणीसाठी एम. जे. गवंड (मो. ९५६१३७१६७४) व बी. एन. सूर्यवंशी यांच्याशी संपर्क साधावा, असे प्रसिध्दी पत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

# महाशिवरात्री पासून तीर्थक्षेत्र माचणूरची सिध्देश्वर यात्रा

### विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १३ फेब्रवारी -**

तीर्थक्षेत्र माचणूर येथील श्री सिध्देश्वर देवस्थान यात्रेला दि.१५ फेब्रुवारी महाशिवरात्री पासून सुरुवात होत असून या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान महाशिवरात्री दिवशी पहाटे ४ वाजता प्रांताधिकारी भैरप्पा माळी यांच्या हस्ते श्री ची महापुजा होवून तद्नंतर भाविकांना दर्शनासाठी मंदिर खुले केले जाणार आहे.

तीर्थक्षेत्र माचणूर येथील श्री सिध्देश्वर देवस्थान यात्रा महाशिवरात्रीपासून पुढे पाच दिवस चालू राहते या निमित्त रविवार दि.१६ रोजी महाशिवरात्रीच्या सायंकाळी मंदिरात आरत्यांचा कार्यक्रम व ७ वाजता श्री च्या पालखीचे सवाद्य गावातून मंदिराकडे आगमन, पारंपारिक भेदीक कार्यक्रम (कलगी तुरे), दि.१७ रोजी दुपारी २ वाजता जंगी कुस्त्या,दि. १९ रोजी सायंकाळी आरत्याचा कार्यक्रम व मंदिरातून श्री च्या पालखीची माचणूर गावाकडे मिरवणूक. यासाठी माचणूर गावचे सरपंच, उपसरपंच नितीन पाटील तसेच सर्व सदस्य यासाठी परिश्रम घेत आहेत. मंदिर परिसरात विविध खेळण्याची दुकाने, रसपानगृहे, पाळणे व अन्य विविध साहित्याची दुकाने येण्यास सुरुवात झाल्याचे चित्र आहे. दरम्यान भीमा नदीत पाणी आल्यामुळे भाविकांच्या स्नानाची व पिण्याची सोय झाली आहे.

# उमा शिक्षण संकुलात वार्षिक पारितोषिक वितरण

**पंढरपूर, दि.१३ फेब्रुवारी-**

येथील श्री पांडुरंग शिक्षण प्रसारक मंडळ संचलित उमा शिक्षण संकुलातील उमा महाविद्यालय व उमा शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ कथाकथनकार जयवंत आवटे यांच्या हस्ते व संस्थेचे उपाध्यक्ष मुकुंद परिचारक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांच्या प्रतिमापूजनाने झाली.

अभिनव भित्तिपत्रकाच्या अंकाचे प्रकाशन प्रमुख पाहुणे व संस्थेचे पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेचे उपाध्यक्ष मुकुंद परिचारक यांनी बक्षीसपात्र सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड व उमा शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. जे.एस.बागवान यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. संस्थेचे सचिव राजगोपाल भट्टड, खजिनदार रमेश लाड, संस्थेचे विश्वस्त डॉ. मिलिंद परिचारक, माजी प्रभारी प्राचार्यपवार उपस्थित होते. प्रा. अनंत कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नागिन सर्वगोड यांनी परिचय करून दिला. प्रा. सविता दूधभाते व प्रा.डॉ.दत्ता सरगर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.संध्या सावकार यांनी आभार मानले.

# सीईओ कुलदीप जंगम यांच्या सांगोल्यात गावभेटी

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानाचा घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१३ फेब्रुवारी -**

दि.१७ सप्टेंबर २०२५ पासून सुरू झालेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानांतर्गत स्पर्धेमधील अनेक गावांमध्ये युद्ध पातळीवर विकास कामे सुरू होती. मात्र मध्यंतरीच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लागल्याने अभियानाची गती मंद झाली होती. या अभियानाला गती मिळावी व जी गावे स्पर्धेत आहेत त्यांच्याकडून कामाची योग्य पद्धतीने पूर्तता व्हावी याकरिता सोलापूर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सांगोला तालुक्यातील वाढेगांव, कमलापूर, चिणके, पारे, अकोला या गावाना भेटी देऊन अभियानातील कामाचा आढावा घेतला. पूर्ण झालेल्या कामाची माहिती घेऊन अपूर्ण कामे



पूर्ण करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले.

वाढेगाव येथे केलेली वृक्ष लागवड, त्यासाठी केलेली सिंचन व्यवस्था, प्राथमिक शाळा, अंगणवाडी, महिला बचत गट, दिव्यांगाच्या सवलती, घरकुल योजना, ग्रामपंचायत वसुली तसेच नाविन्यपूर्ण राबवलेले उपक्रम याविषयी माहिती विविध खात्याच्या अधिकाऱ्याकडून जाणून घेतली. यावेळी कुलदीप जंगम यांना महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय सेवा कर्मी म्हणून पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने वैजिनाथकाका घोंगडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर वाढेगांव येथील त्रिवेणी संगमावरील तीर्थक्षेत्राच्या व पर्यटन स्थळाच्या विकास कामाला भेट दिली व त्या परिसराची सविस्तर माहिती जाणून घेतली. याप्रसंगी सहा. गटविकास अधिकारी वसंत फुले, पं.स.चे विकास अधिकारी अमोल तोडकरी, ग्रा.रु.चे डॉ. संदीप देवकते, प.वै. अधिकारी डॉ. नितीन गायकवाड, सरपंच कोमल डोईफोडे, ग्रा.वि.अधिकारी, ग्रामसेवक, ग्रा.पं. सदस्य, प्रा.वि.चे शिक्षक, महिला बचत गटाच्या प्रमुख, आरोग्य उपकेंद्राचे कर्मचारी, आशावर्कर, अंगणवाडीसेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंढरपुरात महास्वच्छता अभियान; ५०० जणांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ फेब्रुवारी-**

पंढरपूर शहरामध्ये शुक्रवारी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये ५०० हून अधिक नगर परिषदेचे कर्मचारी, सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. पंढरपूर नगरपरिषद निवडणूक प्रचारामध्ये नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. प्रणिता भालके यांनी विजयी झाल्यानंतर पंढरपूर शहर स्वच्छ व



सुंदर ठेवण्यात येईल, असे आश्वासन मतदारांना दिले होते. त्याप्रमाणे त्यांनी कामास सुरुवात केली आहे.

पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. विठ्ठलाच्या दर्शनाला दररोज ५० हजारापेक्षा अधिक भाविक येतात. तसेच नागरिक विविध ठिकाणी कामानिमित्त जात असतात. यामुळे पंढरपूर शहर स्वच्छ व सुंदर असणे गरजेचे आहे. मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात येत होते. पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीमध्ये तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्षा पदाच्या उमेदवार डॉ. प्रणिता भालके यांनी प्रचारांमध्ये आपण विजयी झाल्यानंतर पंढरपूर शहर स्वच्छ व सुंदर तसेचधूळ मुक्त करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. यामुळे मतदारांनी भालके यांना मतदान करून विजयी केले. आश्वासन दिल्याप्रमाणे नगराध्यक्षा डॉ. प्रणिता भालके यांनी कामास सुरुवात केली आहे. दरम्यान पंढरपूर शहरात शुक्रवारी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. शहरातील पद्मावती उद्यान, छत्रपती शिवाजी महाराज चौक, विवेकवर्धिनी विद्यालय या ठिकाणी स्वच्छता अभियान घेण्यात आले.